सर परशुरामभाऊ कॉलेज पुणें

येथील

सारस्वत सेवा संघाचें

द्वितीय पुष्प

# साहित्यसुधा

संपादकः—ग. वि. राजगुरु

प्रस्तावना लेखक—प्रो. द. वा. पोत

शके १८५३ ] किंमत १० आणे [ सन १९३२

प्रकाशकः-गो. वि. राजगुरु
३०५, सदाशिव, पुणें

मुद्रकः-स. कृ. जोशी
सिटी प्रेस सातारा.

# अनुक्रमणिका


| नं. | लेखकाचें नांव | विषय | पृष्ठें. |
|---|---|---|---|
| १ | प्रि. रा. प. सबनीस एम्. ए. | भांडावें कसें | |
| २ | क. रा. न. कीर्तने ज्यू. बी. ए. | चतुरिका | |
| ३ | श्री. रं. रा. देशपांडे बी. ए. (ऑनर्स) | काव्यविषयक विचार | ३–२१ |
| ४ | श्री. सांब ( एफ्. वाय्. बी. ) | गुलाबांच्या पाकळया | २१ |
| ५ | क. अ. गो. काळे इंटर सायन्स | फोल पसारा | २२ |
| ६ | श्री. गो. वि. राजगुरु ज्यू. बी. ए. | पृथ्वीवरील स्वर्ग | २३--२८ |
| ७ | श्री. चं. गुं. जोशी बी. ए. (ऑनर्स) | नाटक कसें असावें? | २९--४६ |
| ८ | क. शं. रा. कानेगांवकर | हृदयदेवतेस | ४६ |
| ९ | श्री. मो. गो. सोमण बी. ए. | पहा हो ही! | ४७ |
| १० | क. द. रा. कानेगांवकर | आनंद | ४८ |
| ११ | एक लेखिका | मालतीस पत्र | ४९--५३ |
| १२ | सांब ( एफ्. वाय. बी. ) | गुलाबाच्या पाकळया | ५३ |
| १३ | श्री. वा. रा. होनप इंटर आर्टस् | फुकट मिरवायला हवें! | ५४ |
| १४ | श्री. अ. गं. मंगरूळकर | जीवनविहार | ५५--६२ |
| १५ | श्री. के. ना. वाटवे एम्. ए. | कालिदासाची कारागिरी | ६३–७० |
| १६ | कु. राणी ठकार | सहवासोत्तर! | ७३--८७ |


SHRI.CHA.PRATAPSINH MAHARAJ (THORALE) NAGAR WACHNALAYA, SATARA.
087490

| | | |
|---|---|---|
| १७ क. कें. ल पुरोहित ( इंटर आर्टस् ) | फत्तरास — | ८८–९० |
| १८ | साहित्यस्वागत | ९१--९८ |
| १९ क. अ. य. देशपांडे बी. ए. (टी. म.) | कर्मयोग मुरली | ९९–१०० |
| २० श्री. द. बा. रानडे एम्. ए. | चरित्रलेखनकला | १०१--१०४ |
| २१ क. वि. म. कोल्हटकर | विरहानल | १०५--१०६ |
| २२ श्री. य. द. भावे ( ज्यू. बी. ए. ) | दंव--बिंदु | १०७--११० |
| २३ क. त्र्यं. ग. बापट ज्यू. बी. ए. | पुरांतील-पंचाविशी | १११ |
| २४ श्री. अ. वि काळे इंटर आर्टस् | हो बाबा एकदाचा बी. ए.! | ११२ |
| २५ स. वा. दातार | ऐन वेळीं | ११३--११७ |
| २६ खान्देशी ( ज्यू. बी. ए. ) | संशोधन | ११९--१२३ |
| २७ श्री. गो. वि. राजगुरु | सारस्वत--सेवा--संघ | १२५--१२६ |
| २८ वामन गणेश तळवळकर ( एफ्. वाय्. ए. ) | कणिका समूह | १२७ |
| २९ ग. ल. जोशी ( एफ्. वाय्. ए. ) | आळशी मी— | १२९--१३२ |
| ३० क. द. र. पोतनीस ( एफ्. वाय्. ए. ) | बाळा तुझ्या साठीं मी | १३३--१३४ |
| ३१ क. द. म. पोतनिस | पावन--खिंड | १३५--१३६ |

# प्रस्तावना.

घर म्हटलें कीं दार पाहिजेच; तसें अलीकडे पुस्तक म्हटलें कीं त्याला प्रस्तावना पाहिजेच ! इंग्रज लोकांत ओळख करून देण्याचा जो शिष्टाचार आहे तोच पुस्तकाच्या प्रकरणींहि अनुसरण्याची वहिवाट आहे.

'**साहित्य-सुधा**' प्रसिद्ध होणार हें सर्वांस आधींच कळलें होतें. आतां तें पुस्तक तयार झालेलें आहे; तें वाचकांचे हातीं देण्यापूर्वी पहाण्याचें काम मजकडे होतें. यास्तव त्याचा हा परिचय येथें करून देत आहें.

वॉशिंगटनला ज्याप्रमाणें कुऱ्हाड चालवून पहावी असें वाटलें त्याचप्रमाणें सर्वांना वाटतें. लिहून पहावें असें विद्यार्थ्यांना वाटणें हें सरळच आहे. 'लिहावें' वाटतें तसेंच लिहिल्यावर छापावें असेंहि वाटणें ओघानेंच प्राप्त होतें. अशा हौशीनेंच हा **साहित्यसुधा** प्रकाशनाचा प्रयत्न आमच्या **स० परशुरामभाऊ कॉलेजां**तील 'सारस्वत सेवा संघा'चे उत्साही चिटणीस श्री. गो. वि. राजगुरु यांनीं केला आहे; आणि त्याच हौशीनें सर्वांनीं याचें स्वागत व कौतुक करावयास पाहिजे.

मनाचे तट फोडून बाहेर पडण्याची दुर्दमनीय उसळी सर्वांच्याच ठिकाणीं आढळून येते असें नाहीं. कित्येकांना जरा हात दिला तरच उभे रहाण्याचा त्यांना धीर होतो. पहिल्या प्रकारच्या लोकांना कसलीच प्रस्तावना नको ! विजेचा चमचमाट होण्यापूर्वी आपोआपच मेघांचा गडगडाट होतो; परंतु तें ऐश्वर्य मानवी नव्हे ! मानवी पद्धतींत एकमेकांचा हात धरून वाटचाल करावी लागते. हा अर्थात् दुसऱ्या वर्गांतील लोकांचा प्रकार. उत्तेजनाची आवश्यकता येथें आहे. दया, सहानुभूति, इत्यादींची याचना येथेंच करावयाची असते; म्हणूनच या प्रस्तावनारूपानें सहानुभूतीची भीक सदय वाचकांजवळ मागावयाची आहे.

पंचपक्वान्नाचा बेत आणि चारी ठाव जेवण असलें म्हणजेच 'यद्रोचते' म्हणून विनवावें असें नाहीं. मीठ भाकरीच्या बेतालाही तो मंत्र उच्चारण्यांत पाप नाहीं; त्यांतल्यात्यांत **सुधे**च्या संपादकांनीं व लेखकांनीं यावत्शक्य प्रयत्न केले आहेत. काव्य, नाटक हीं तर वाङ्मयाचीं प्रधान अंगें होत; त्यांचा येथें विचार व समाचार श्री. देशपांडे व श्री. चं. गुं. जोशी यांनीं

निःसंकोच घेतला आहे. इतकेंच नव्हे तर ‘ चतुरिका ’ प्रभुत्वें प्रत्यक्ष काव्य-कृतीहि येथें रासिकरंजनार्थ सिद्ध आहेत. संपूर्ण नाटक जरी येथें नसलें, तरी नाट्यछटेचा केशरी शिडकावहि आहे. ‘ **जीवनविहारा** ’ नें अंतराळींत प्रवास केल्याचा भास येथें होतो; तर ‘ **दंवबिंदू** ’ अंगावर पडतांना खालीं मऊ मऊ जमिनीवरच आपण आहोंत ह्मणून निर्भयता वाटते.

पाहुण्यांना मोकळेपणानें घरीं आणिलें. घटकाभर आपलें घर दाखविणें, व त्याचें वर्णन करणें, हें यजमानाचें कामच आहे; परंतु घर सर्वच नवें व अद्‌भुत असलें पाहिजे असें थोडेंच आहे.

‘ **कालिदासाची कारागिरी** ’ श्री. वाटवे यांनीं दाखविली आहे. त्यांतला जिव्हाळा व प्रीति मनांत भरल्या खेरीज रहाणार नाहींत. आपलें घर सर्वांसच आवडतें ह्मणून त्यांतील उणीवा आपणांस दिसूं नयेत असें नाहीं. श्री. रानडे यांनीं चरित्र भागांविषयीं आपलें दारिद्र्य याच भावनेनें स्पष्टोक्तिपूर्वक दाखविलें आहे.

साहित्याचें राज्य! ‘रात्रिरेव व्यरंसीत्’ हा तेथला न्याय; तेव्हां चार गोष्टी इकडील तिकडील पाहिजेतच! पुष्टिदायक भोजन झाल्यावर घटकाभर बागेंत सहल करणें जसें आल्हाददायक वाटतें, तसें भरल्या विचारांचें जड ओझें बराच वेळ डोक्यावर वाहिल्यावर चार गोष्टी ऐकून मन हलकें करावें ही इच्छा साहाजिकच होते. चार दोन गोष्टी सांगून आपणांस कु. राणी ठकार, श्री. राजगुरु, व श्री. दातार प्रभृतींनीं आपली कामगिरी केली आहे.

असा हा सुधावर्षाव सर्वांस प्रियकर वाटेल आणि क्वचित् कोठें न्यूनाधिक्य असेल तें सर्व सरतेंपुरतें करून घेऊन आपुलकीच्या भावनेनें **उत्तेजन** सर्वांकडून या संघास मिळेल अशी आशा आहे; आणि कोणी तेवढाही उदारपणा न दाखवितां भांडणास उभा राहणार असेल तरी भांडावें कसें ? ’ याचें शिक्षण त्यास प्रि. सबनीस याजकडून घेण्याची व्यवस्था येथें आहेच.

मार्गशीर्ष शुद्ध २
शके १८५३.
रविवार ता. १३।१२।३१

**प्रो. द. वा. पोतदार.**
अध्यक्ष, ‘ सारस्वत–सेवा–संघ ’
सर परशुरामभाऊ कॉलेज, पुणें.

# ( साहित्य ) सुधा सेवनापूर्वी--

प्रस्तुतचें पुस्तक हा आमच्या 'सारस्वत सेवा संघांतील' सभासदांच्या मराठी वाङ्मय सेवेचा एक लहानसा प्रयत्न आहे. या पुस्तकांत आह्मांस मिळालेल्या साहित्याचा आह्मीं उपयोग केला आहे. भावी लेखक, कवी, कादंबरीकार व तसेंच टीकाकार यांना अल्पसें उत्तेजन देण्याचाच फक्त आमचा आजचा मानस आहे. येथें वाचकांना विषयांची विविधता पहावयास मिळेल. मनोरंजनाबरोबर बोधामृताचे घुटकेही प्राशन करावयास आमचें पुस्तक उपयोगी पडेल. मधून मधून विनोदाच्या रम्य लहरी मानसिक आल्हाद देऊं शकतील. एखाद्या सुंदर उपवनांत, ज्याप्रमाणें सोनचाफा, गुलाब, मोगरा वगैरे पुष्पांचा समुदाय आपल्या सुवासानें व सौंदर्यानें रसिकांचें चित्तहरण करूं शकतो, त्याचप्रमाणें आमच्या ह्या साहित्यसमुदायांतील कित्येक तेजस्वी लेख, चित्तहारी लघुकथा, व मनोरंजक कविता, वाचकांचें रंजन करतील. परंतु जसें उपरिनिर्दिष्ट उपवनाचें वर्णन करितांना त्यांतील फक्त सुवासिक सुमनांचाच विचार करून चालत नाहीं; त्या ठिकाणीं अनेक काटेरीं झुडपेंहीं आपणांस आढळतात; तद्वतच ह्या साहित्य समुच्चयांत कित्येक कमी प्रतीचेही लेख वाचणाऱ्यांना सांपडतील. आपणांस कोठेंही व कितीही शोध केला तरी, फक्त सुवासिक व सुंदर लताकुंजांचे बागबगीचे सांपडणार नाहींत. इतकेंच काय, पण ही कांटेरी झुडपं आपापल्या परीनें त्या उद्यानास शोभाच आणीत असतात. एखाद्या गुच्छाचें दुरून अवलोकन केलें असतां, मनास आल्हाद वाटतो; पण तोच गुच्छ मोकळा करून पाहिल्यास, त्यांत गुलाबासारखी सुरेख व सुवासिक फुलें आढळतात; त्याचप्रमाणें नुसतीं दिखाऊ पण वासरहित पुष्पेंही त्यांत आढळतात इतकेंच काय पण, हिरव्या गवताची पानेंही त्यांत मधून मधून खोंवलेलीं असतात. अशा रीतीनें फुलें, पानें इत्यदींचा मिळून तो गुच्छ तयार झालेला असतो. आमची **'साहित्य सुधा'** अशाच प्रकारचा एक गुच्छ आहे.

**साहित्य-सुधेस** प्रस्तावना लिहून गुरुवर्य दत्तो वामन पोतदार यांनीं आह्मांस उपकृत केलें आहे. त्याचप्रमाणें आमच्या सारस्वतसेवा संघांतील सदस्यांनी आपल्या लेखनद्वारें आमच्या ह्या कार्यास हातभार लाविला आहे. सातारा ' सिटी प्रेस ' चे प्रोप्रायटर श्री. **स. कृ. जोशी** यांनीं आमचें पुस्तक अगदीं वेळेवर छापून दिल्याबद्दल त्यांचे आभार मानणें अत्यावश्यक आहे. ' **कोहिनूर फोटो झिंको** ' चे आर्टिस्ट श्री. **एम्. जी. देशपांडे** यांनीं आह्मांस वेळेवर सुंदर ब्लॉक्स् करून दिले. त्याचप्रमाणें ह्या पुस्तकाच्या मुखपृष्ठाचें व चित्रांचें सर्व काम आह्मांस लवकर करून दिल्याबद्दल '**राजगुरु प्रेस**' चे चालक रा. रा. **श्रीपाद रघुनाथ राजगुरु** यांचेही आह्मी आभारी आहोंत.

ता. १५ डिसेंबर १९३१
सर परशुरामभाऊ कॉलेज, पुणें. } संपादक.



फोटोग्राफरः—गो. रा. परांजपे.
ज्यू. बी. एस्सी.

# कलिकेची हत्त्या


मुग्ध मुली कां, नकळत चोरुनि शिरसी उद्यानीं,
थांब, नको ती कळी लतेची स्पर्शूं स्व-करांनीं ।
तोडलीस कां हाय ! मुखीं दातांत चुरडलीस ?
दिसेल जें तें बाळ–मनाची खाण्याची हौस ॥ १ ॥

मातेला निज-बाळ, तसी ही कलिका लतिकेला ।
अज्ञपणें केलास तियेचा, कां चोळा मोळा ?
निर्दयतेनें दुःख लतेला जें तूं दिधलेंस,
"कलिका ही खुडतांच- !!" कसें तें आईला पूस ॥२॥

नूतन मराठी विद्यालय, पुणें.
ता. २५।११।३१

द. ग. कुलकर्णी.
एम्. ए.

# सारस्वत-सेवा संघ —( लेखक वर्ग )



बसलेले:—( डावीकडून )

सं. गो. त्रि. राजगुरु. श्री. वि. म. कोल्हटकर. श्री. किंजवडेकरशास्त्री. प्रि. रा. प. सबनीस.
प्रो. द. वा. पोतदार. दि. मो. हातवळणे. कु. राणी ठकार. श्री. चं. गुं. जोशी. श्री. रं. रा. देशपांडे.

# साहित्यसुधा

## भांडावें कसें?

लेखकः:— प्रिं. रा. प. सबनीस, एम्. ए. ( कँटब )

आपली – मराठ्यांची -- फार प्राचीन काळापासून भांडखोर व दीर्घद्वेषी ह्मणून ख्याति आहे.

मिळविलेलें राज्य घालवूनहि आपलें समाधान झालेलें नाहीं. जणूं काय पुरेशी अवनति झाली नाहीं ह्मणून आपण अजूनहि क्षुल्लक कारणां-साठीं वर्षांनुवर्षें वैर चालवीत रहात आहों.

आतां आपल्याला स्वराज्याचे हक्क मिळावयाचे आहेत. स्वराज्य सुराज्यहि व्हावें अशी आपली इच्छा असेल तर आपण तीन गोष्टी करावयास शिकलें पाहिजे.

(१) भांडणाची बाब क्षुल्लक व तुमचा हक्क अगदीं निर्विवाद. नमतें घ्या.

(२) भांडणाची बाब महत्त्वाची व दोन्ही बाजूंचा हक्क सारखा. नमतें घ्या.

(३) भांडणाची बाब महत्वाची व तुमचा हक्कहि निर्विवाद. निःपक्ष-पाती तिऱ्हाइताचें ह्मणणें मान्य करा. भांडण्याचा प्रसंग आलाच तर आपल्यामधील भांडणाचा परक्याला फायदा घेतां येऊं नये एवढ्या मर्यादेंत भांडण ठेवा.

ते शतं हि वयं पंच परस्परविवादने ।
परैस्तु विग्रहे प्राप्ते वयं पंचाधिकं शतम् ॥

## भांडावे कसें

भूतकाळाची जी उज्वल परंपरा असेल ती कायम ठेवणें व भूतकाळाचे दोष टाकून भविष्यकाळाची नवीन उज्वल परंपरा घालून देणें हें सुविद्य तरुणांचें कर्तव्य आहे.

ता. २२।८।३१

# चतुरिका

चंद्र चवथिचा
भूतलासि शोभवितो काय गगनिचा ॥ १ ॥
वेणि रुळतसे,
वारुळांत नागिणीस खेद होतसे ॥ २ ॥
भांग जोंवरी
विलिन शिरीं होई, कुठें बिजली नाचरी ॥ ३ ॥
नेत्र चमकती
पवनगती पळति चपल मधुप ते किती ! ॥ ४ ॥
बघुनि नासिका
लाज काय वाटतसे ? – सांग कीं शुका ॥ ५ ॥
अधर रंगले
लाल लाल; बिंबफलें लपलिं ? – नाकळे ॥ ६ ॥
नजर आननीं
राहि खिळुनि, घालि सखी मजसि मोहिनी ॥७॥
– आणि कुंचली
थांबलीच ! बावरि ही वृत्ति जाहली ॥ ८ ॥
' काय हें तरी ! –
चित्र नाहिं ' – हंसलि सखी सार्थ; माधुरी ॥९॥
' बोल चतुरिके,
देउं उत्तरासि ? ' – 'नको' हंसत लाजरी ॥१०॥

नोव्हेंबर १९३०
पुणें.

रा. न. कीर्तने

# " काव्यविषयक विचार "

लेखकः— **र. रा. देशपांडे**, बी. ए. ( ऑनर्स )

**वा**ङ्मयाचा विचार करतांना श्रीयुत केळकर ह्मणतात " वाङ्मय या शद्वाची व्याख्या आजवर अनेकांनीं अनेक रीतींनीं केली आहे. पण त्यापासून स्वतः व्याख्या करणारांनाच जें समाधान लाभलें नाहीं तें इतरांना कोठून मिळणार ? " हेच शद्व काव्याच्या व्याख्येलाही लावतां येणार नाहींत कां ? कारण काव्य झालें तरी काय आहे ? वाङ्मय हा जर एक पुरुष मानला तर त्याचें एक अंग—पाहिजे तर महत्वाचें, प्रधान, अंग ह्मणू या—ह्मणजेच काव्य. सबंध देहाला लागूं पडणारें विधान क्वचित् त्याच्या अवयवांना किंवा अवयवालाहि लागूं पडावें हा कांहीं अद्भूत प्रकार नाहीं. काव्य कशाला ह्मणावें ? कोणते गुणधर्म एकाद्या प्रबंधांत असले तर तो काव्य या सदराखालीं येऊं शकतो ? कोणत्या गोष्टींच्या अभावामुळें त्याला काव्यद्वीपाला नेऊन सोडणाऱ्या जलयानाचा परवाना मिळणेंहि कठीण होतें ? विद्वत्व आणि कवित्व यांचा कांहीं लागाबांधा आहे कां ? असला तर कोणत्या स्वरूपाचा आहे ? ह्मणजे एकादा मनुष्य विद्वान असला तर तेवढ्यामुळेंच कवीहि होईल काय ? कोणत्या परिस्थितींत काव्य निर्माण होतें ? ज्ञानाचें काव्याला वावडें आहे कीं कसें ? या गोष्टींचा विचार निरनिराळ्या देशांतील निरनिराळ्या वाङ्मयज्ञांनीं भिन्नभिन्न काळीं कमीअधिक प्रमाणांत केला आहे. संस्कृत, इंग्रजी, जर्मन, फ्रेंच—कोणतेंहि संपन्न सारस्वत घ्या. त्यांत काव्य ह्मणजे काय ? याचा ऊहापपोह प्रमुखपणें केलेला आढळेल. कारण ऐहिक जीवितांना काव्य ही वस्तु सुखप्राप्तीच्या बाबतींत मोठ्या मातब्बरीची आहे. अनेक त्रास, अनेक उचापती, दगदगी यांनीं पुरेपूर भरलेल्या संसाराच्या रखरखीत वाळवंटांत काव्य हें गोड आणि शीतल जल देणाऱ्या प्रवाहाप्रमाणें आहे. तेव्हां त्यांच्या स्वरूपासंबंधीं सर्वत्र विचार झालेला दिसल्यास तें स्वाभाविकच आहे. परंतु

नवल जर कशांत असेल तर तें यांत आहे कीं, इतक्या गोष्टी झाल्या तरी काव्याचें सारसर्वस्व, त्याचें खरेंखुरें स्वरूप, निःसंदिग्ध रीत्या सांगणें ही गोष्ट आजहि वाटतें तितकी सोपी नाहीं. इतर सर्व बाबतींप्रमाणें याहि मनोगम्य, बुद्धिगम्य बाबतींत मतभेदाचें प्राबल्य आढळून येतें.

'व्यक्ति तितक्या प्रकृति' या नियमाची व्याप्ति साध्या प्रपंचात जितकी दिसतें तितकी वाङ्मयप्रपंचात आढळत नाहीं हें खरें आहे तथापि वाङ्मयांत देखील लोक भिन्नरुचि असण्याचा जो दण्डक विधात्यानें घातला त्याचा परिणाम दिसल्याखेरीज राहात नाहीं. आपल्याला अगदीं निकटचें आणि बहुतेक बहुश्रुत वाचकांच्या परिचयाचें संस्कृत साहित्यच घ्या. असें करतांना झाल्यागेल्या घटनांवर आलेला भूतकालाचा जाड पडदा घटकाभर दूर सारून डोळे किलकिले करून आंत पाहिलें तर आपणांस काय आढळेल? इतर देशांतल्या प्रमाणेंच आर्यवर्तांतहि वाङ्मयाचा प्रभातकाळ हा काव्य-पक्षाच्या मधूर गायनाच्या मंजुल स्वरानें भरलेला आहे. अगदीं दूरवर क्षितिजाजवळ- वैदिक काल ज्यांस ह्मणतांत त्यांत - आपणांस

अभ्रातेव पुंस एति प्रतीची गर्तारुगिन सनये धनानाम् ।
जायेव पत्य उशति सुवासा उषा हस्तेव नि रिणीते अप्सः ॥

असें रमणीय उद्गार आढळतात. त्याच्या पलीकडे जरा त्वरेनेंच आलों तर उपनिषत्कालांत "जसें बाळ, एका मातीच्या गोळ्यानें सगळें मृण्मय कळून येतें -- नांव ह्मणजे केवळ शब्दांचा खेळ – माती (तेवढीच) खरी जसें बाळ, एका सोन्याच्या गोळ्यानें सगळें सुवर्णमय कळून येतें – नांव ह्मणजे केवळ शब्दांचा खेळ – सोनें (इतकेंच) खरें. जसें बाळ, एका नऱ्हाणीनें सगळें लोखंडमय कळून येतें – नांव ह्मणजे शब्दांचा खेळ – लोखंड (एवढेंच) खरें, तसाच बाळ, हा उपदेश आहे × किंवा त्यापेक्षां "ज्याप्रमाणें बाळ, गंधाराहून एकादा मनुष्य डोळे बांधून आणावा आणि मग त्याला निर्जन प्रदेशावर (एकटाच) सोडून द्यावा; तो तेथें पूर्वेकडे, उत्तरेकडे, दक्षिणेकडे, पश्चिमेकडे (तोंड करून) ओरडेल 'डोळे बांधून

× छांदोग्योपनिषत् अध्याय ६, १, ४--६,

मला आणलें, डोळे बांधून मला सोडून दिलें ' त्याचें जसें बंधन सोडून त्याला सांगावें ' या दिशेला गंधार ( आहे ), या दिशेला जा. ' तो जसा आपल्या शिक्षणाचा व बुद्धीचा उपयोग करुन विचारीत ( विचारीत ) एका गांवाहून दुसऱ्या गांवाला ( या क्रमानें ) गंधारलाच जाऊन पोंहोचेल तसेंच आचार्य लाभलेल्या पुरुषाचें जाण. तो सोडला जात नाहीं तोंवरच त्याला बिलम्ब, त्यानंतर तो संपन्न होतो + हा उतारा ( विशेषतः शंकराचार्यांच्या त्यावरील वक्तृत्तपूर्ण भाष्याच्या अनुरोधानें ) प्रस्तुत प्रकरणी उदाहरण ह्मणून दाखवितां येण्याजोगा आहे. खुद्द महाभारताचा काल ख्रिस्तपूर्व ५०० ते खिस्तोत्तर २०० वर्षें येथपर्यंत आहे ह्मणजे पुष्कळसें काव्य ई. स. पूर्वी ५०० वर्षें या कालीं उपलब्ध होतें. रामायण देखील हीच गोष्ट दर्शवितें. कारण त्याचा काल ख्रिस्तपूर्व ४०० वर्षें असा धरला जातो. रामायणांतली सरोवरांचीं, अरण्यांचीं, समुद्राचीं, आकाशाचीं वगैरे वर्णनें त्यावेळीं चांगल्यापैकीं काव्य करण्यांत येत होतें याचा उघड पुरावा होत. पुढें पतञ्जली वगैरे तर आपल्या ग्रंथांत वररुचिविरचित काव्याचा स्पष्ट उल्लेख करतात. अशा तऱ्हेची सर्व सामुग्री, घटकद्रव्य तयार असतांना काव्याचा शास्त्रोय दृष्ट्या विचार व्हावा हें केवळ स्वाभाविक होतें. पांच सात शतकें लोकांच्या त्यासंबंधीं कल्पना बनत आल्या होत्या. त्याच नियमरूपानें एकत्र आणणें हें काम शास्त्रज्ञाचें होतें आणि तें थोडे बहुत झाल्याचें निरुक्तांतील गार्ग्यांच्या नांवावर दिलेल्या व्याख्येवरून उघड होतें. × रुद्रदामन्‌चा जुनागड येथील ख्रिस्तपूर्व १५० या वेळचा शिलालेख— ' स्फुटलघुमधुरचित्रकान्तशब्दसमयोदारालंकृतगद्यपद्य ' — वगैरेवरून गुणांची कल्पना त्यावेळीं कांहीं ठरली होती हें दाखवितो. हरिषेणानें लिहिलेली समुद्रगुप्ताची प्रशस्ति तर त्या काळच्या काव्याचा उत्कृष्ठ नमुना आहे. शब्दालंकार, अर्थालंकार हे दोनहि त्यांत आहेत. यानंतर हळुहळू अश्वघोष, सुबन्धु, बाण वगैरे क्रमानें आपण ज्याला

+ छांदोग्योपनिषत अध्याय ६, १४, १--२, × " अथात उपमा यत्तदसदृशमिति गार्ग्यस्तासां कर्ता ज्यायसा वा गुणेन प्रख्याततमेन वा कनीयांसं वा प्रख्यातं वोपमिमीते थापि कनीयसा ज्यायांसम् ! " ३, १३.

अभिजात संस्कृत वाङ्मय ह्मणून ह्मणतो तिकडे येतों. आणि हें सारस्वत काव्य या दृष्टीनें गीर्वाण वाणलिाच केवळ नव्हे, भरत भूमीलाच केवळ नव्हे तर पृथ्वविरील यावत् काव्यजाताला आणि ह्मणून सर्व जगताला भूषणभूत कसें आहे तें नव्यानें सांगण्याची जरुरी नाहीं. कालिदासाचें शाकुंतल, भवभूतीचें उत्तररामचरित, बाणाची कादंबरी हीं रत्नें आपापल्या प्रकाशानें संस्कृतवाङ्मयाचें तेज अद्याप दाखवीत आहेत हीं गोष्ट सर्वास ठाऊक आहे

वरीलप्रमाणें वेदकालापासून तो अभिजात संस्कृत वाङ्मयाची समृद्धि होईतोंपर्यंत झालेल्या प्रगतीचा आढावा घेण्यांत एक हेतु आहे. तो असा कीं त्या योगानें पुढें व्हावयाचे शास्त्रिय ग्रंथ–नाट्यशास्त्र, अग्नि-पुराण वगैरेंना–आवश्यक अशी पुरेशी सामुग्री अगोदरच जुळलेली होती ही गोष्ट ध्यानांत यावी. नाहीं तरी कोणत्याहि शास्त्राचें असेंच आहे. ज्या विषयाचें शास्त्र बनावयाचें त्याची कच्ची तयारी, त्याचा मालमसाला अगोदर किती तरी वेळ जमलेला असावा लागतो. इतिहासशास्त्राला लोकांत सामाजिक व्यवहार घडून येणें, युद्धें होणें, जाति अथवा समाज बनणें, राज्यें स्थापलीं किंवा मोडलीं जाणें, शहरें वसविलीं जाणें, व्यापार चालणें हें प्रकार पूर्वगामी होत. तसेंच भिन्नभिन्न वस्तूंच्याबद्दल विचार करणें त्यांच्याविषयीं सुष्ट दुष्ट विधानें करणें, अनुमानें बांधणें या गोष्टी तर्कशास्त्राला पूर्वगामी होत. आतां पुढें पुढें एकीकड अलंकारशास्त्रावरील ग्रंथ आणि एकीकडे त्यास अनुसरून प्रत्यक्ष काव्यनिर्मिति हे दोनहि एकाच वेळीं चालू लागले हें खरें आहे. किंवा त्याच्याहि नंतर अलंकारशास्त्रावरील ग्रंथ प्रथम लिहून झालेले; नियम वगैरे सर्व ठरलेले; व त्यांस कळत न कळत अनुसरून काव्यें रचिलीं गेलीं हें निराळें. तें कसेंहि असलें तरी वेदांतील ऋचा. उपनिषत्कालीन काव्यमय लेखन, रामायण–महाभारतासारखीं महाकाव्यें, कांहीं शिलालेखांतील उतारे वगैरेंच्या द्वारां आपणास साहित्यशास्त्र ह्मणून ज्यास ह्मणतात त्यांत ' नदीमुखेनेव समुद्रमाविशत् ' या न्यायानें प्रवेश करतां येतो हें उघड आहे.

साहित्यशास्त्रांतील सर्वच ग्रंथांची यादी किंवा त्यांत येणाऱ्या विषयांची नुसती नांवनिशी येथें देणें शक्य नाहीं. कारण असे ग्रंथ पंचवीस तीस कां अधिकच आहेत. त्यांतील प्रत्येकाची विषय मांडण्याची पद्धति, त्यापैकीं एकाचें दुसऱ्याशीं असलेलें साम्य किंवा भेद वगैरे सांगू ह्मटल्यास विनाकारण जागा अडवायाची. भारताचें नाट्यशास्त्र, अग्निपुराण, भामहाचा काव्यालंकार, दण्डीचा काव्यादर्श, मम्मटाचा काव्यप्रकाश, वामनाचें काव्यालंकारसूत्र, कुन्तकाचें वक्रोक्तिजीवित, आनन्दवर्धनाचा ध्वन्यालोक आणि जगन्नाथाचा रसगंगाधर हे यांतील प्रमुख ग्रंथ होत. एवढे लक्ष्यांत असल्यास पुरें आहे. परंतु त्याहून महत्त्वाचें कार्य ह्मणजे या ग्रंथांतून काव्यविषयक ज्या निरनिराळ्या कल्पना प्रचलित केल्या गेल्या त्यांचा विचार करणें हें होय तेव्हां तिकडेच वळणें रास्त होईल.

काव्याचें स्वरूप ज्यांत वर्णिलेलें आहे अशा तऱ्हेच्या मुख्य पांच पद्धति संस्कृतांत आढळून येतात. ज्या प्रथेला काव्यांतला जो भाग अत्यंत महत्वाचा वाटला त्यावर भर देऊन तिनें आपलें विवरण केलें. कोणाला रस मुख्य वाटला; कोणाला अलंकारांत काव्यसर्वस्व आढळलें. कोणी वक्रोक्ति काव्याचें जीवित होय असें प्रतिपादिलें. कोणाला ' ध्वनी ' च्या पायावरच कवित्वाचा इमला उभा राहूं शकतो असें वाटलें. कोणाला रीति ही काव्याला निर्णायक स्वरूप देतें असें वाटून त्यांनीं तिची तरफदारी केली. या सर्वांचा आपणाला थोडा थोडा परामर्ष घेतला पाहिजे. कारण आपल्या आरंभीच्या ' काव्य ' ह्मणजे काय ? या प्रश्नाचें उत्तर देण्याचा यांत प्रयत्न केल्याचें आढळून येतें. कसाहि क्रम घेतला तरी चालेल हें खरें असलें तरी व्यवस्था ह्मणून कांहीं असते तिच्या मुरवतीस्तव आणि समजूत पडण्यास सोपें जावें ह्मणून या पांचहि प्रश्नांचा आपण कालानुक्रमें विचार करूं.

( अ ) **रसः**—यांतील सर्वांत पहिली प्रथा ह्मणजे ' रसा ' वर काव्य अवलंबून असते असें ह्मणणारी. अमुक प्रबंध काव्य कां ? तर त्यांत अमक्या रसाचा प्रकर्ष साधला आहे ह्मणून असें ही उत्तर देईल. वास्तविक मुळांत भरतमुनीनें जी रसव्यवस्था सांगितली ती नाट्यापुरतीच सांगितली. परंतु

पुढें ती इतरत्रहि लागूं पडण्यासारख्या व्यापक आणि समाधानकारक स्वरूपाची असल्यानें, तिचा विस्तार सर्व वाङ्मय क्षेत्रभर करण्यांत आला.

विभावानुभावव्यभिचारिसंयोगाद्रसनिष्पत्तिः ।

हें या पद्धतीचें मुख्य तत्व. परिभाषा समजावून सांगावाची झाली तर असें उदाहरण घेतां येईल. शृंगार हा रस निष्पन्न व्हावयाला पुरुष आणि स्त्री हे अवश्य आहेत. त्यांखेरीज शृंगाराचा अविष्कार होणें-( विभावन ) च शक्य नाहीं. ह्मणून स्त्री-पुरुष किंवा नायका-नायिका हे शृंगाररसाचे आलम्बनविभाव. आतां वर सांगितलेल्या स्त्रीपुरुषांत प्रीतीचा उद्गम होण्यास कांहीं एका प्रकारची बाह्य परिस्थिति उ. वसंतऋतु, पुष्पसुगंधित उपवन, कुन्ज, लता, चंद्रोदयदर्शन वगैरेंची आवश्यकता असतें. यांच्या योगानें त्या उभयतांच्या अंतःकरणांत असलेल्या रतीला उत्तेजन मिळतें; तेलानें ज्यात प्रस्फुरित व्हावी तशी ती प्रस्फुलित होते ह्मणून अशा तऱ्हेच्या गोष्टींना उद्दिपन विभाव ह्मणतात. आलम्बन उद्दीपनांच्या योगानें रति अविष्कृत झाली ह्मणजे तिचें स्वरूप कटाक्षक्षेपण, बाहुस्पंदन वगैरे रतीनें उघड ( किंवा अनुभूत ) होतें. ह्मणून यांस अनुभाव ह्मणतात. रति वगैरे मनुष्याच्या अंतःकरणांत नेहमी स्थिर असणाऱ्या ( परंतु ज्यांचा व्यापार कारणपरत्वेंच दिसतो अशा ) विभावांखेरीज दुय्यम दर्जाचें, त्या विभावांस सहायभूत, त्यांचें स्वरूप उघड करणारे निर्वेद, ग्लानि इत्यादि दुसरेहि कांहीं भाव आपणांत आढळतात. त्यांस ( त्यांच्या बदलत्या वृत्तीमुळें ) व्यभिचारिभाव ह्मणतात. या विवेचनावरून

नायक-नायिका (आलम्बन)+शीतल वायु, चंद्रोदय वगैरे (उद्दीपन) [विभाव] + कटाक्षक्षेपण, हस्तस्पंदन वगैरे (अनुभाव) + ग्लानि वगैरे [व्यभिचारिभाव] = शृंगाररस.

हें समीकरण ध्यानांत येतें. तेवढें कळल्यावर इतरहि रसांचें सामान्य स्वरूप समजावयास हरकत नाहीं. यावरून हें उघड होतें कीं ही रसव्यवस्था, विशेषतः अभिनय, प्राधान्यानें नाटकांत चांगली ठरेल. कारण त्यांत

उद्दीपन हे निरनिराळे हावभाव होत–कवितेंत ' शद्बच ' उद्दीपन असतात.- तसेंच या व्यवस्थेच्या बुडाशीं शारीरशास्त्र व मानसशास्त्र हीं दोनही कांहीं अंशानें असल्याचें स्पष्ट आहे. भरतमुनींच्या मतें मनुष्याच्या मनांत

रति, हास, शोक, क्रोध, उत्साह, भय, जुगुप्सा आणि विस्मय असे विभाव असतात. त्यापासूनच अनुक्रमें

शृंगार, हास्य, करुण, रौद्र, वीर, भयानक, बीभत्स आणि अद्भुत या रसांची निष्पत्ति होते.

आतां रस खरोखर आठच आहेत कां? कीं शान्तरस नामक आणखी एक रस मानावा! ' वात्सल्य ' ' भक्ति ' यांचा रसांत समावेश करण्यास काय हरकत आहे? तसें पाहूं गेल्यास श्रीज्ञानेश्वरांनीं ' माझा मराठाचि बोल कौतुकें । परि अमृतातेंहि पैजा जिंके ' या प्रतिज्ञेवर लिहिलेल्या ज्ञाने-श्वरीपासून तहत् एकनाथ, नामदेव, तुकाराम, रामदास, वामन पंडित, मोरोपंत या सगळ्यांनीं जीं ग्रंथरचना केली तिचें एकच अनन्य सामान्य लक्षण सांगावयाचें तर ' भक्ति ' चा यांत उत्कर्ष केला आहे असें ह्मणावें लागेल. असें असतां ' भक्ति ' हा नववा किंवा ' शान्त ' रस जमेस धरून दहावा रस कां मानूं नये? हे वादविवाद जितके मनोरंजक तितकेंच बुद्धीला रोचक खाद्य देणारे आहेत. परंतु आपल्या विषयाला त्यांचा फारसा उपयोग नाहीं. इतकेंच ध्यानांत ठेवले तर पुरें आहे कीं, या पद्धीतला अनु-

काव्याचें लक्षण बांधावयाचें झाल्यास ' वाक्यं रसात्मकं-काव्यम् ' हें साहित्य दर्पणकार विश्वनाथ यानें बांधिलें आहे तेंच ग्राह्य ठरतें.

रसानें आनंदप्रतीति कशी होते हा वादहि महत्वाचा आहे. परंतु त्यांतील चारहि मतें विचारांत न घेतां शेवटीं मान्य ठरलेला अभिनवगुप्ता-चा निर्णय घेऊन आपण हें रसप्रकरण पुरें करूं. त्याच्या मतें ' रति ' वगैरे विकार हे प्रेक्षक (किंवा श्रोते व वाचक) यांच्या हृदयांत सुप्त स्थितींत असतात तेच अभिनय ( किंवा शद्ब ) या उद्दीपनानें व्यापार करूं लागले ह्मणजे प्रेक्षक किंवा वाचक यांना ' शृंगारा ' दि रूपानें प्रतीत होतात. यांत नट ( किंवा शद्बसमूह ) यांच्या इतकीच किंबहुना त्यांहून अधिक महति

प्रेक्षक ( किंवा वाचक ) यांच्या मनोवृत्तीची मानली आहे. रसव्यवस्थेची मान्यता " अमका मोठा ' रसिक ' वाचक आहे " " तमकें काव्य अगदीं ' नीरस ' व ह्मणून भिकार आहे, " " सदर पुस्तक ' सरस ' काव्याचा नमुना ह्मणून सांगतां येईल, " अशा तऱ्हेच्या नेहमींच्या आपल्या बोलण्यालिहिण्यांतल्या प्रयोगावरून उघड होतें आहे.

( आ ) **अलंकारः**—दुसरी प्रथा अलंकारवाद्यांची. यांच्या मतें तो प्रबंध ' काव्य ' होय कीं ज्यांत अनुप्रासादि शद्बालंकार आणि उपमारूपकादि अर्थालंकार आहेत. या प्रथेचे पुरस्कर्ते भामह, दंडी रुद्रट वगैरे होत. यांना रस व्यवस्था माहीत नव्हती असें नाहीं. परंतु त्यांना अलंकाराचें इतकें महत्व वाटलें कीं त्यांनीं रसाला गौणस्थान दिलें आणि सेव्यसेवक भाव दर्शविण्यासाठीच कीं काय अलंकारांनाच ते ' रसवत् ' ह्मणूं लागले.

तदेवमलङ्कारा एव काव्ये प्रधानमिति प्राच्यानां मतम्

हा यांचा दंडक. यानंतर काव्यप्रकाश वगैरे ग्रंथांत अलंकारांच्या विवेचनास अधिक जागा देण्यांत आली. तरी अलंकार ह्मणजेच काव्य हें तत्व मात्र सर्वमान्य केव्हांच झालें नाहीं.

( इ ) **रीतिः**—यानंतर रीतिवादी येतात. शद्ब ( आणि अर्थ ) यांना ओज, माधुर्य, प्रसाद, श्लेष, समता, समाधि, सौकुमार्य उदारता, अर्थव्यक्ति आणि कांति हे दहा गुण असतात ही यांतील प्रधान कल्पना. आणि या गुणांचें कांहीं विवक्षित प्रमाणांत अस्तित्व असलेलें जर एकाद्या प्रबंधांत आढळलें तर त्यांत अमुक रीति आहे. ( आणि ह्मणून तो काव्य होय किंवा नव्हे ) अशी या पद्धतींतील विचारसरणी आहे.

वैदर्भी, गौडी आणि पाञ्चाली

अशा तीन रीते यांनीं मानल्या आहेत. वैदर्भींत दहाही गुण असतात, गौडींत ओज, कान्ति हे दोन प्रमुख असतात आणि पांचाली ही माधुर्य आाण सौकुमार्य या गुणद्बयानें विशिष्ट असते असें वामन—या प्रथेचा मुख्य पुरस्कर्ता--ह्मणतो. त्याच्या मतें काव्याचा आत्मा रीतीच होय—तसेंच रीति शब्दांच्या यथाप्रमाण संयोगावर अवलंबून असते आणि

नगर वाचनालय, सातारा.



गुणवत्ता असणें ही प्रमुख अट आहे असें त्याचें प्रतिपादन आहे. अलंकारवाद्यांपेक्षां रीतिवादी काव्याकलनाच्या बाबतींत पुढें गेले खास. त्यांना काव्याचा गाभा सांपडला नाहीं. गुण कोणाच्या आधारानें राहतात आणि म्हणून काव्य कोणाला म्हणावें हें त्यांस उमगलें नाहीं तरी प्राप्य वस्तूच्या ते अधिक जवळ गेले हे निःसंशय.

( ई ) **वक्रोक्तिः**—या शब्दाचें अतिशयोक्ति, बोलण्याची रमणीय तऱ्हा वगैरे अनेक अर्थ घेतलेले आहेत. खरोखर या पद्धतीची कामगिरी एवढीच, कीं तिनें एक तर कवितेंत येणारे शब्द व रोजच्या बोलण्यांतील शब्द तेच असले तरी कवितेचें वैशिष्ट्य त्या शब्दांच्या निवडींत आहे हें उघड झालें आणि दुसरें व्यावहारिक गद्य उक्तींतील वस्तुजात आणि त्यांतील परस्पर संबंध यापेक्षां कवि आपल्या सृष्टींत घेत असलेल्या वस्तु व त्यांचा एकमेकांतील संबंध विशेष आकर्षक असतात याचाही उलगडा पडला. एवढें झालें तरी वक्रोक्तीला काव्यसर्वस्व ठरविण्यांत कुन्तकाचा स्वपक्षाभिनवेश जितका दिसला तितकें विषयाकलन दिसलें नाहीं. अलंकारवाद्यांचाच एक उपपक्ष म्हणून वक्रोक्तिवाद्यांचा स्वतंत्र विचार न केला तरी चालण्यासारखें आहे.

( उ ) **ध्वनिः**----ध्वनिविचार हा वास्तविक रसविचारच. परंतु त्यास पूर्तता यावी एवढ्यासाठीं पुढें वाढविलेला आहे, असें म्हटल्यास चूक होणार नाहीं. वर एकदां आलेंच आहे कीं रसविचार प्रामुख्यानें नाटकांत उपयुक्त आहे. शाकुन्तल आणि शृंगार, महावीरचरित आणि वीर, उत्तररामचरित आणि करुण या दुकली आपल्या डोळ्यांपुढें तावडतोब उभ्या राहतात. परंतु अमुक एक श्लोक किंवा अमुक एक गद्यखंड यांत कोणता रस आहे असा प्रश्न टाकला तर उत्तर देण्यास पंचाईत पडते. कारण त्या श्लोकांत किंवा त्या गद्यखंडांत रसाचा पूर्ण आविष्कार होणें सहज--असुलभ असतें. त्यांत एकाद्या रसाची छटा येणार नाहीं असें नाहीं. परंतु तें विभाव, अनुभाव, व्यभिचारीभाव वगैरे लटांबर एका चार ओळींत कसें सामावावें? जिथें ( विभाव ) राजालाहि कोणी विचारीना तेथें त्यांचें

हस्तक किंवा सैनिक ( व्यभिचारा ) वगैरेची कोण वास्तपुस्त करणार ?— म्हणजे कशी करणार ? रस हा तरी प्रत्यक्ष अनुभवास येत नाहींच तर सूचित होत असतो हीच विचारसरणी त्रुटित, स्फुट काय हवें तें म्हणा, काव्याला लागू आहे अशा तऱ्हेचें प्रतिपादन ध्वन्यालोकानें केलें. म्हणजे ज्या लेखनांत ' व्यङ्ग ' अर्थ प्रमुख होय तें काव्य या कोटीस जाऊं शकतें असा त्याचा सिध्दान्त. या सगळ्याचें नीट आकलन होण्यास ध्वनिकारांनीं वाच्य, लक्ष्य आणि व्यङ्ग हा जो शब्दाच्या अर्थासंबंधीं भेद केला आहे तो कळणें अवश्य आहे. ' गृह '— राहावयाची जागा हा संकेतानें ठरलेला अर्थ त्या शब्दाचा वाच्यार्थ होय. ' गंगेवरील गवळवाडा ' — आतां प्रवाहावर कांहीं गवळवाडा तरंगून राहात नाहीं म्हणून गंगच्या तीरावरील किंवा तीरालगतचा गवळवाडा तो गंगेवरील गवळवाडा हा अर्थ ज्यानें घेतला जातो त्यास लक्ष्यार्थ म्हणतात. या दुसऱ्या उदाहरणांत गंगेवरून येणाऱ्या वाऱ्याच्या झुळुकी, त्यायोगें उत्पन्न होणारा हवेंतील सुखकर थंडपणा वगैरे सूचित अर्थ आपण ज्यानें घेतों त्यास व्यंग्य अर्थ म्हणतात. हा तिसरा अर्थ ज्यांत प्रमुख त्याला ' उत्तम काव्य ' म्हणावयाचें ज्यांत वाच्यार्थच आल्हादक असतो त्यास ' मध्यम काव्य ' म्हणावयाचें; आणि ज्यांत व्यंग्यार्थ हा अभावरूपानेंच असतो, वाच्यार्थ देखील तितका रम्य नसतो, आणि अर्थाच्या चमत्कृतीपेक्षा शब्दाच्या चमत्कृतीकडेच जेथें अधिक लक्ष्य असतें तेथें ' अधम काव्य ' संभवतें.

याप्रमाणें ज्यांच्या चष्म्यांतून ' काव्य ' वस्तूकडे संस्कृत टीकाकारांनीं पाहिलें त्या पद्धति समजावून घेतल्यावर काव्याच्या कांहीं व्याख्यांचा विचार करणें सोपें पडेल.

[ १ ] शब्दार्थौ सहितौ काव्यम् ।

[ २ ] तद्दोषौ शब्दार्थौ सगुणावनलंकृती पुनः क्वापि ।

[ ३ ] रमणीयार्थप्रतिपादकः शब्दः काव्यम् ।

[ ४ ] वाक्यं रसात्मकं काव्यम् ।

वागर्थांनीं पार्वतीपरमेश्वरांप्रमाणें ' संपृक्त ' असणें ही साहित्यांतील मुख्य अट पहिल्या व्याख्येंतील ' सहितौ ' या पदानें व्यक्त केली. परंतु नुसते ह्मणजे अविशिष्ट शब्द आणि अर्थ एकत्र आले तर काय उपयोग ? ह्मणून त्यांचें रंगरूप, चेहरामोहरा दोषरहित व गुणयुक्त या विशेषणांनीं सांगितलें. इतकें असल्यावर अलंकार अगदीं असलेच पाहिजेत हा आग्रह नाहीं. पण तुमचे ते दोष आणि गुण हे सामान्य जनांना कळावेत कसें ? आणि रस हीं भानगड तर त्याहून त्यांना अवघड वाटते. त्यांच्या सोयीकरतां रमणीयार्थ प्रतिपादक हें विशेषण ठीक आहे. ज्याच्या योगानें मनाला आनंद देणारा, खुलविणारा, घटकाभर मौज वाटेल असा अर्थ व्यक्त होतो तो शब्द ह्मणजे काव्य ही रसगंगाधरांची व्याख्या साधी, सुटसुटीत या दृष्टीनें ग्राह्य आहे. आनंदप्रदत्व, रम्यतायुक्तत्त्व हेंच काव्याचें अशा रीतीनें लक्षण ठरतें. वाचल्याबरोबर आनंद होतो कीं नाहीं ? वृत्ति बहरतात कीं नाहीं ? हृदय तन्मय होतें कीं नाहीं ? या प्रश्नांना ' होय ' उत्तर आलें तर तें काव्य आहे असें ठासून ह्मणण्यास हरकत नाहीं ? मग तें रम्यत्व कोठल्या तरी रसाच्या उत्पत्तीमुळें प्रतीत झालें वगैरे खोलांत शिरून सांगणें, वीररसाचा प्रस्तुत स्थलीं प्रकर्ष झाल्यानें वाचकाच्या वृत्ति थरारून जातात अशी संगति लावणें, किंवा येथें वस्तुध्वनि प्रकटला, येथें रसध्वनि प्रकटला ह्मणून सगळी बहार उडाली वगैरे विचार विद्वानांनीं खुशाल करावा. सामन्यांना त्या दुर्गम प्रांतांत शिरण्याची इच्छाहि होत नाहीं. कारण त्यांचा तितका आंवाकाच नसतो. बरें हें सर्व त्यांना न कळल्यानें मोठें नडतें आहे असें नाहीं. एखादा मनुष्य

ज्यांसि आपंगिता नाहीं । त्यांसि धरीं जो हृदयीं
तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि आणावा

या बोलावर विश्वास ठेवून आल्यागेल्याचा, आसपासच्या सग्यासोयऱ्यांचा तसाच हीनदीन परांचा शक्त्यनुसार परामर्ष घेतो. आपलें शरीरबल, धनबल त्यांच्या कारणीं लावतो. आतां परमेश्वराचा अंश प्रत्येक प्राण्यांत आहे. तेव्हां दुसऱ्यांवर उपकार करणें हें एका अर्थी त्यानें सुरू केलेल्या

या जगच्चक्राच्या गतीला मदत करणेंच होय. त्यामुळें परोपकार किंवा समाजसेवा हें पर्यायानें परमेश्वर प्राप्तीचें साधन होय हें तात्विक विवेचन त्याच्या ध्यानांत आलें नसेल. पण ह्मणून त्याच्या मनाला परोपकारापासून होणारें समाधान थोडेंच कोणी हिरावूं शकतो? हें जसें व्यवहारांत खरें तसाच प्रकार येथेंहि आहे. अमुक गद्य किंवा पद्य वाचून आह्मांला आनंद झाला, आमचें मन रिझलें. त्याचें स्वरूप चिकित्सक रीतीनें नाहीं आह्मांला सांगता येणार. परंतु एवढ्यानें ' हें काव्य आहे ' हा जो विश्वास आमच्या हृदयांत उत्पन्न झाला त्याला कोण कसा धक्का लावणार?

आतांपर्यंत झालेल्या विवेचनाचा सारांश काढणें आपल्या अंतिम हेतूसाठीं अवश्य आहे. तसेंच काव्याचें गद्य, पद्य व मिश्र असें वर्गीकरण करून संस्कृत साहित्यज्ञांनीं काव्य हें गद्यात्मक असूं शकतें हें तत्त्व उद्घोषित केलें तेंहि ध्यानांत धरावयास हवें. वरील गोष्टीचा सारांश असा: काव्याचा आत्मा संस्कृतसाहित्यशास्त्राला अनुसरून ' रम्यत्व ' हा आहे नाटकांत तो रसरूपानें अवतीर्ण होतो. काव्यांत तो ' ध्वनी ' च्या वेषांत आढळून येतो. अलंकार हे स्वतः काव्य नव्हत. परंतु स्वभावतःच लावण्यवती युवतीची शोभा वाढविणाऱ्या दागिन्याप्रमाणें तेहि कविता सुंदरींची मुळचीच सुषमा सुतराम् वाढवितात. काव्याचा विषय आकर्षक असतो. त्याची भाषा व्यावहारिक भाषेहून निराळी असते. तरी पण वृत्ताच्या बन्धनांत स्वतःचा जीव काव्यानें जखडलाच पाहिजे असा आग्रह नाहीं. बाणभट्टाच्या कादंबरीसारखे गद्यग्रंथ देखील काव्य होऊं शकतात.

काव्यासंबंधीं संस्कृत साहित्यांत केलेलें सामान्य विवेचन आपण आतांपर्यंत पाहिलें. एका दृष्टीनें इंग्रजी वाङ्मयांत याबद्दल जो विचार झाला त्यांचेहि निरीक्षण करणें अगत्याचें आहे. पहिली गोष्ट आपल्या ध्यानांत येते ती ही कीं, इंग्लिश काव्य हें संस्कृत इतकें पुराणें नाहीं. ह्मणजे त्याचा इतिहास संस्कृत काव्याच्या इतिहासाइतका जुना नाहीं. इंग्रजींत चॉसरपूर्वी कवि कोणी झालाच नाहीं हें ह्मणणें जरी अतिशयोक्ति किंवा प्रसंगीं अज्ञान यांचेंच निदर्शक असलें तरी चॉसरपासूनच नांव

घेण्याजोगी इंग्लिश कविता लिहिली जाऊं लागली हें विधान खरें आहे. त्यानंतर ठळक ठळक नांवें स्पेन्सर, शेक्सपीअर, मिल्टन, बर्न्स, स्कॉट, शेले, बायरन, कीट्स् वर्डस्वर्थ; टेनिसन, ब्राउनिंग् हीं होत. आणि आजही इंग्लंड आयर्लंड, अमेरिका या देशांत इंग्रजी वाङमयाची सेवा करणारे मान्यतेस पोंचलेले कवि कांहीं थोडे नाहींत. या काव्यांच्या त्या त्या कालीं केलेल्या परिशीलनापासून जीं सर्वसाधारण तत्वें तिकडील मीमांसकांनीं काढलीं तीं प्रस्तुत कमी महत्वाचीं नाहींत. प्रो चाफेकर यांचे शद्ब घेऊन सांगावयाचें झालें तर तार्किक सूक्ष्मता, विराट स्वरूपी विविधता या बरोबरच ऐक्यपर्यवसायी व्यापकता हीं जर इकडील विवरणाची मुख्य लक्षणें मानली तर विविष्ट वर्गीकरण आणि व्यावहारिक सुबोधता हीं पाश्चात्य वाङ्गमयाचीं ठळक चिन्हें होतील. याखेरीज आपणांस तिकडील टीकाशास्त्र दुसरीहि एक लाखमोलाची कामगिरी बजावीत असल्याचें विचारांतीं दिसतें. त्यांचें सौंदर्यसमीक्षाशास्त्र ( Aesthetic Criticism ) आपल्यावर चांगल्या गोष्टींच्या निर्मितीस कारणीभूत होण्याची जबाबदारी घेते आणि ती समाधानकारक रीतीनें पारांह पाडतें. ह्मणजे त्यांचे टीकाग्रंथ हे नुसतें आढाव्याच्या स्वरूपाचें न होतां नववस्तु—उत्पादीहि ( Creative ) होतात. याच कारणानें शेक्सपीअरादि कवींच्या मूळ कृतीइतकींच ब्रॅडले, क्विलर काउच वगैरे टीकाकारांचीं परिशीलनपर पुस्तकेंहि लोकांत प्रिय आहेत.

यांत जो काव्यासंबंधीं विचार झाला त्याचें फलहि एकरूप असें नाहींच मिळालें. कोणाला " काव्य ह्मणजे विकार व शब्द यांचें स्वाभाविक उद्रेकानंतर शरीरधारि बनण्याचें साधन याखेरीज दुसरें काय ? " असा प्रश्न करावासा वाटला. कोणाला " काव्य ह्मणजे संगीतगत विचार " अशी घोषणा करावीशी वाटली कोणाला " काव्य हें सामान्यतः कल्पनेचा अविष्कार या सदराखालीं येतें " असें वाटलें. कोणी त्याला " मानवी उद्गारांचें पूर्णतेस पोंचलेलें रूप " ह्मटलें. " कांठोकांठ भरलेल्या भावनांच्या प्याल्याची सांड किंवा परिपूर्ण कल्पनांचें ओसंडणें " असेंहि कोणी त्यास संबोधिलें. " प्रस्तुत व हस्तगत याबद्दलचा असंतोष प्रदर्शित करण्याचे

साधन " असें त्याचें कोणी वर्णन केलें. " कल्पनामय विचार व विकार यांचें वृत्तमय भाषेंत यथावत दिग्दर्शन करून सुखोत्पत्ति करण्याची कला " अशी कोणी त्याची व्याख्या करतात. दुसऱ्या एकाला " काव्य ह्मणजे सर्व ज्ञानाचें उच्छ्वसन, त्याचें सूक्ष्म जीवतत्व " भासलें, आणि त्यानें " अंतःकरणाच्या खळबळीबरोबर सहज स्फूर्तीनें बाहेर पडलेले उद्गार " असें त्याचें लक्षण बांधलें. " मानवी मनाचा सुरेल व भावनामय शब्दांत केलेला मूर्त व ललित आविष्कार " हीहि त्याची व्याख्या ह्मणून कोणी पुढें करतात. *

प्रथमदर्शनीं या सर्व व्याख्यांचा एकमेकांशी मुकाबला कसा घालावयाचा असा प्रश्न पडतो. परंतु किंचित् बारकाईनें पाहिल्यास यांतूनहि आपणास कांहीं ठळक गोष्टी महत्वाच्या ह्मणून निवडून काढतां येणार नाहींत असें नाहीं. वरील व्याख्यांत ' मानवी मन ' ' भावना ' ' विकार ' हे शब्द पुनः पुनः आले आहेत. यावरून एवढी कल्पना आपण निश्चित बांधू शकतो कीं, काव्य ह्मणजे सभोंताली पसरलेल्या अफाट सृष्टीची–जड व जीव सृष्टीची—मनुष्याच्या मनावर घडलेली कल्पनामय प्रतिक्रिया हा मुद्दा विशेष विचारार्ह आहे. कारण शास्त्र व काव्य यांमध्यें जो अनेक वेळां भेद दाखविण्यांत येतो तो याच कारणानें उद्भवतो. शास्त्राला एकादा पदार्थ हा पदार्थ या दृष्टीनेंच पारखावयाचा असतो. त्याचें पृथकरण तें करील. त्यांचे गुणधर्म सूत्रमय भाषेंत ग्रथित करून ठेवील. शास्त्रज्ञ हा या रीतीनें बोलून चालून बहिःप्रवण वृत्तीचा असतो. याच्या उलट कवि हा मनुष्याच्या अंतःकरणावर अमक्या वस्तूचा, घटनेचा काय परिणाम होईल. हें पहात असतो. त्याचा पूज्य देव मानवी अंतःकरण त्याचें सुखदुःख, त्याच्या इच्छा आकांक्षा यांना तो प्राधान्य देईल. सर्वस्वी बहिर्मुखवृत्ति राहून कविता झालीच नाहीं असें नव्हें. परंतु कवि व शास्त्रज्ञ यांतील मूलभेद सांगतांना या बाबीचा विचार करणें आवश्यक आहे. इतकें झालें तरी–ह्मणजे मनुष्याच्या

* मूळ इंग्रजी व्याख्यांसाठीं Hudson च्या ग्रंथांतील ' कविता ' या विषयावरील विवेचनाचा आरंभ पहा.

भावना, विकार, त्याचीं ईप्सितें आकांक्षा वगैरे चेतन सृष्टि व दगड, पुष्पें, लता, वृक्ष, तडाग, पर्वत, समुद्र, आकाश वगैरे अचेतन सृष्टि हे काव्याचे विषय होत हें ध्यानांत आलें तरी काव्याचे संपूर्ण आकलन झालें असें होत नाहीं. वृत्त हें काव्याला आवश्यक आहे कीं कसें या प्रश्नावर इंग्रजी टीकावाङ्मयांत रणें माजलीं आहेत. कोणी वृत्त हमखास हवेंच हवें ह्मणणारे आहेत. तर दुसऱ्या कोणी अत्युच्च काव्य वृत्ताच्या बन्धनावांचूनहि होऊं शकते असा आग्रह धरिला. अधिक खोलांत न शिरतां आपल्याला साधारणतः बहुजनसंमत ह्मणजे बहुविद्वज्जनसंमत असलेला निर्णय तेवढा घेतल्यास पुरे आहे. तो असा कीं वृत्त हें काव्याचें (अन्यस्मात्) भेदक लक्षणच केवळ नव्हे तर त्याची एक शक्ति आहे. याचीं कारणें दिली आहेत तीं अशीं: 'काव्यमय गद्य असा प्रकार वाङ्मयांत होऊं शकतो पण तें गद्यच.' रास्किन् स्टीव्हन्सन यांच्या लिखाणाला कोणी 'काव्य' ह्मणणार नाहीं. दुसरें शास्त्रज्ञांनीं असें ठरविलें आहे कीं मनुष्याच्या अत्युच्च कल्पना, त्याच्या भावनांची मोठ्यांतली मोठी झाप, त्याच्या विचारांपैकीं अतिशय परिणत स्वरूपाचे विचार, या सर्वांना वृत्तवेषांत अवतरण्याची स्वाभाविक प्रवृत्ति आहे. त्या विचारांत, विकारांत, भावनांत एक प्रकारचा ताल (Rhythm), सुरेलपणा असतो; आणि तो सुरेलपणा एकटीं वृत्तेंच व्यक्त करूं शकतात. खेरिज या तालच्या मोहक शक्तीनें सगळें विश्व भारलें आहे. पक्ष्यांचें कूजन, वृक्षगत पानांचा सळसळाट, पाण्यावरील लाटांचा खळखळ आवाज मंजुलपणें विहरत जाणाऱ्या निर्झराचा मर्मरध्वनि हीं त्याचीं मनुष्यबाह्य क्षेत्रें होत.

वरील विवेचनाचें सार ह्मणून दोन तीन मुद्दे आपणाला ध्यानांत ठेवावयाचे आहेत. एक तर संस्कृतप्रमाणें इंग्लिश वाङ्मयांत—आनंद देणें, चित्तवृत्ति खुलविणें-हेंच काव्याचें मुख्य लक्षण मानलें जातें. दुसरें वृत्तांची आवश्यकता ही इंग्रजींत काव्याला न मोडतां येणारी अट आहे. हा महत्वाचा फरक आहे. तो कां असावा हा वेगळा प्रश्न. कदाचित संस्कृत वाणीची स्वाभाविक गोडी, तिचें कर्णमाधुर्य हें 'गद्य काव्य' असा प्रकार शक्य करीत असेल. तें कर्णमाधुर्य त्या प्रमाणांत इंग्रजींत नसल्यानें

वृत्ताच्या ठेक्याचा आधार आपला पंगूपणा दूर घालविण्यासाठीं इंग्रजी कवितेस घ्यावा लागत असेल. तिसरी गोष्ट, आणि हीच आपल्याला विशेष महत्त्वाची आहे, ती ही कीं भावगीतें +— इंग्रजी काव्याचें वैशिष्टय— हा प्रकार मनुष्याच्या भावनांना काव्यासंबंधीं कल्पनेंत दिलेल्या प्रामुख्यामुळें संभवला. ह्मणूनच ' शरद् ' ( Autumn ) ' मेघ ' ( Cloud ) ' पाश्चिमेकडील वारा ' (Ode to the West Wind) अशा तऱ्हेच्या भौतिक सृष्टीच्या अवलोकनानें, किंवा ' चंडोल ' ( Sky-lark ) ' कोकिल '(Ode to Nightingale) वगैरे जीवसृष्टीशी समरसता उत्पन्न होऊन कीटस, शेले, यांच्या अंतःकरणवृत्ति खळबळून आल्या व त्यांनीं अविस्मरणीय अशीं भावगीतें आपल्या मागें ठेवलीं. याचें इतक्या विस्तारानें विवेचन करण्याचें कारण हें आहे कीं सदर काव्यप्रकाराचा आपल्या आधुनिक मराठी कवितेवर फारच परिणाम झाला आहे. आणि इंग्रजी झाल्यानंतर कृष्णशास्त्री चिपळूणकरांपासून नाहीं—तरी महाजनी वगैरे पासून मराठी काव्याला जें एक निराळें वळण लागलें त्याचें आदिकारण येथें आहे. ऐहिकाची आवड, सांसारिक वस्तुविषयक विचार, नित्यांतल्या घडामोडी यांना काव्यांत स्थान त्या वेळेपासून देण्यांत येऊं लागलें. हें पुढील विवेचनावरून कळून येईल. परंतु येथें उल्लेख केला तो अशाकरितां कीं त्यानें विषय अधिक सोपा व्हावा.

संस्कृत आणि इंग्रजी हीं दोन साहित्यें सोडून आपण मराठीकडे वळलों तर काय दिसतें ? मराठीचा अभिमान अंगी खूप बाणलेला असला तरी पण साहित्य हें शास्त्र आहे हीं कल्पना आह्मांस पूर्णपणें पटल्याचें अद्याप दिसत नाहीं, असें नाइलाजानें ह्मणावें लागतें. ( Principles of Literature) वाङ्मयाचीं सर्वसाधारण तत्वें अद्यापहि एकत्र अशीं तात्विक दृष्टीनें विचार करून ग्रथित केलेलीं वाचावयास मिळत नाहींत. तसें प्रासंगिक व प्राकरणिक लिखाण पुष्कळ झालें. ' विद्वत्त आणि कवित्व ' हा

+ यांस कोणी ' वीणाकाव्यें ', कोणी ' वैणिकें ' अशीं नांवें सुचविलीं आहेत. प्रो. लागू यांना ' कविगीतें ' ही संज्ञा संमत आहे.

मालाकारांचा निबंध झाला. मराठी काव्यावरील परीक्षण करणारीं पुस्तकें बाहेर आलीं. वेळोवेळीं झालेल्या साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षांचीं भाषणें उपलब्ध झालीं. तसेंच कांहीं 'चंद्रिका' झाल्या; कांहीं 'दीपिका' लागल्या. परंतु प्रकाश पडावयाचा तसाच राहिला. याबद्दल या ग्रंथांना दोषी धरावयाचा मुळींच इरादा नाहीं. कारण त्यांचें स्वरूप मुळांतच संस्कृत ग्रंथांचें भाषांतर इतकें संकुचित आहे. त्यामुळें सामग्र्यानें सखोल अभ्यास करून ठरविलेले सामान्य सिद्धान्त व्यवस्थित स्वरूपांत निवळ मराठी जाणणाऱ्या वाचकापुढें अजून यावयाचे आहेत. पाश्चात्य व पौर्वात्य या दोनहि वाग्दर्थींचें मंथन करणें ज्याला शक्य झालें त्यालाच तेवढें अशा मंथनानें मिळणारें नवनीत चाखतां आलें. याला कारणें अनेक आहेत हें कोणास कळत नाहीं. परंतु अमुक एका गोष्टीच्या असमधानकारकतेचें कारण अमुक एवढें सांगितलें ह्मणजे मनुष्य तेवढ्यापुरता थांबेल. परंतु ह्मणून असमाधानाची त्याच्या मनांतील रुखरुख नाहींशी होणार नाहीं. ह्मणून वर आलेलेच मुद्दे — काव्यस्वरूपाविषयीं मतभेद + वगैरे घेऊन पुनः चर्वितचर्वण न करतां आतांपर्यंत पाहिलेल्या गोष्टींवरून स्थूलमानानें जे नियम बांधतां येतात ते व उच्च काव्याची उरलेली आणखी एक अवश्य अट हीं सोयीखातर एकत्र आणूं.

१ काव्याच्या व्याख्या प्रकृतिपरत्वें भिन्न होतात. कोणाला रस, कोणाला ध्वनि, कोणाला अलंकार, कोणाला रीति, कोणाला वक्रोक्ति यांनीं काव्यनिष्पत्ति होते असें वाटतें तर कोणी मनुष्याचें मन, त्याच्या भावना यांजवर जेणेंकरून परिणाम होईल, त्यास काव्य ह्मणावें असें ह्मणतात. कोणाला केवळ शब्द रम्य असले तर पुरतात. कोणी अर्थाला प्राधान्य देतो

+ हे खालीं दिलेल्या निरनिराळ्या व्याख्यावरून समजून येतील;

(१) " उचंबळलेल्या मानववृत्तींचा शब्दरूप आविष्कार "

प्रो. लक्ष्मणशास्त्री लेले.

(२) सन्मूलक अशा सुंदर कल्पनेच्या भरारीनें युक्त असलेला अंतःकरणाचा उद्रेक. कविभूषण बळवंत गणेश खापर्डे.

परंतु या सर्वांतून ‘ रम्यता ’ एवढीच गोष्ट आपण उचलावयाची आहे. मग ती या ‘ पैकीं ’ कोणत्याही एका किंवा एकाहून अधिक कारणांमुळें उत्पन्न होवो.

२ तत्त्वज्ञान, सत्यस्वरूपशोधन व शक्य तर कथन हा महत्काव्याचा गाभा मानण्यांत येतो. आयुष्यांत येणाऱ्या नानाविध अनुभूतींना मन किंवा कल्पना या आरशांत प्रतिबिंबित होऊं देणें, तशा त्या प्रतिबिंबित झाल्यावर त्यांजकडे बोट दाखवून एकंदर जीविताचें स्थूल विवेचन करणें ह्मणजे महाकाव्य ! त्यांत निसर्ग, मानव व परमेश्वर यांविषयीं उहापोह असला पाहिजे ही अट कितीएक घालतात. आणि ती योग्यहि आहे. महत् काव्य उच्च काव्य हें केव्हांहि निवळ भ्रमरांचा गुंजारव, किंवा कलिकांचें उमलणें, किंवा सरित् समुद्राचें आलिंगन, किंवा झऱ्याचें संगीत, किंवा आकाशोद्यानांतील पुष्पें, किंवा हरित तृणांकुरावरील मोत्याप्रमाणें भासणारे दवबिंदु, किंवा प्रियेच्या केशकलापांतील गुलाब, किंवा तिच्या गालावरील गुलाब यांवर थांबून राहणार नाहीं. संसार दुःखमय आहे कीं सुखमय ? जीवित त्याज्य आहे कीं विलोभनीय व ह्मणून आदरणीय ? मनुष्याच्या पृथ्वीला स्वर्ग करू पाहणाऱ्या आकांक्षा केव्हांच पूर्ण व्हावयाच्या नाहींत कां ? ‘ सत् ’ चा अखेर तरी पण जय होईलच अशी खातरजमा आपली होतें कां ? अन्यायी लोकांचा उत्कर्ष खराच तात्पुरता आहे काय ? असे प्रश्न उपस्थित करून श्रेष्ठ मगदुराच्या जोरावर त्यांचीं उत्तरें देणें हें योग्यतासंपन्न कवीचें कार्य आहे.

३ बुद्धी व भावना यांचा सकृद्दर्शनीं वाटतो तसा अहिनकुलांतल्याप्रमाणें विरोध नाहीं. ज्ञानवृद्धि ही काव्याच्या वाटेंत अडथळा आणित नाहीं. मनाची घडणच तशी असेल, तर विद्वानालाहि उत्कृष्ट कविता निर्माण करतां येईल. परंतु तीच नसेल तर ‘ बोलणें फोल झालें, डोलणें वाया गेलें. ’ काव्यांत बुद्धिप्रधान असाही एक वर्ग संभवतो × त्यांत रस

× महादेव मल्हार जोशी Paradon चे भाषांतर विजेचा धक्का देणारा विरोधाभास इतकें लांब अर्थव्यक्तीसाठीं मुद्दाम करतात. असे धक्का देणारे काव्यरूप विरोधाभास भगवद्गीता वगैरेंतून उदाहरणें घेऊन त्यांनीं दाखविलें आहेत. लहानसा बुद्धिप्रधान तरीहि काव्यास अनुकूल चुटका ‘ एक नी एक तीन ’ ( कांहींतरी ह. स. गोखले ) हा देतां येईल.

कोणता हें ठाम सांगता येणार नाहीं. म्हणून तेथेंहि ' रम्यत्त्व ' यावरच निर्वाह करून घ्यावयाचा. पाहतां पाहतां आकाशांत एकदम जशी वीज चमकून जावी तशी एकादी कल्पना—बुद्धीला सुचणारी कल्पना–कवीला पट्‌दिशीं सांपडतें आणि तो थोडक्यांत एकादा चुटका, एकादा विरोधाभास पद्यांत ग्रथित करून टाकतो.

४ बृहत्काव्य, महाकाव्य, वृत्तांतपर काव्य या प्रकारांइतकाच स्फुटकाव्य हा एक वाजवी प्रकार आहे. कल्पनायुक्त असणें, आदि, मध्य, अन्त हे त्यांत अंतर्भूत असणें व मनाला रिझविणें, अंतःकरणांतून खळबळीसरशीं बाहेर पडणें हीं लक्षणें जशीं त्या प्रकारांना तशीं यालाहि लागतात. म्हणून केवळ लघुत्वाच्या दोषावरच स्फुट काव्याला काव्यपरिषदेंत मज्जाव करणें अन्यायाचें होईल.

येणेंप्रमाणें काव्याच्या लक्षणाविषयीं अनुक्रमें संस्कृत, इंग्रजी आणि मराठीमध्यें जे विचार झालें त्यांचें स्वरूप आपण पाहिलें. काव्याची कसोटी कोणती हा दिसावयास सोपा, परंतु खरोखर उत्तर देण्यास एक अतिशय कठीण प्रश्न आहे. अगदींच सूक्ष्मांत न शिरतां ' रम्यत्व ' हा काव्याचा निकष असल्याचें आपल्या ध्यानांत आलें आहे. या निकषावर आधुनिक मराठी कविता घासून पाहणें हें मनोरंजक तितकेंच उद्बोधक होणार आहे. तें पुढें केव्हांतरी स्वतंत्र लेखांतच पाहूं.

# गुलाबाच्या पाकळ्या

१ निरभ्र आकाशांत चमकणाऱ्या ताऱ्याप्रमाणें आपणही भूगोलावर चमकावें असें प्रत्येकास वाटत नाहीं काय?

२ दाट अंधकारापेक्षां क्षणभर चमक देणारी वीज आनंद व कौतूहल उत्पन्न करते.

३ एक अवघड यंत्र सुरळीत चालविण्याची प्रत्येक प्राण्यावर जबाबदारी आहे. — सांब —

# फोल पसारा

दिशा फांकली स्वागतार्थ हा हिरण्यगर्भाच्या
वाट पाहते आगमनाची युवती नाथाच्या ॥१॥

किरण बिंदुना उधळित आला भास्कर कित्येक
किलबिल करिती खग आनंदें ध्यास तुझा एक ॥२॥

अंशांशानें वरती चढतां फुललें जग तेजें
सूर्यकमळ हें प्रफुल्ल होता मोहित जग सारें ॥३॥

बहु आनंदे संगति—मधुनें जन मन रमवीत
दिसे चहुकड मोदछटा ही, कविमन मोहित ॥४॥

प्रभात फुलला बहु सुंदरसा, क्षणभंगूर साचा
डोक्यावरती सूर्य ठेपला दुपार समर्थांचा ॥५॥

हळू हळू मग उतरे खालीं यौवन मावळतां
व्यायामानें जन मग झाले निद्रित बहु आतां ॥६॥

दिशा रंगली, परंतु दुसरी, मोहित करण्याला
सोडुनि नभ मंडळास रश्मी भेटतसे तिजला ॥७॥

अस्त जाहला होउनि क्षय हा जग आनंदाचा
क्षण भंगूर जरि जग मज ठावे लोप न मोहाचा ॥८॥

अ. गो. काळे इंटर सायन्स

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

# पृथ्वीवरील स्वर्ग

## ( कांहीं काल्पनिक दृश्यें )

लेखकः— श्री. **गो. वि. राजगुरु**, ज्यू. बी. ए.

**वसंतरावः**— " अग! जा माझ्या बाळाला माडीवर आण. बघ किती खेळतो आहे तो! माझा जीव तो. अग, पडेल बघ-बघ- त्या झाडावर—चढतोय तो -- "

( इंदिरा आपल्या मुलास—प्रभाकरास—घेऊन माडीवर येते. )

**इंदिराः**— " शाऽऽणा माझा प्रभा. कसा सुरेख आहे तो. तानाजी आहे बरं—तानाजी— "

**प्रभाकरः**— " बाबा! कालचा तो देव कुठं लहातो-थांगा बलं? "

**वसंतरावः**— " अरे, उंच उंच त्या आकाशांत. "

**प्रभाकरः**— " नाऽऽऽइ, अं- आईन मला शांगितलं बाप्पा कोण ते—अं— "

**वसंतरावः**— " कोण रे प्रभा? "

**प्रभाकरः**— " बाबा—तुमीच—खोत नका शांगू-तुमीच देव आमते— "

.................

२

( प्रभाकर कॉलेजचा विद्यार्थी असून, वसंतराव वयानें सुमारें ४० च्या दरम्यान असतांना )

**प्रभाकरः**—" बाबा, आमच्या अर्वाचीन शिक्षणक्रमासंबंधी तुम्ही जुन्या पिढींतील लोकांनीं जर अनास्था बाळगली, तर देशाचं कधींही हित होणार नाहीं अहो, तरुणांचीं व वृद्धांची मतेंहीं कधीच जुळणार नाहींत पण एवढ्या ह्या मतभेदाचा परिणाम मात्र तरुणांच्या प्रगतीच्या सारखा आड येतो. "

**वसंतराव**:— प्रभाकर, तूं ह्मणतोस ते खरें आहे. आमच्या वेळेला इतकी सुधारणा नव्हती. मनांतून आह्मी अलिकडच्या तरुणांचा हेवा करतों; पण आमची इच्छा असते कीं तरुणांनीं आमच्या शद्वास मान द्यावा-आमचं ऐकावं- मला स्त्रीशिक्षणाची तर अत्यंत आवश्यकता वाटते. आपल्या प्रेमळेला मी कॉलेजचं शिक्षण देणार आहे-- "

**प्रभाकर**:—" बाबा, पण आपल्या प्रेमळेचा विवाह मात्र नव्या पद्धतानं करावयाचा--हुंडा द्यावयाचा नाहीं. मी तिला एक सुशिक्षित वर शोधून काढतो, व मग ' झाक ' लग्न करूं— "

**वसंतराव**:—" प्रभाकर, भावी सुखाचे मनोरे आज बांधणें मला सम्मत नाहीं. तुझें Senior चें वर्ष आहे. जा आभ्यास कर. अरे, मला कां तुमच्या गोष्टी कळत नाहींत ? तुझें प्रे-अ— "

[ प्रभाकर मनांतील आनंद बाहेर न दाखवितां आपल्या खोलीकडे-जातो ]

[ प्रभाकर बी. ए. झाल्यानंतर, एका बागेंतील दृश्य. ]

**चंद्रिका**:— " आलीकडं आपली गाठ पडणं मोठं कठीण झालं आहे. "

**प्रभाकर**:— " चंद्रिके, आपण कॉलेजमध्यें असतांना निष्काळजी होतों; पण मला आतां कॉलेजच्या वातावरणासून अतिशय भिन्न अशा ह्या व्यवहारांत पडावें लागत आहेत. "

**चंद्रिका**:— " प्रभाकरपंत, माझं ही पण शिक्षण पुरं झालं. आता एम्. ए. च्या टर्मस् भरूं कां आपली घरीं स्वस्थ बसूं — काय करूं — मला कांहीं समजत नाहीं — "

**प्रभाकर**:— " अहो, बाईसाहेब ! एखाद्या I. C. S. गृहस्थाशीं लग्न करा व सुखानें संसार थाटा — "

**चंद्रिका**:— " प्रभाकरपंत, तुमचं पुरुषांचं सर्वस्वी चुकतं तें असं अहो ! पैशाशीं कां लग्न लावायचं ? ज्या व्यक्तीबरोबर आपला सर्व भावी आयुष्यकाल घालवायचा, तिची व आपली निदान दाट ओळख तरी नको कां व्हायला ? त्या व्यक्तीबद्दल कांहीं प्रेम, त्यांचा परिचय - कां उगीच I. C. S. ह्या डिग्रीशीं लग्न लावायचं ? ! "

भा. २५३

**प्रभाकरः**— " चंद्रिके, खरंच कां ?... हे तुझेच कां विचार ! मग तुझाला विचारूं कां ?... मन माघारं घेतं तुझी रागावणार नाहीं ना ? "

**चंद्रिका**:— " छे ! प्रभाकरपंत, आपण प्रीव्हियसपासून एकत्र अभ्यास केला, खेळलों, हिंडलों– आपण असं एकमेकांपासून कांहीं कसं दडवून ठेवावं ? "

**प्रभाकरः**— " हे बघा—चंद्रिके, माझं तुझ्यावर फार—फार—प्रेम आहे; पण मी पडलों एक फाटका ग्रॅजुएट ! तर तुझ्याशीं लग्न लावण्याची माझी लायकी नाहीं. तरी पण तुझं स्पष्ट मत मला अगोदर सांगून टाक.

**चंद्रिका**:—" प्रभाकरपंत, मी तुमच्यावर प्रेम करतें, हें तुझास कोणच्या शद्बांनीं सांगू ? मी तर आपल्या सहवासांत सतत राहूं इच्छितें, पण आपल्या बाबांना द्यावयास पुरेसा हुंडा आमच्या वडिलांचे जवळ नाहीं त्याला मी काय करूं ? "

**प्रभाकरः**—" चंद्रिके, खुळी आहेस. तूं इतकी शिकलेली पण परत त्या जुन्या हुंड्याच्या चालीचें अनुकरण करूं पहातेस. मी तुला अभिवचन देऊन सांगतों कीं आमचे बाबा हुंडा ह्मणून एक पै सुद्धां घ्यावयाचे नाहींत. "

**चंद्रिका**:— " मग प्रभाकरपंत, येतां कां आमच्या वडिलांच्याकडे ? चला, आपण या विषयाचा निकाल करूं—काय सांगूं—मला फार-फार–आनंद— "

.................

३

( चंद्रिकेच्या बंगल्यावर आबासाहेब एका कोचावर बसले आहेत. चंद्रिका व प्रभाकर प्रवेश करतात. )

**आबासाहेबः**— " प्रभाकरपंत, फारा दिवसांनीं आमच्याकडं फिरकलांत ? खरंच, आतां आपण व्यवहारी बनलांत—कसची फुरसत फावतीय हो, आपल्याला ? "

भाभा २५३
३६, भवानी पेठ

**प्रभाकरः**—" आपण ह्मणतां तें खरं आहे. बी. ए. झालों. आतां पुढच्या व्यवसायाच्या शोधार्थ खटपटी करतोंय् . "

( बराच वेळ संवाद झाल्यावर, प्रभाकर चंद्रिकेबद्दल मागणी घालतो. )

**प्रभाकरः**—" आबासाहेब, क्षमा करा. मी आज फार नाजुक विषय काढीत आहे. आपल्या चंद्रिकेवर माझें निःसीम प्रेम आहे. तर लग्नबंधनानें तिच्या प्रेमाशीं बद्ध होण्याची माझी इच्छा आहे "

**अबासाहेबः**—चंद्रिके, अग, अशी स्तब्ध कां ? मी कां तुमच्या दोघांच्या विरुद्ध आहे ? पण दोघांनीं पूर्ण विचार केलांत कां ? चंद्रिके, स्पष्ट सांगतों, अजून आपल्या हिंदुस्थानांत Divorce ला पाठबळ मिळत नाहीं ! लग्न ह्मणजे जन्माच्या गाठी, तर विचार करा व मला नक्की झाल्यावर कळवा. "

**प्रभाकरः**—" अब्रू ! ह्या गोष्टीसंबंधीं आह्मीं सर्वबाजूंनी विचार केला आहे, व एकमेकांनीं एकमेकांचें दोष विसरावयाचें, व हा जीवित-नौका मोठ्या धिटाईनं हांकावयाची असें आह्मीं ठरविलं आहे; तर आह्मांस आपली संमती द्या. "

**आबासाहेबः**—" प्रभाकरपंत, माझा आतांचा आनंद दुनियेंत मावणार नाहीं ! तुमचं दोघांचं प्रेम मी आज पांच वर्षें पहांत आलों आहें; तर तुमचा हा विवाह सुखीच होणार हें खास. तरी येत्या मार्गशीर्षांत तिथी निश्चित करूं. पण...हुंडा ! . छे. मी हुंडा देत नाहीं ..अग, चंद्रिके माझ्या बँक बुकांत ४००० रुपये शिल्लक आहेत, ते मी प्रभाकराच्या विलायतच्या शिक्षणासाठीं आजच बँकेत टाकीन ह्मणतों..."

( बराच वेळ गप्पा झाल्यावर, प्रभाकर घरीं जातों )

[ प्रभाकराचें चंद्रिकेशीं लग्न होतें. विलायतेस जाण्यापूर्वी, प्रभाकर " प्रमोद " नांवाच्या एका लोकप्रिय मासिकाच्या संपादकांच्या घरीं जातात. संपादक महाशय प्रभाकराचे कॉलेजमधील मित्र असतात ]

**प्रभाकरः**—" अहो, संपादक आपल्या 'प्रमोद' नीं तर साऱ्या महाराष्ट्रांस वाङ्मयाची चटक लावून दिली आहे. आपलें भारदस्त मासिक थोड्या किंमतीनें असून, अनेक लेखकांना उत्तेजित करीत आहे. "

**संपादकः**—" प्रभाकरपंत, ' प्रमोद ' ची सुंदर सजावट हें आमचं ध्येय. आमचे लेखक आह्मांस जीव कीं प्राण ! आमचे टीकाकार खरे रसिक ! आमचे वर्गणीदार अगदीं चोख व वक्तशीर. आमचे जाहिरातदार आह्मांस मदत करण्यास सदा तत्पर. शिवाय, ' Reply stainps ' पाठविले नाहींत ह्मणून आह्मीं कोणास नडवीत नाहीं. चांगल्या लेखांस योग्य मोबदलाही आह्मीं देतो. अशा तऱ्हेनें, ' प्रमोद ' हा सर्वांचा लाडका व लोकप्रिय होऊन बसला आहे. "

**प्रभाकरः**— " आच्छा ! आह्मीं पुढच्या आठवड्यांत विलायतेस व्यापारी शिक्षण घेण्याकरितां जाणार. प्रथम बॅरिस्टरची परीक्षा देतो. नंतर जरा व्यापार विषयक ज्ञान मिळून, आपल्या हिंदुस्थानचा व्यापार कसा भरभराटीस आणतां येईल, यासाठीं झगडावयाचें मीं ठरविलें आहे. शिवाय आपल्या मजुरांची सध्याची स्थिती मला पहावत नाहीं. असो. तर मला उशीर झाला. मी जातों "
..................

५

[ बॅरिस्टर प्रभाकरपंत, प्रथम मुंबईंतील एका ' मनोहर कॉटन् मिल् ' नांवाच्या गिरणींत, परदेशाशी पत्रव्यवहार करण्याच्या कामांवर नोकरीस लागतात. ह्या गिरणींत बरींच वर्षें उत्तम रीतीनें व मेहनतीनें काम केल्यामुळें, त्या गिरणीचें निपुत्रिक मालक मनोहरपंत देवधर, हे प्रभाकरपंतास मृत्यूसमयीं आपला वारस ह्मणून मृत्युपत्रांत जाहीर करतात. आतां प्रभाकर त्या गिरणीचा मालक आहे. ]

**मजुरांचा झोरक्याः**— " साहेब, मागच्या मालकांच्या अमदानीमंदी बघा, आमी तीन संप केल्याती. पण तुमी रावसाबं, आमचं गाराण ऐकताय् ...... तर... "

**प्रभाकरः**—" ग्यानबा, तुझं काय ह्मणणं आहे ? अरे, संप करावयास कांहीं कारण तरी नको कां ? "

**ग्यानबाः**—" रावसाब पावसाळ्याचं दिवस बगा समदी चाळ पान्यानीं गळतीय—व्हं—आमची पोरं 'शीक' पडली बघा. मागल्या महिन्या-

चा रोज मिळाला नाहीं. आमचं गरिबाचं, साब, हातांवर पोटं ..गरिबावर दया करा..."

**प्रभाकरः—**( भय्यास हका मारतो. भय्या येऊन मुजरा करतो. )

" अरे भय्या, दिवाणजींना सांग कीं परेळला आपण बांधलेली नवी चाळ सध्यां ह्या मजुरांना राहावयास द्या.व ह्या जुन्या चालीच्या दुरुस्तीस लागा. शिवाय मागल्या महिन्याचें मजुरांचे पगार चुक्ते करण्याची सध्यां आपल्या गिरणीची परिस्थिती नाहीं. तरी त्यांचा निम्मा ( १५ दि. चा ) पगार आपणांस देतां येईल. तरी दिवाणजींना आगोदर ही दोन कामें करावयास सांग. ही माझी चिट्ठी घे. "

..................

६

( प्रभाकर आपलें उत्तर आयुष्य राजकरणांत घालवितो, व अत्यंत लोकप्रियता मिळवितो. प्रभाकरांस सर्व हिंदुस्थानात दुसरे महात्मा गांधी ह्मणूं लागतात. राउंड टेबल कॉन्फरन्ससाठीं हिंदुस्थानचा पुढारी ह्मणून प्रभाकर विलायतेंत गेल्यावरचा प्रसंग. )

**सरकारः—** " बॅरिस्टर, हिंदुस्थानचे काय ह्मणणे आहे? "

**बॅ. प्रभाकरः—** " सध्या हिंदुस्थानास **स्वराज्य** * पाहिजे "

**सरकारः—** " आह्मीं तुह्मांस स्वराज्य देतों, पण ती जबाबदारी आपण पार पाडूं शकाल काय? तरी आपले विचार आमच्या पुढें मांडा, आह्मी त्याचा विचार करू. "

**बॅ. प्रभाकरः—**" मायबाप, सरकार! सध्यां फक्त पांचच वर्षे तुह्मी आह्मांस स्वराज्य द्या. ह्या पांच वर्षांत आह्मीं हिंदुस्थानचें राज्य हाकूं. तुह्मीं विलायतेंत बसून मुकाट्यानें आमची व्यवस्था पहा. आमचें चुकत असल्यास, आमच्याशीं पत्रव्यवहार करून आह्मांला सुपथ दाखवा. जर आमच्याच्यानें हिंदुस्थानची नीट राज्यव्यवस्था झाली नाहीं, तर आपणास निमंत्रणपत्रिका पाठवूं, व नंतर आपण परत येऊन राज्य करावे. "

**सरकारः**-- " बॅरिस्टर साहेब! कबूल. आजपासून फक्त ५ वर्षे हिंदुस्थानला स्वराज्य देण्यांत येत आहे. बॅरिस्टर प्रभाकर, हे हिंदुस्थानचे प्रेसिडेंट नेमले आहेत. आच्छा— ' Good bye ' "

# नाटक कसें असावें ?

लेखकः—श्री. **चं. गुं. जोशी**, बी. ए. ( ऑनर्स )

प्रत्येक भाषेंतील सारस्वताचे दोन भाग पडतात. एक मनोरंजक पुस्तकांचा व दुसरा ज्ञानदायक ग्रंथांचा. नाटकें, कादंबऱ्या, गोष्टी, कविता इत्यादि पहिल्या प्रकारचें वाङ्मय चित्तरंजन करण्याच्या हेतूनेंच अवतीर्ण होत असतें. करमणूक करणें हाच यांचा मुख्य हेतु; त्याच्या अनुषंगानें उपदेशही करतां आला तर दुधांत साखर पडल्यासारखें होईल. परंतु उपदेश करण्याचा हेतुपुरःसर प्रयत्न करण्याची मुळींच जरूर नाहीं; इतकेंच नव्हें तर असा प्रयत्न हट्टानें केलाच तर तो मुख्य हेतूला विघातक होण्याचा फार संभव असतो. इतिहास, गणित, पदार्थविज्ञान इत्यादि विषयांवरील शास्त्रीय ग्रंथांचा दुसऱ्या विभागांत समावेश होतो. मनुष्याची ज्ञानसंपत्ति वाढविण्याच्या एकमेव हेतूनें प्रेरित होऊन विद्वान लेखक असले ग्रंथ लिहीत असतात. एकनिष्ठ व बुद्धिमान् अभ्यासकाचें चित्त या ग्रंथांत रमतें; तो त्यांत तल्लीन होऊन जातो हें जरी खरें असलें तरी सामान्य मनुष्याला ( Layman ) असलें पुस्तक फार वेळ हातांत धरवत नाहीं. अभ्यासकाच्या मुद्रेवर गंभीर विचारदर्शक सुरकुत्या पडतात. तर सामान्य वाचकाचा चेहरा थोड्याच वेळांत तिरस्कारदर्शक आंठ्यांनीं भेसूर दिसूं लागतो. पुस्तकांत जास्त डोकें खुपसण्याऐवजीं तो तें रागानें दूर भिरकावून देतो. परंतु पहिल्या प्रकारची, ह्मणजे ललितवाङ्मयाची गोष्ट अशी नाहीं. मोकळ्या मनाच्या व प्रेमळ अंतःकरणाच्या सर्वच मनुष्याला तें सारखेंच आनंदवितें. गंधर्वाच्या नाटकाला सर्वच प्रकारच्या माणसांची गर्दी असते, तर भारतेतिहाससंशोधनमंदिरांत चार पांचच संशोधक पण तितक्याच एकाग्रतेनें तें किचकट निबंध वाचन ऐकत असतात. अशीच गोष्ट येथेंही आहे. सामान्य वाचकाच्या आनंदांत कमी-पणा आला कीं, त्या नाटकांत कादंबरींत अथवा गोष्टींत कांहीं तरी व्यंग

प्रत ३३८ ८-९-९१



अथवा दोष खास असला पाहिजे अशी खूणगांठ बांधण्यास हरकत नाहीं. ललितवाङ्मयाच्या सरसनीरसतेची अचूक कसोटी हीच आहे. प्रथम या कसोटीवर येणारे आक्षेप निर्मूल करणें जरूर आहे. कारण कसोटी सर्वमान्य केल्याशिवाय परीक्षेला कांहींच किंमत नाहीं; रुपयाची किंमत सर्वसंमत असल्याशिवाय आपल्या वस्तूचें रुपयांत सांगितलेलें मोल कोणी मान्य करणार नाहीं; एवढेंच नव्हे तर लोकांना त्याचा अर्थही समजणार नाहीं. कांहीं आक्षेपकांचें ह्मणणें असें कीं, मनोरंजक किंवा ज्ञानदायक कोणत्या का प्रकारचें वाङ्मय असेना, तें लिहिण्यांत वाचण्यांत किंवा छापण्यांत, मनुष्याला सदाचारी बनविण्याचा एकच हेतु असला पाहिजे. हा मनुष्यजन्म इतका दुर्लभ आहे व अशा दुर्लभ जन्माचें मातेरें करण्याचा मोह पाडणाऱ्या गोष्टी जगांत इतक्या विपुलतेनें पदोपदीं आढळतात कीं, त्या सर्वांचा नायनाट करण्याचा भगीरथ प्रयत्न प्रत्येक विचारवंतानें — मग तो नाटककार असो, निबंधकार असो, चित्रकार असो, शिल्पकार असो, वक्ता असो, अथवा नट असो— केल्याशिवाय मनुष्यजातीची धडगत दिसत नाहीं. करमणूक अथवा मनरंजन करण्याला वेळ व रिकामपण आहे कोठें? पठाणांचा हल्ला घरावर आला असतां, जें सांपडेल त्यानें एकसारखें व सतत आपण जसें मारीत सुटतो. करमणूक सुचत नाहीं. व सुचणें इष्टही नसतें; तशीच गोष्ट सामग्र्यानें मनुष्यजातीची आहे." 'सैतान अथवा कलि आपणांस गिळंकृत करण्यास नेहमीच टपून बसलेला असतांना, कसली करमणूक, कसलें चित्तरंजन व कसला कलाविलास घेऊन बसलां आहांत?' असा त्यांचा सवाल आहे. त्याला उत्तर हेंच कीं, सैतानाच्या मोहचमूचा वेढा आपणाभोंवती कायमचा बसलेला आहे ह्मणूनच त्याला इतके भिण्याचें कारण नाहीं. पठाणांचाच वेढा जर एखाद्या किल्ल्याला वर्षानुवर्षें पडला तर त्या किल्ल्यातहि शर्यती कलावंतिणींचे नाच इत्यादि करमणुकींचे प्रकार अविच्छिन्न चालू राहतात हें विसरतां येत नाहीं. 'रोज मरे त्याला कोण रडे' ही ह्मण सर्वांच्या परिचयाचीच आहे. दुसरें असें कीं. अतिरेक कोणताही वाईट. सावध असणें चांगलें, पण संकटाच्या आगमनाची धागदूग अथवा जाणीव

मनाला नेहमीच बोचीत राहणें वाईट. पठाणांची भीति व तदनुसार प्रतिकार चांगला. पण भीतीनें गांगरून जाणें व कार्यमूढ बनणें केव्हांहि वाईट. अशा प्रसंगावधानशून्य माणसाच्या हातून जसा कार्यभाग होत नाहीं, तसेंच नेहमीं नीतिचाच पुरस्कार केल्यानें लोक नितीमान बनत नाहींत. अशानें, कांहीं थोडे लोक फाजील, विचारी ह्मणजे मनानें दुर्बल बनतात. मोहाचा प्रतिकार करण्यांत कुचकामाचे ठरतात. परंतु बहूजन समाजाला या अतिरिक्त नीतीची शिसारी येते; व मग ते या गोड पक्वान्नाकडे ढुंकूनहि बघत नाहींत. तेव्हां सदाचारप्रवर्तनाच्या दृष्टीनेंसुद्धां, सद्‌वर्तनाचा वेळीअवेळी डंका वाजविणें अनिष्टच ठरतें.

परंतु एका अप्रत्यक्ष ( indirect ) रीतीनें, हें सदाचार-प्रवर्तनाचें पवित्र कार्य नाटककाराला, नाटकांत जाणूनबुजून उघड उपदेश न घालतांहि करतां येते. नाटकगृहें ही वेश्यागृहांचे शत्रु होत. मनुष्यांना घाणेरड्या व्यापारांपासून निवृत्त करून, शुद्ध व्यवसायांत त्यांचें मन आपखुषीनें गुंतवून ठेवण्यास नाटकाइतकें प्रभावी, दुसरें साधन नाहीं. आणि असें गुंतवून जर ठेवलें नाहीं तर मन दुर्मार्गापासून परावृत्त राहण्याची आशाच नको. कारण मन कधीं स्वस्थ बसत नाहीं. त्याला नेहमी उद्योग हवा, व त्याचा अत्यंत आवडता व सदासाध्य उद्योग ह्मणजे. विषयलोलुपता. 'An empty mind is Satan's workshop' ही ह्मण प्रसिद्धच आहे. ज्या समाजांत, वाङ्मयाची वाढ झालेली नाहीं, त्याची अभिरुचि लोकांना लागलेली नाहीं, नाट्यकला, चित्रकला, शिल्पकला यांचे सौन्दर्य व मर्म जाणण्याची रसिकता लोकांच्या अंगीं बाणलेली नाहीं अथवा या कलांचा उपभोग घेण्याचीं साधनें, ज्या समाजांत दुर्दैवानें उपलब्ध नाहींत, त्या समाजाचा नैतिक अधःपात व नंतर सत्यानाश, फार दूर नाहींत असें ओळखावें. दुसरें असें कीं, हीं आपत्ति टाळण्याचें काम नाटक जसें शुद्ध व सोज्वळ रीतीनें करतें तसें करण्यास इतर साधनें समर्थ नाहींत. समजांतील लोक सतत भांडत राहिलें तरी देखील ते अनितीमार्गापासून दूर राहतील. पण यानें समाजाचें कांहींतरी नुकसान होतेंच. तसें

नाटकाचे नाहीं. नाटक पहाण्यापासून होणारा आनंद शुद्ध व सात्विक (pure & innocent) असतो यांत परपीडेचा लवलेश नाहीं. स्वतःच्या सुंदर अथवा कुरूप मुद्रेचें प्रतिबिंब आरशांत पाहण्यांत जसा दोष नाहीं तसाच संसारांतील सुखाचें अथवा दुःखाचें चित्र रंगभूमीवर पाहण्यांतही दोष नाहीं हें काय सांगावयास पाहिजे? तेव्हां उपदेशाच्या ठराविक हेतूनें जरी नाटक न लिहिलें तरी, एका अत्यंत शुद्ध व्यवसायांत मनुष्याचें ओढाळ व अनीतिप्रवण मन गुंतवून ठेवून सदाचारप्रवर्तनाचें कार्य, अप्रत्यक्ष रीतीनें कां होईना, पण नाटककाराला करतां येतें हें लक्षांत ठेवणें जरूर आहे.

परंतु नाटकांच्या हातून हें कार्य कसें होतें हें पाहण्यास इतक्या खोल पाण्यांत शिरण्याची मुळींच जरूर नाहीं. वरच्यासारखा द्राविडी प्राणायाम करून अथवा अप्रत्यक्ष रीतीनेंच नव्हे तर सरळ व उघड (Direct & clear) रीतीनें सुद्धां नीतिशिक्षणाचें धडे देण्याचें पवित्र काम नाटकें करीत असतात; अथवा हें काम त्यांच्या हातून न कळत घडत असतें. मात्र हा हेतू मनांत धरून नाटक लिहिलें जातें अथवा जावें असें नाहीं. उत्कृष्ट नाटककार कलाविलासाकरितांच नाटक लिहीत असतो. चित्रकाराचें व नाटककाराचे काम जवळजवळ सारखेंच आहे. विधात्यानें ही सृष्टीच अशा कांहीं खुबीनें निर्माण केली आहे कीं, तिचा कोठलाही आणि केवढाही भाग घ्या; रसिक दृष्टीला एक प्रकारचें मनोहर सौन्दर्य त्यांत दिसलेंच पाहिजे. बाचकांचें निरागस हास्य व मारेकऱ्यांचें विकट हास्य या दोन्हींतही एक प्रकारची मोहक जादू भरलेली असते. मात्र ती पाहण्याची सूक्ष्म दृष्टी असली पाहिजे, सज्जनांच्या व दुर्जनांच्या दोघांच्याही स्वभावाची परिणति (Development of Character) कोणत्या क्रमानें होत असते. स्वतःकडे अथवा जगाकडे पाहण्याची दोघांची दृष्टि किती भिन्न असतें हें पाहण्यांत फारच मौज आहे. आणि या गोष्टी अनुक्रमें चित्रफलकावर अथवा रंगभूमीवर पाहण्यांत तर याहूनही अधिक मौज आहे. वस्तूच्या मुळांतल्या सौंदर्याचें अनुकरण प्रतिकृतींत (चित्रांत अथवा नाटकांत) कितपत हुबेहुब वठलें आहे हें पाहण्याचा आनंद औरच

आहे; व हा आनंद देण्याची शक्ति जितकी अधिक तितका तो चित्रकार अथवा नाटककार आपल्या कामांत अधिक वाकबगार ह्मणावयाचा. असो. तेव्हां, जगांतील अथवा संसारांतील घडामोडींचें चित्र प्रेक्षकांना रंजविण्याच्या एकाच हेतूनें नाटककार काढीत असतो. बोध करण्याचा त्याचा हेतु नसतो; पण जगांतील घडामोडींनाच बोध करण्याची खोड लागून राहिली आहे त्याला तो काय करणार? वाङमयाविषयीं केळकर लिहितात, " ज्या अर्थी वाङमय हें मनुष्याच्या सद्भावनांनाच अलंकारिक स्वरूप देण्यानें निर्माण होतें, त्या अर्थी नीतिबोध हा वाङमयाचा ( अप्रत्यक्ष ) परिणाम होऊं शकेल. " ( नव्हे होतोच. ) तेंच नाटकालाही लागू आहे. येथें सद्भावना हा शब्द फार व्यापक अर्थानें योजिला आहे. दुर्भावनांचा दुष्परिणाम दाखविणें हीसुद्धां सद्भावनाच आहे, असा अर्थ केळकरांना अभिप्रेत आहे. असो. जग आहे तसें दाखविलें तरी काय कमी नीतीबोध होतो? जगाकडेच जरा सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें तर असें आढळून येईल कीं, कांहीं वेळ जरी उलट भास झाला तरी शेवटीं सत्याचा व नीतीचाच जय होतो. ' शेवटीं ' हा शब्द फारच मोघम वाटला. तोंवर दम न धरवला तर असेंहि सांगता येईल कीं, सन्मार्गगामी मनुष्याला नेहमींच खऱ्या सुखाची ह्मणजे मानसिक शांतीची व समाधानाची प्राप्ति होत असते; तर उन्मार्गगामी नरपशूच्या कपाळाचा मनस्ताप व असमाधान कालत्रयींही चुकत नाहीं. आणि हेंच जगांतलें सत्य जसेंच्या तसें नाटककार दाखविणार; मग नीतीबोध निराळा व हेतुपुरःसर करण्याची जरूर राहिली कोठें? शेक्सपियरनें आपलें एकही नाटक नीतिबोधाच्या ठरींव व बांधीव हेतूनें लिहिलें नाहीं; परंतु त्याच्या बहुतेक नाटकांत—विशेषतः करुणप्रधान नाटकांत (Tragedies)—सदुपदेश इतका स्पष्ट व परिणामकारक आहे कीं, त्याची बरोबरी कोणाही धर्मोपदेशकाच्या प्रवचनाला करतां येणार नाहीं. मॅक्बेथनें राज्यपदाची हांव धरून आपल्या राजाचा विश्वासघातानें खून केल्यानंतर त्याला होणाऱ्या पश्चातापाचे त्यानेंच केलेलें " To know my deed, 'twere best not know myself.

Wake Duncan with thy knocking! I would thou couldst" असें वर्णन, तसेंच "O full of scorpions is my mind, dear wife!" वर्णन ऐकून व त्याची करुण स्थिति प्रत्यक्ष रंगभूमीवर योग्य अभिनयासहित पाहून व ऐकून कोणता प्रेक्षक इस्टेटीचा वारसा मिळण्याकरितां एखाद्या नातेवाईकाला ठार मारण्याचा विचार करतांना, विचकल्याशिवाय राहील? दुर्मार्गाच्या उतार वाटेला एकदां कां गाडी लागली कीं, ती किती भरधांव सुटते व शेवटीं तिचा चेंदामेंदा कसा होतो हें मॅक्बेथ नाटकाइतकें परिणामकारक रीतीनें पटविणें अशक्य आहे. फाजील विचारामुळें हॅम्लेटची होणारी दुर्दशा पाहून, कितीतरी लोक वेळींच सावध झाले असतील? संशयखोर वृत्तिमुळें ऑथेल्लोच्या रमणीय संसाराची कशी राखरांगोळी होते हें पाहून कितीतरी कुढ्या वृत्तीचे लोक मनाचे मोकळे बनेले असतील व त्यांच्या घरांत संशयाच्या ऐवजीं प्रेमाचें साम्राज्य नांदूं लागलें असेल? लियरचा तापट व अविचारी स्वभाव व त्याचे परिणाम पाहून कितीतरी लोक निदान 'दहा अंक तरी मोजण्यास' शिकले असतील? असो. शेक्सपिअरच्या नाटकांत अशा प्रकारच्या नीतिबोधाची कोठारेंचीं कोठारें भरलेलीं आढळतील. आणि इतकें सर्व, जनरंजनाशिवाय दुसरा कोणताही हेतु मनांत न धरतां व कृत्रिमपणाचीं छायाही पडूं न देतां. तेव्हां वरील हेतूनेंच जर नाटकें लिहिलीं तर नीति-शिक्षणाला बाध येत नाहीं. इतकेंच नव्हे तर तें कार्य अत्यंत परिणामकारक रीतीनें केलें जातें, हें सिद्ध झालें.

नीति-शिक्षणाचे डोस सदाकदा दिल्यानें दुराचरणाचा रोग हटत नाहीं; इतकेंच नव्हे तर तो उलट कसा वाढतो हें वर सांगितलेंच आहे. तेव्हां 'मुद्दाम व अधिकांत अधिक बोध ज्या नाटकांत केला आहे तें नाटक उत्कृष्ट' ही आक्षेपकांची कसोटी अमान्य करणें भाग पडतें. आक्षेपकांच्या आवडत्या अशा नीतिशिक्षणाच्या कार्याचा बराच मोठा भाग, आमच्या कसोटीनें उत्कृष्ट ठरणाऱ्या नाटकांकडून सुद्धां उचलला जातो हेंही वर दाखविलें आहे. तेव्हां आतां आमची कसोटी सर्वमान्य

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत



टरण्यास कांहीं हरकत नाहीं. परंतु आणखी एक अत्यंत ठळक दोष आक्षेपकांच्या कसोटींत दाखवितां येणें शक्य आहे; व तो दोष इतका महत्वाचा आहे कीं, त्यामुळें ही कसोटी अगदीं टाकाऊ ठरते. पुराणिक नीतिपाठ देणार तो पुराणाला लोक बसले तरच ना ? व्याख्याता प्रतिपादन करणार तें सभेला लोक आले व थांबले तरच ना ? तसेंच नाटककार नीतिशिक्षण देणार तें त्याचें नाटक वाचकांनीं आवडीनें वाचलें व प्रेक्षकांनीं हौसेनें पाहिलें तरच ना ? परंतु एकदां कां नाटककार बोध करण्याकरतां नाटक लिहिण्यास मांडी ठोकून व बळेंच अवसान आणून बसला कीं, लेखणींतून गोड व मोहक शद्ब उतरण्याऐवजीं खडबडीत, व बोजड शद्बच लिहिले जातात. स्वाभाविकपणानें येणारा चटकदारपणा नाहींसा होऊन कृत्रिमतेचें साम्राज्य सुरू होतें व सारें नाटक निरस व रुक्ष होऊन जातें. अशा नाटकांचे प्रयोग करणार कोण व ते पहायला तरी येणार कोण ? कांहीं थोड्याशा विशेष गंभीर वृत्तीच्या लोकांखेरीज बहुजनसमाज, नाटकगृहांत दिल्या जाणाऱ्या असल्या शिक्षकमंडळीच्या ( नाटकमंडळीच्या नव्हे ! ) नीतिपाठांपासून दूरच राहणार ! नीति-शिक्षण न कळत दिलें तर जितका परिणाम होतो; तितका, तो हेतु जाहीर करून मुळींच होत नाहीं. श्रोत्यांचें लक्ष वेधून घेतल्याशिवाय त्यांच्या मनावर कोणतेंच तत्व बिंबवतां येत नाहीं. त्यांच्या मनाला रिझविणाऱ्या व हौस पुरविणाऱ्या अशा कोणत्या तरी गोष्टींत त्यांचें चित्त गुंतवावें; व मग मधून मधून उपदेशाचे वळसे दिले तरच कांहींतरी गुण येण्याचा संभव असतो एरंडेल रामबाण रेचक खरें; पण तें पोटांत गेलें तर ना ? तेव्हां बाळयाला न कळत सकाळच्या चहांत तें घालून कप् पुढें ठेवणें हा एकच उपाय शिल्लक उरतो. याकरितां नाटक चित्तवेधक असणें अत्यंत जरूर आहे. नाटकें प्रवचनपर बनणें इष्ट नाहीं; हें तर काय पण धार्मिक प्रवचनें सुद्धां जर नाटकासारख्या मोहक रीतीनें केलीं तर हल्लींपेक्षां कितीतरी फायदा होईल ? हल्लींची तर्ककर्कश व रुक्ष विवेचनपद्धति सोडून देऊन, रोजच्या संभाषणांतील घरगुती भाषा बोलण्यास व योग्य अविर्भाव आणण्यास जर आमचे कीर्तनकार व पुराणिक शिकतील तर

भव्य सभामंडपांत एकटेंच उभा राहण्याचा दुर्धर व शोचनीय प्रसंग त्यांच्यावर येणार नाहीं! परंतु उलट, 'जेहेत्ते कालाचे ठायीं' असल्या भाषेची व तसल्याच गहन रचनेची जर नाटकगृहावर स्वारी झाली तर तीं खात्रीनें ओस पडतील. मग ' इतो भ्रष्टः ततो भ्रष्टः ' अशी स्थिति व्हावयाची कारण, उपदेश नाहीं तो नाहींच; पण करमणूकीचें शुद्ध व सोवळें साधनही नाहींसें व्हावयाचें.

आणि करमणूक प्राणिमात्राला किती आवश्यक आहे हें काय सांगावयास पाहिजे? निराशेनें धीर कधीं खचला नाहीं, अपमानाचा एकही तडाखा बसला नाहीं, शोकानलानें एकदांही भाजलें नाहीं, व संसाराच्या सतत किटकिटीनें एकदांहि गांजलें नाहीं असा एक तरी मनुष्य भूतलावर सांपडेल काय? वरच्या सारख्या प्रासंगिक आपत्तीनें सतावलें असतां किंवा दिवसभर एकसारखें खपून जीव थकून मेटाकुटीस आला असतां, त्याचा भार हलका करणारें व मन उल्हसित करणारें एकही साधन मनुष्याला मिळालें नाहीं; तर त्याची स्थिति काय होईल ? ' All work & no play, makes Jack a dull boy ' ही म्हण अक्षरशः खरी आहे. मनुष्य म्हणजे कांहीं यंत्र नव्हे, त्याला भावना आहेत, आवडी निवडी आहेत, हौस आहे व सुखलालसा तर त्याला कधींच सोडीत नाहीं हें विसरतां येत नाहीं. यंत्र सुद्धां सतत चालविलें तर थोड्याच वेळांत निकामी होतें; मग मनुष्याची कथा काय! त्याच्या जीवनाला सुखमय व लोभनीय बनविण्याला उद्योग व करमणूक दोन्हीही हवी. एक वेळ मनुष्य उद्योगावाचून - आळशी - राहूं शकेल; ( मग त्याचे जीवन लोभनीय होणार नाहीं. ) पण सतत उद्योगांत गढलेल्या मनुष्याला करमणूक नसली तर जीवित दुःसह झाल्याशिवाय राहणार नाहीं. कसली तरी चांगली वाईट करमणूक हुडकून काढल्याशिवाय मनुष्य राहात नाहीं. नाटककारांनीं नीतिशिक्षणाच्या नादानें वेडें होऊन, ही करमणूकीची मनीषा एका शुद्ध व योग्य रीतीनें पुरी करण्याचें काम सोडून दिलें तर काय ती मनीषाच आटेल? मुळींच नाहीं. हा राजरोस व सरळ मार्ग बंद झाला तर तिचा प्रवाह, बंद केलेल्या मोऱ्या व गटारें यांची द्वारें फाडकन्

मोकळीं करून त्यांतून दुप्पट जोरानें वाहूं लागेल व सारा समाज लौकरच रसातळाला जाईल आणि मग या पापाचें खापर असल्या नाटककारांच्या डोक्यांवर फोडण्यास काय हरकत आहे ? ह्मणून ही शुद्ध करमणूक केव्हां ही बंद होतां कामा नये. तिची शुद्धता काय वर्णावी ? जिच्यापासून दुसऱ्याला व स्वतःला सारखाच आनंद होतो ती कृति कमालीची पवित्र व उपकारक ह्मणण्यास हरकत नाहीं; ज्यापासून मन व शरीर या दोहोंचेंही अधःपतन काडीमात्र होत नाहीं त्या व्यवसायाइतका सोज्वळ व्यवसाय दुसरा कोणता असणार ? ज्या कलेच्या प्रसारानें समाजाची घडी व नीतिमत्ता यत्किंचितही बिघडत नाहीं; उलट तो आनंदी व उत्साही बनतो तिचें अभिनंदन किती करावें ? हे सर्व गुण नाट्यकलेच्या अंगीं आहेत व ही करमणूक गमावल्यास व्यक्तीचें व राष्ट्राचें जीवन दुःखमय व नीरस झाल्याशिवाय राहणार नाहीं. नीतिशिक्षणाच्या रूपानें नाट्यकला जिवंत राहिल्यास ' करमणूक ' या दृष्टीनें ती मृतवत् होणार यांत शंका नाहीं व मग वर सांगितलेले सर्व गुण आणि आनंददायकत्व नाहींसें झाल्याशिवाय राहणार नाहींत. तेव्हा कलाविलास व चित्तरंजन हेंच ध्येय नाटककारांनीं, प्रामुख्यानें डोळ्यांपुढें ठेवलें पाहिजे, हें सिद्ध झालें व हीच कसोटी ग्राह्य ठरली.

आतां कलाविलासाकरितांच नाटक लिहावयाचें ह्मणजे काय करावयाचें तें पाहूं. दारूच्या व्यसनाचें निर्मूलन करण्याच्या हेतूनें, पुनर्विवाहाचें समर्थन करण्याकरतां, स्वदेशीव्रताचें मंडन करण्याकरतां किंवा असलाच कोणता तरी विशिष्ट हेतु डोळ्यांपुढें ठेवून नाटक लिहूं नये; तर मनुष्यस्वभावाचें ( Human Nature ) यथावत् दिग्दर्शन करण्यामध्येंच नाटककारानें आपलें कौशल्य खर्चून स्वतः कलाविलास करावा व प्रेक्षकांनाही या विलासांत रममाण करावें. कलाविलास या शब्दाचा अर्थ असा दुहेरी आहे. नाटक पाहतांना आपण आपल्या घरांतच बसलों आहोंत व नेहमींच्या व्यवहारांत भेटणारीं माणसेंच बोलत आहेत असें वाटलें पाहिजे. नाटकांतील पात्रांवर संकटांचा कहर कोसळत असतांना, प्रत्येक प्रेक्षकाला, "But for the Grace of God I go there"

असें वाटलें तरच तें नाटक, असें एका इंग्रजी टीकाकारानें ह्मटलें आहे. तसेंच पात्रांना सुखप्राप्ति होत असलेली पाहूनही अशीच स्वानुभवाची खूण त्याला पटली पाहिजे. 'असा एकहि शब्द, एकही कृत्य, एकही आविर्भाव नाटकांत आणणार नाहीं कीं, जो सत्यसृष्टीला सोडून व अनैसर्गिक आहे' अशी महत्त्वाकांक्षा नाटककाराची असली पाहिजे. एखादा चित्ताकर्षक देखावा दिसला कीं, चित्रकार ज्याप्रमाणें हिरवा, निळा, पिवळा असें प्रत्यक्ष सृष्टींत आढळणारे रंग जमा करतो व त्यांच्या, कुशल योजनेनें त्या देखाव्याचें हुबेहुब दर्शन आपणांस घडवितो तसेंच नाटककारानें केलें पाहिजे. मनुष्यप्रकृतिरूपी विविध रंग कल्पना पेटीच्या ( Colour Box ) निरनिराळ्या कप्प्यांत तयार करून रंगभूमीवर चित्रें अशा खुबीनें नाचवावीं कीं, प्रेक्षकही देहभान विसरून आनंदानें नाचूं लागावेत ! या रंगमिळवणीला **Divine Mixture** ह्मणतात. सारे रंग ईश्वरानें परम चातुर्यानें निर्माण केलेल्या या दिव्य सृष्टींतलेच; पदरचा एकहि नाहीं अशी खबरदारी घेतली पाहिजे. शेक्सपियरला ही रंगभरणी चांगली साधली होती. त्याचें एकही नाटक उपदेशाच्या हेतूनें लिहिलेलें नाहीं. प्रेक्षकांना स्वतःचाच चेहरा व स्वतःचाच संसार नाटकगृहांत दिसावा हें एकच ध्येय त्याच्यापुढें होतें. त्याच्या छत्तीस नाटकांचीं नुसतीं नांवेंच पाहिलीं तर यथादर्शनाखेरीज इतर कोणतीही इच्छा त्याच्या मनाला शिवली नाहीं, हें उघड दिसतें. 'Macbeth' 'Cymbeline' 'Romeo & Juliet' अशीं प्रमुख पात्रांचीं नांवें किंवा 'Tempest' 'Midsummer Night's Dream' अशीं प्रसंगदर्शक नांवें अथवा 'A Winter's Tale' 'Twelfth Night असलीं मोघम नांवेंच त्याच्या नाटकांना दिलेलीं आढळतात. परंतु 'एकच प्याला' 'पुण्यप्रभाव' 'सत्तेचे गुलाम' असलीं नांवें प्रथमदर्शनींच असें जाहीर करतात कीं, उपदेशकाची भूमिका नाटककारानें स्वीकारली आहे. स्वभावदर्शनपर ( Portraying Human Nature ) नाटकें दिक्कालातीत असतात. शेक्सपियरची नाटकें इंग्लंडमधील लोक जितक्या हौसेनें वाचतात तितक्याच हौसेनें हिंदुस्थानांतही वाचतात. त्या नाटकांच्या खेळांना शेक्सपियर जिवंत असतांना जशी गर्दी

लोटत असे, तशीच आताही लोटते. कालिदासाच्या 'शाकुंतल' नाटकाचीही अशीच स्थिति आहे. बर्नार्ड शॉचीं नाटकें इतर दृष्टींनी कितीही सरस असलीं, तरी अजून दोन तीन पिढ्यांनीं त्यांचे प्रयोग कोणीही करणार नाहीं; फार झालें तर उत्तम भाषेचा नमुना ह्मणून कांहीं व्यासंगी लोक आपल्या शेल्फवर त्यांची स्थापना करतील व फुरसतीच्या वेळीं पारायणें करतील; यापेक्षां त्यांना अधिक किंमत राहणार नाहीं, असें पुष्कळ विद्वान् टीकाकारांचें ह्मणणें आहे. याचें कारण शॉचीं बहुतेक नाटकें समाजसुधारणेच्या अट्टाहासानें लिहिलीं आहेत. विवाहसंस्था सुधारण्याकरतां 'Getting Married' वेश्यांविषयीं सहानुभूति उत्पन्न करण्यकरतां, 'Mrs. Warren's Profession' स्त्रीस्वातंत्र्याचा पुरस्कार करावा या हेतूनें 'Candida,' अशी त्याच्या बहुतेक नाटकांची स्थिति आहे. आतां स्वभावदर्शनही त्याला चांगलें साधत असल्यामुळें कलाविलास या नाटकांत अगदींच नाहीं असें नाहीं. पण कलेपेक्षां उपदेशावरच शॉनें अधिक लक्ष खर्चिलें आहे; व यामुळें त्या नाटकांचें आकर्षकत्व व महत्व आज जसें वाटतें तसें अजून पाऊणशें वर्षांनीं वाटणार नाहीं. परंतु शेक्सपियरनें कलेशिवाय दुसरी देवता चिंतिलीसुद्धां नाहीं मग ध्यान दूरच राहिलें! कलेचाच तो एकनिष्ठ भक्त होता. अर्धवट कला व अर्धवट नीति असला प्रकार त्याच्या नाटकांत नाहीं. कसें तें थोडक्यांत पाहूं. अंगांत धडाडी व पराक्रम आहे, 'शेंडी तुटो कीं पारंबी तुटो' अशा निकरानें झगडण्याची धमक व तयारी आहे, लोकांत चोहोंकडे मानमान्यता, आदर व प्रेमही थोडेंबहुत आहे; परंतु सत्तेची व वैभवाची विलक्षण हांव (Ambition) मनांत आहे, फाजील कल्पनाशक्तीमुळें मोहरीएवढें दुःख अथवा भय पर्वतासमान भासत आहे, मुळांत मन पापभीरु असतांही जिवलग पत्नीचा शब्द मोडवत नाहीं ह्मणून तिच्या आसुरी बेताला संमति देण्याचा व तदनुसार वर्तण्याचा मोह आवरत नाहीं. व अशा रीतीनें, एकदां का दुर्गुणाच्या भोवऱ्यांत गोंवला गेला कीं, जीव कासावीस होऊन, व सद्विचार नष्ट होऊन दुर्गुणसागरांत खोलच खोल जाऊन वरच्या बहुमोल गुणांचें मातीमोल होऊन जात आहे. अशा

प्रकारचीं माणसें या जगांत कितीतरी आढळतात! अशा एका माणसाचें चारित्र ' मॅक्बेथ ' नाटकांत वर्णिलें आहे. पतीच्या सुखाकरतां स्वतःच्या स्त्रीसहज कोमल भावना, शांति आणि सुख या सर्वांची होळी करणाऱ्या एका कर्तबगार, बाणेदार व कारस्थानी बाईचें चित्र लेडी मॅक्बेथच्या रूपानें रेखाटलें आहे. हीं दोन चित्रें शक्य तितकी भडक व हुबेहुब रेखाटणें या एकाच गोष्टीकडे नाटककारानें लक्ष पुरविलें आहे. मुद्दाम एखादें तत्त्व बिंबविण्याकरितां अथवा एखाद्या प्रचलित रूढीचा निषेध करण्या-करितां एकही प्रवेश किंवा प्रसंग फार काय वाक्यसुद्धां घातलेलें नाहीं जेथें जो खुलेल तोच प्रवेश, जो योग्य तोच प्रसंग व बोलणाराच्या तोंडांत शोभेल असेंच वाक्य घालण्याची सर्वत्र काळजी घेतली आहे. कृत्रिमपणा कोठेंही नाहीं. जगांत पदोपदीं आढळतात तसलींच पात्रें व तीं सहजगत्या व स्वभावानुरूप करतात तींच कृत्यें शेक्सपियरनें नाटकांत दर्शविलीं आहेत. मॅक्बेथसारख्या स्वभावाची माणसें जगांत जितक्या विपुलतेनें आढळतात तितक्याच विपुलतेनें ऑथेल्लोसारखींही आढळतात. हॅम्लेटसारखीं ज्यांच्या तेजस्वी कर्तबगारीला फाजील विचाराचें खग्रास ग्रहण लागलें आहे, असलीं माणसेंही या भूतलावर कांहीं थोडींथोडकीं नाहींत. लियरचीही तीच गोष्ट. त्याचप्रमाणें इमोजेन, ज्यूलिएट, व्हायोला, व हरमियोन यासारख्या एक-निष्ठ व बाणेदार ( ज्यूलिएटाशिवाय—ती परम प्रेमळ आहे पण बाणेदार नाहीं ) सतीही जगांतून अद्याप नाहींशा झाल्या नाहीत. एकंदरींत काय, तर दिक्कालातीत अशा प्रकृतिवैचित्र्याचें दिग्दर्शनच या नाटककाराच्या नाटकांत आढळेल. उपदेश अथवा तत्त्वविचार जरी कोठें आढळला तरी तो परिस्थिति व पात्रस्वभाव यांस पोषक असाच व त्याच्या अनुषंगानेंच. नदीचें मुख्य ध्येय समुद्राला भेटण्याचें; परंतु जातां जातां ती ज्याप्रमाणें नानाविध तटप्रदेशांनाही आपल्या परिचयानें सस्यशाली करते तसच उप-देशाच्या बाबतींत आहे. " To be or not to be is the question " " Uneasy lies the head that wears the crown " " Time & hour run through the roughest day. " " Blood will have blood "

या सारखीं तत्वें ठिकठिकाणीं आढळलीं तरी त्या त्या नाटकांचा अथवा प्रसंगाचा हेतु हीं तत्वें बिंबविण्याचा मुळींच नाहीं. पहिलें वाक्य, हॅम्लेटच्या तोंडीं आहे पण त्याचा हेतु, संसाराचें संतापकत्व पटविण्याचा नसून हॅम्लेटच्या विचाराची धांव कोठवर जात असे हें दाखविण्याचा आहे. दुसऱ्याचा हेतु ' व्याप तितका संताप ' हें शिकविण्याचा नसून त्या राजाची ( Julius Caesar ) मनःस्थिति दाखविण्याचा आहे. तिसऱ्याचा हेतु कालांतरानें दुःखशमन कसें होतें हें दाखविण्याचा नाहीं. तसेंच चौथ्याचा हेतु ' पाप कधीं झांकत नाहीं ' हें सांगण्याचा नसून मॅक्बेथला वाटणारी असुरक्षितता दाखविण्याचा आहे. असो. कलाविलासाकरितांच शेक्सपियर कसा लिहितो हें समजण्यास इतरही गमकें आहेत. त्याचा आतां विचार करूं

गोष्ट, कादंबरी अथवा नाटक यांचा शेवट जितका बहारीचा तितकी त्यांची योग्यता व परिणामकारकता अधिक असते. कारण, इतस्ततः विखुरलेल्या सर्व कथासूत्रांची गुंतागुंत काढून त्या सर्वांची एक गांठ बनविणें हें फार कठीण काम आहे. शिवाय, नाटक संपल्यावर घरीं जातांना व गेल्यावर, ठळकपणें लक्षांत राहणारा म्हणजे शेवटचा प्रवेशच होय. कलाविलासवाले व उपदेशवाले या दोन्ही नाटककारांच्या कथानकसमाप्तींत मोठाच फरक असतो पहिल्या प्रकारच्या नाटकांचा शेवट नैसर्गिक व केव्हां दुःखात्मक आणि केव्हां आनंदात्मक असतो. दुसऱ्या प्रकारच्या नाटकांत शेवट कसा तरी ओढून ताणून केलेला असतो व सदाचाराची श्रेष्ठता पटावी म्हणून नायक-नायिका आनंदानें एकमेकांना कडकडून भेटतात व आनंदानें चिरकाल संसार करतात असेंच ठराविक दृश्य असल्या बहुतेक नाटकांच्या शेवटीं असतें. शेक्सपिअरच्या वर उल्लेखिलेल्या चारी नाटकांचा शेवट कितीतरी स्वाभाविक आहे! मॅक्बेथसारख्या फाजील महत्वाकांक्षी माणसाचा शेवट या जगांत जसा होत असतो तसाच दाखविला आहे. अशा माणसाचा अधःपात होत होत, शेवटीं त्याचा नाश होणार हें ठरलेलेंच असतें; व तसेंच मॅक्बथ्चें झाल

आहे. संशयी मनुष्याचे डोळे, संशयित व्यक्तीच्या प्रत्यक्ष बलिदानानें तिचें निरपराधत्व सिद्ध झाल्याशिवाय उघडत नाहींत व अशा रीतीनें ते उघडल्यावर दुःखावेगानें व पश्चात्तापानें ते कायमचेच मिटतात असाच अनुभव जगांत येतो व असेंच ऑथेल्लोचें झालें आहे. हॅम्लेट व किंग लियर या नाटकांचीहि अशीच गोष्ट आहे. प्रेक्षकांच्या भावना दुखवल्या जातील अशा फाजील भीतीनें अथवा नीतीचा सुपरिणाम प्रत्यक्ष दाखविण्याच्या भलत्याच भरीस पडून एकाही ठिकाणीं ओढाताण शेक्सपियरनें केली नाहीं अर्थात् सिंबेलाईन्, टॅंपेस्ट्, वुइंटर्स टेल हीं नाटकें (Romances) याला अपवाद आहेत, व त्यामुळें त्याचीं किंमतही इतर नाटकांपेक्षां कमी आहे. परंतु शेक्सपियरनें जाणून बुजून व प्रयोगादाखल (as an experiment) त्यांचा शेवट आनंदीआनदांत केला आहे. तथापि या नाटकांतही, शेवटचा प्रवेश सोडून दिला, तर यथादर्शनास कोठेंही बाध आणलेला नाहीं, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. नाटकाचा शेवट असा झाला पाहिजे असें अगोदर ठरवून शेक्सपियर नाटक लिहावयास बसत नाहीं. स्वतःच्या आवडीनुसार विशिष्ट प्रकारच्या स्वभावाचीं माणसें नाटकांत मूर्तिमंत उभीं करणें हा एकमेव हेतू मनांत धरून तो लिहूं लागतो; या कार्याला आवश्यक अशा प्रसंगांची तो जुळणी करीत जातो व प्रामाणिक विद्यार्थ्याप्रमाणें, उदाहरणाचें उत्तर अगोदर ठाऊक करून न घेतां, क्रमाक्रमानें व पायरीपायरीनें शेवटपर्यंत तें सोडवीत जातो; रीत बरोबर आहे अशी खात्री असल्यामुळें उत्तराची तो फिकीर करीत नाहीं; परंतु तें कधींच चुकत नाहीं! पण तेंच मराठी नाटकांचें पहा. उत्तराशी कशी तरी गांठ घालण्याचा हास्यास्पद प्रयत्नच बहुतेकांत आढळतो. उत्तर आपल्या परीनें योग्य असतें, पण ज्या रीतीनें तें प्राप्त झाल्याचा आव आणलेला असतो तिच्याशीं मात्र तें अत्यंत विसंगत असतें एवढेंच काय तें! 'शारदा' नाटकच उदाहरणार्थ घेऊं. जरठकुमारीविवाहाच्या निंद्य रूढीचें दोषाविष्करण करण्याचा हेतु मुळांत उदात्त खरा; पण नाटकाची उभारणी त्यावर करणें योग्य नाहीं. तथापि वरील हेतु व यथादर्शन, दोन्हीही नाटककाराला साधतां आलें असतें. एका वृद्ध कपीशीं आपला विवाह होणार हें पाहून, कुमारिकेच्या मनाची स्थिति काय होतें,

एवढेंच दाखविल्यानें जितका परिणाम होतो, त्यापेक्षां अधिक परिणाम, या विपरित विवाहानंतर त्या तरुण पत्नीचें आयुष्य किती दुःखमय होतें, आपल्या यच्चयावत् आकांक्षा जाळून टाकणें तिला कसें भाग पडतें, हें दाखविल्यानें झाला असता. शिवाय अशा स्थितींतल्या प्रत्येक कुमारीची आत्महत्या करण्यापर्यंत तयारी होते किंवा प्रत्येकीला ऐन वेळीं वांचविणारा कोदंड भेटतोच, अशांतला प्रकार मुळींच नाहीं. शारदेसारखें शिकंदर नशाब थोड्यांचेंच असतें. तेव्हां, शारदेचा आत्महत्येचा प्रयत्न यशस्वी झाला व या मार्गानें ती पुढच्या त्रासांतून सुटली ( कोदंडाशीं विवाह होऊन नव्हे. ) असें दाखविणें वस्तुस्थितीला धरून झालें असतें. परंतु शेंकडा नव्याणव कुमारी इतक्या करारी नसतात. गळ्याला दोरी बांधून बाप जिकडे नेईल तिकडे जावें, एवढेंच या गरीब गाईंना ठाऊक असतें. ह्मणून आमचे ‘ श्रीमंत ’ खरोखरच चतुर्भुज झाल्याचें दाखविलें तर याहूनही चांगलें झालें असतें. वस्तुस्थितीचा विपर्यास झाला नसता, पुष्कळ जरठ पतीच्या डोळ्यांत ‘ अंतरींची खूण पटून ’ झणझणीत अंजन पडलें असतें, अनेक कांचनभटजी आपल्या कन्येचें जीवन किती रमणीय(?) होणार आहे, हें पाहून ताळ्यावर आले असते व चार पांच तरी ‘ श्रीमंतांनीं ’ ह्मातारपणाचा हा ( विवाहाचा ) भलता नाद सोडून दिला असता. अशा रीतीनें उपदेशाची तहान भागवून, यथादर्शनाचेंही श्रेय पदरांत पाडून घेतां आलें असतें. ‘ यथादर्शन हेंच नाटककाराचें मुख्य काम आहे ’ ही गोष्ट देवलांनीं याच बाबतींत दृष्टीआड केली. त्यांना थोडा वेळ वाटलें, नाटक ह्मणजे हिराबागेंतील सामाजिक व्याख्यानच आहे ! त्यांतच आणखी ‘ नाटकाचा शेवट दुःखांत कधींही नसावा ’ या संस्कृत नाट्यशास्त्राच्या नियमाची भर पडली ! मग काय विचारावें !

परंतु संस्कृत नाटककारांना नाटकाचा शेवट दुःखांत झालेला खपत नाहीं, याचा अर्थ संस्कृत नाटकांतही यथादर्शन अगदींच नसतें असा मुळींच नाहीं. शाकुंतल उत्तररामचरित, मृच्छकटिक इत्यादि नाटकें जगविख्यात होण्याचें कारण, त्यांतील उत्कृष्ट यथादर्शन हेंच होय. शाकुंतलांतील अप्सरांविषयींचा भाग आणि उत्तररामचरित व मृच्छकटिक यांचा

शेवट एवढीं ठिकाणें वगळली तर सबंध नाटक वाचीत असतांना धक्का बसल्यासारखें केव्हांही वाटत नाहीं. परिचित अशाच देखाव्यांचीं चित्रें डोळ्यांपुढें नाचत असतात. शकुंतलेला पाहून दुष्यंताची झालेली मनःस्थिति दुष्यंताला पुनः एकवार डोळा भरून पाहण्याकरतां, वेलीला अडकलेला पदर सोडावण्याच्या निमित्तानें केलेलें सिंहावलोकन, प्रियकराच्या ध्यानानें होणारें देहविस्मरण, इत्यादि गोष्टी कोणाच्या अनुभवांतल्या नाहींत ? विशेषतः शकुंतला सासऱ्याला जाते वेळीं ' अर्थो हि कन्या परकीय एव ' हे कण्वाच्या तोंडून निघालेले उद्गार, ह्या नाहीं त्या शब्दांत प्रत्येक कुटुंब-वत्सल पित्याच्या तोंडून अशा प्रसंगीं निघाल्याशिवाय राहात नाहींत. एक घर सोडून दुसऱ्या घरीं कायमचें जातांना, बालपणाच्या सवंगड्यांचा व प्रिय जन्मभूमीचा आगामी विरह किती तीव्रतेनें प्रत्येक कन्येला जाणवतो हें समजून घेणें असल्यास शाकुंतलाचा चौथा अंक वाचावा. इंग्रजीमध्यें भाषांतर होऊन ( The Lost Ring ) इंग्लंडसारख्या दूरच्या देशांतही ' उत्कृष्ट नाटक ' ह्मणून गाजण्याची योग्यता शाकुंतलास प्राप्त झाली आहे ती वरच्यासारख्या सरस व सर्वसामान्य ( universal ) प्रसंगा-नींच होय. कालिदासाचा हेतु कलाविलासाशिवाय दुसरा कोणताही नव्हता ह्मणूनच नाटक इतकें सरस वठलें. कोणी ह्मणतात पुत्रप्राप्तीचे महत्व पटविण्याकरतां ' शाकुंतल ' लिहिलें आहे. पण तें बरोबर नाहीं. असो. उत्तररामचरिताचीही योग्यता कांहीं कमी नाहीं. चिरविरहानंतर होणाऱ्या भेटींत गतदुःखाची आठवण काढीत बसण्यांत जो विलक्षण आनंद असतो, त्याची ओळख पहिला प्रवेश वाचतांना पटते. राम-चंद्राच्या विवाहाच्या प्रसंगाचें चित्र दाखवीत असतांना, सीतेनें ' आणि ही कोण ? ' असा प्रश्न उर्मिळेकडे बोट दाखवून विचारला असतां लक्ष्मणाची उडणारी तारांबळ कोणाच्या अनुभवांतली नाहीं ? रामाचा शोक दोन अर्थांनीं हृदयस्पर्शी आहे. रामाचें दुःख आपलें हृदय सहानुभूतीमुळें अनु-भवूं लागतें; इतकेंच नव्हे तर या प्रकारच्या स्वतःच्या गतदुःखाची ओळख पटून तोही अनुभव याच वेळीं येतो. ' अविदितगतयामा रात्रिरेवं व्यरंसीत् '

हा श्लोक उत्कृष्ट कां हें सांगण्याची जरूरी नाहीं. तमसा व सरला या नद्यांच्या तोंडांत घातलेलीं भाषणें त्यांच्या भिन्न प्रकृतीचें (character) निदर्शन फारच उत्कृष्ट रीतीनें करतात. सिंबेलाईन नाटकांत शेक्सपियरनेंही राजाचीं दोन मुलें बोलत असतांना, असेंच चातुर्य दाखविलें आहे. उत्तर-रामचरित्राचा शेवट मात्र कृत्रिम व त्यामुळें नीरस आहे. मूळ कथेचा असा विपर्यास, वर दिलेल्या नाट्यशास्त्राच्या नियमामुळें मुद्दाम करण्यांत आला आहे. परंतु या नाटकाला ट्रॅजेडीच म्हटलें पाहिजे. मृच्छकटिक नाटकांत सामान्य प्रतीच्या लोकांचा जीवनक्रम फारच यथार्थतेनें (Realistically) दाखविला आहे. हा त्याचा विशेष होय. जुगारी लोक कसें बोलतात, चालतात, राजाश्रयानें उन्मत्त झालेल्या दुराचारी लोकांपासून सन्मार्गवर्ती व दुर्बल प्रजेला— विशेषतः अबलांना कसा त्रास होतो, वेश्येच्या कुळांत जन्मलेली स्त्री नीतिमान् असूंच शकत नाहीं, अशी लोकांची ठाम समजूत हीं सार्वत्रिक व सार्वकालिक दृश्यें या नाटकांत फारच हुबेहुब रंगविलीं आहेत. मैत्रेयभटजीसारखीं, वृत्तीनें बावळट, डोक्यानें मठ्ठ पण अंतःकरणानें अत्यंत सात्विक व प्रेमळ माणसें कितीतरी आढळतात. धूतेसारख्या निर्मल भावाच्या त्यागी पतिव्रता अजूनही हिंदु समाजांत आहेत. वसंतसेनेसारख्या वेश्या दुष्प्राप्य असल्या तरी अप्राप्य खास नाहींत. शेवट मात्र कृत्रिम वाटतो; पण त्याचें कारण वाचकांना ठाऊकच आहे. या तिन्ही नाटकांची लोकप्रियता यथादर्शना-मुळेंच होय, हें आतां निराळें सांगणें नकोच.

'यथादर्शनद्वारा कलाविलास' म्हणजे काय याची कल्पना येण्यास, एवढीं उदाहरणें बस्स आहेत. शेक्सपियरच्या नाटकांत यथादर्शनाचें शुद्ध व उत्कृष्ट स्वरूप पाहावयास सांपडतें. संस्कृत नाटकांना एका शास्त्रीय बंधनामुळें, या बाबतींत थोडें गौणत्व आलें आहे; परंतु तें म्हणण्यासारखें नाहीं. परंतु लहानशा कलंकामुळें, चंद्राच्या तेजाविषयीं शंका कोणासही येत नाहीं. संस्कृत नाटककारांना शास्त्राचें बंधन नाइलाज म्हणून पाळावें लागलें आहे. यथादर्शनाची अवघड कला त्यांना अवगत आहे, हें त्यांनीं

निःसंशय सिद्ध केलें आहे. नाटकाचा हेतू यथादर्शन, हेंही त्यांस मान्य आहे. पण मराठी नाटकांचें तसें नाहीं. बहुतेक नाटककारांनीं उपदेशाची नसती धोंड, आपण होऊन गळ्यांत बांधून घेतली आहे; व सगळीकडे रुक्षपणाचें साम्राज्य माजविलें आहे. त्यामुळें त्यांना यथादर्शन करतां येतें किंवा नाहीं, हें समजण्यालाहि मार्ग नाहीं. 'अंदरकी बात राम जाने'; पण या नादानें खऱ्या नाट्यकलेचें मात्र वाटोळें झालें आहे. कसें तें सविस्तर व सोदाहरण पुढें केव्हां तरी पाहूं.

## हृदयदेवतेस

जातिः– बालानन्द

विचार कसला हा वेडे ? कां घेशी आढेवेढे ?
प्रेमाचें अवघड कोडें सुटें विचारें कां थोडें !
दुःखद सारा संसार असेंच सारे रडणार !
आयुष्याचें चित्र नवें, रंग भरूं या जसें हवे ॥१॥
माझ्या हृद्याचा खजिना, गुप्त आजवर सकलांना.
जीवाच्या राणीसाठीं आज काढली अडकाठी.
रहस्य-रत्नें कितीतरी असती माझ्या हृदंतरीं !
तीं रत्नें तुझियाच करीं पहा शोभतिल खरोखरीं
प्रणयाचा झुलता पूल, जपून टाकूं या पाऊल !
प्रेमाच्या करितीं वेली— कुंज; साउली घन खालीं
उद्यांच त्या वेली वरती मुदें नाचतील फुलें किती ?
लावुं नको तिरपी दृष्टी भरेल तवहि मधु सृष्टी
पुरें ! कुंचली घे आतां तुझी वाढली उत्कंठा
सुरेख बसतिल रंग तुझे 'कारण सांगा पाहुं कसें ?'

शं. रा. कानेगांवकर

# पहा हो ही !

( लेखकः—श्री. **मोरेश्वर गोविंद सोमण**, बी. ए )

या शिकलेल्या स्त्रिया अश्या अश्या पुरुषांच्या डोक्यावर बसणार ! उघडच आहे; आहेच तशी त्यांची योग्यता ! बरं आतां शिकल्या सवरल्या ह्मणून साधें लेणें लेतील तर नांव नको! नटायला, थटायला, मुरडायला यांना हवं ! शालु नेसतात, ते सुद्धां किती तऱ्हतऱ्हेचें ? कधीं केशरी, कधीं गुलाबी, कधीं डाळिंबी तर कधीं किरमिजी ! आमची ‘ ही ’ सुद्धां अगदीं अशीच ! ! हिचं नाक सुद्धां कसं अगदीं पोपटासारखें आहे हो ! आणि त्या नाकांत चमकी किती छान शोभते ! जिथचा अवयव तिथं असला ह्मणजे अस्स सौंदर्य चढतं, अस्स तेज खुलतं ! —घर पहावं तर किती विलासी ! महालांतील कोंड, गालिचा कसा जरतारिनें मढवलेला. आह्मी विचारतों कीं एवढ्या विलासी कां ? तर ह्मणे आह्मी विलासी असल्याशिवाय इकडली स्वारीच मुळी विलासी रहात नाहीं; आमचें सौंदर्य पाहून डोळ्यांचं पारणं यांनीं फेडावं. नवीन फॅशन आह्मी पाडावी, आणि तिचं अनुकरण या पुरुषांनीं करावं, आह्मी यांच्या डोक्यावर असलों म्हणजेच यांची बुद्धी तरतरीत रहाते; वकिलीणबाई पक्षकाराला कसं फसवावं याचा कानमंत्र देते. या बोटावरची थुंकी त्या बोटावर कशी करावी, याचा धडा व्यापारीणबाई ‘ इकडे ’ देत असते; बुद्धीमत्तेचें चाटण मुत्सद्याची बायको ‘तिकडे’ देत असते. कायद्याच्या चौकटींत चौकसपणें कसं बोलावं याचा धडा न्यायाधीशीणबाई आपल्या पतिराजांना देत असते; समयोचितपणाच्या आदर्शांत कसं पहावं हें कीर्तनकारीण आपल्या यजमानांना शिकवीत असते; पहा हो, ही दुसऱ्यावर पगडा बसविणारी कोण ती ! कोण ह्मणजे ? अहो ती आपली पगडी !

# आनंद !

आनन्द ! – अतां निस्यन्द
पहा येणार –
औदास्य भासतें तें सारें जाणार !

या लता – दीन; म्लानता
सोडुनी कांहीं –
धरणार फुलांच्या राशी आपुल्या बाहीं !

निर्झरी - गान-माधुरी
दिव्य रागांत -
येणार अतां ही श्रवण-पथाच्या आंत !

कोकिळा – काढुनी गळा
स्वयंस्फूर्तीनें
गातील ! - जगत् हें भरतिल त्या नादानें ?

ही क्षिती पहा सम्प्रती –
प्रेमरस पूर्ण,
होणार – चला या लुटूं प्रेम तें तूर्ण ?

द. रा. कानेगांवकर.

॥ श्रीकृष्णप्रसन्न ॥

बडोदे, ता. १५-८-३१.

प्राणप्रिय मालती,

सप्रेम नमस्कार विशेष. असं अगदीं निर्वाणीचं पत्र कां बरं पाठवलंस? अशी रागाऊं नको गडे! खरंच! किती किती दिवस म्हणतें आहे कीं आज पत्र पाठवीन, उद्यां पाठवीन म्हणून. पण काय विचारतेस आम्हां संसारांत गुंतलेल्या बायकांचं? वेळ रिकामा असा नाहींच! कारण रिकामपणीं करण्याची अशींच मुळीं असंख्य कामं साठून राहिलेलीं असतात. येईल तुलाहि अनुभव!

माले, तूं इतकी शिकलेली आणि माझं मत काय मत विचारतेस? मी काय सांगणार तुला प्रेमोत्तर विवाह सुखावह कीं विवाहोत्तर प्रेम सुखावह तें? आजकाल तर प्रीतिविवाहांना उत्तेजन देणारे आणि उत्साहानें पाठबळ देणारे सामाजिक पुढारी आहेत, आणि माझं वेडंचं मत घेशील तर उगीच फशी मात्र पडशील? हें पहा! मला कीं नाहीं मतबित कांहीं समजत नाहीं. मी आपली तुला सरळ माझी स्वतःची हकीगत सांगतें म्हणजे माझं मत तुला कळेल.

माझं लग्न अगोदर कमलाकरांशीं ठरलं होतं, पण तें मोडलं इतकंच तुला ठाऊक आहे. त्याचा पूर्ण इतिहास तुला सांगितला पाहिजे. मी कमलाकरांना अगदीं लहानपणापासून पहात आलें आहे. मला कळण्यापूर्वीच माझं मन त्यांचं झालं होतं; पण त्यांची योग्यता माझ्यापेक्षां शतपटीनें मोठी! मग त्या सुखाचा संभव कोठून असणार? आधींच काळ्याकुट्ट असणाऱ्या भविष्यकालाच्या काळोखांतल्या, या अशक्यतेच्या भीषण छायेनं मला भयभीत केलं. मी त्यांना माझ्या दुर्दैवी भावनेची वार्ताहि लागूं दिली नाहीं. मी मॅट्रिक झालें त्याच वर्षी आजारी पडलें. त्या गोष्टीला आज पांच वर्षें झाली, पण तो प्रसंग माझ्या डोळ्यांपुढें स्पष्ट दिसतो. मी वांचेन अशी कोणालाहि आशा नव्हती. मी अगदीं शांत

होतें, पण वेड्या मनाच्यानें राहवलं नाहीं. ऐहिक सुखाच्या शिखरावर जाणं नाहीं तर नाहीं, पण त्या शिखरावरून आलेली लहर तरी लागेल अशा फोल आशेनें मी मनाचा मोठा हिय्या करून माझ्या आण्णाला एक दिवशीं—अगदीं जवळ जवळ शेवटच्या घटकेला ह्मणेनास—सांगितलं, " आण्णा, एकदां कीं नाहीं कमलाकरांना भेटावंसं वाटतं " माझ्या मनाचा ठाव आण्णालासुद्धां नव्हता; पण माझा अण्णा प्रेमळपणाची आणि चातुर्याची मूर्ति! त्यानें प्रसंग जाणून घरीं कोणालाही खरी स्थिति न कळवतां, जसें कांहीं त्याच्याबरोबरच भेटायला आल्याप्रमाणें कमलाकरांना आणून माझी भेट करवली. मी त्यांना फक्त इतकंच बोललें, " इतकीं वर्षं माझं मन ताब्यांत राहिलं, पण या शेवटच्या घटकेला दुबळं झालं आहे. पण क्षमा मागण्याचा अगदीं पाप्यांतल्या पाप्यालासुद्धां हक्क असतो, मग मला नाहीं का क्षमा होणार? " त्यांना काय वाटलं कोण जाणे! ते मजकडे पहात राहिले; माझा हात आपल्या हातांत घेऊन ते ह्मणाले, " अगोदर बोलली असतीस तर! "

माले, या शब्दांचा अर्थ मी मूर्ख ह्मणून सरळ घेतला. दुर्दैव माझं कीं जवळ जवळ स्वर्गाला पोंचलेल्या माझ्या आत्म्याचं नालायकीमुळेंच कीं काय अधःपतन होऊन पुन्हां या दुर्भागी कुडींत त्याला प्रवेश करावा लागला. ती वेळ टळून मला उतार पडला आणि मी बरी झालें.

ते शब्द माझ्या कानांत घुमत होते; पण सत्य सृष्टि अगदीं कठोर ग! माझ्याबद्दल माझ्या अण्णानें एके दिवशीं त्यांना विचारलं तेव्हां ते स्पष्ट ह्मणाले, " मी तसं बोललों खरा, पण मला वाटलं नव्हतं ती जगेल ह्मणून; एवढं उभं आयुष्य मरतांना उच्चारलेल्या एका अज्ञ पोरीच्या शब्दासाठीं मी गुरफटून टाकावं, असं मला आपण कसं सांगतां? ती वेळच चमत्कारिक होती ह्मणून त्यावेळीं सहानुभूति दाखवणं मला अयोग्य वाटलं नाहीं; पण ती जगली ही गोष्ट जशी विपरीत झाली तशीच ही माझ्या नकाराची झाली असं समजा. " बस्स्! तेव्हां पासून माझं मन जळून गेलं.

माले, मी कमलाकांतांशीं लग्न केलं यांत तुला नवलं वाटलं असेल. माझा त्या वेळचा विचार मी तुला सांगितला तर तूं मला अडाणी ह्मणून

नगर वाचनालय



नोंदणी २८७३

हंसशील; पण अडाणी असला तरी विचार, होता अविचार नव्हे, असं तुलाहि कबूल करावं लागेल. मनापासून नाहीं तर नाहीं, जळून गेलेल्या आशेच्या राखेनें जोगीण बनून तरी दुसऱ्या कोणाची -- ज्यांच्या रक्षणाखालीं मला बाबासाहेब आणि आण्णा ठेऊं इच्छितील त्यांची -- सेवा करणं मला अशक्य नाहीं. या एकाच विचारानं मी बाबासाहेबांच्या आणि अण्णाच्या इच्छेला अनुमति दिली. आतां मी सर्वस्वी मला इतक्या प्रेमानें संभाळणाऱ्या कमलाकांताचीच आहे, यापेक्षां जास्त तुला काय सांगू ? मला मागची आठवण होते, पण माझ्या मनाला कांहीं अस्वस्थता वाटली तर तेहि अस्वस्थ होतात, ह्मणून मी शक्य तों मागच्या आठवणी बुजवून टाकण्याचा प्रयत्न करतें. मी त्यांना एकदां मोकळेपणानें सर्व हकीगत सांगितली, त्यांना वाईट वाटलं पण माझ्यावरचं त्याचं प्रेम वृद्धिंगतच होत आहे त्या उदारहृदयी सत्पुरुषाची सेवा करण्यांतच मला सुख वाटतं. ह्मणून माले, विवाहोत्तर प्रेम सुखावह होतं असं माझं मतच नव्हे तर मला अनुभव आला आहे. प्रीतिविवाह सर्वत्र अयशस्वी ठरतील असं माझं मुळींच ह्मणणं नाहीं. पण खरा प्रीतिविवाह ह्मणायचा तर खरीखुरी प्रीति जडायला आणि ती इतकी उत्कट व्हायला अमर्याद काळ लोटला पाहिजे. हल्लीं हमेश आपल्याला जे प्रीतिविवाह ऐकूं येतात, त्यांत साधारणपणें, एखादा वरवर असल्यामुळें दिसणारा असा लहानसा गुण एकमेकांमध्यें दिसल्यामुळें लक्ष वेधून, दोघांचीहि प्रवृत्ति स्वतःबद्दल दुसऱ्याचं मत चांगलं करण्याकडे झाल्यामुळें, दोघांचा खराखुरा स्वभाव एकमेकांच्या नजरेस पडण्याचा कांहींच संभव नसतो. अर्थात्च, खरी स्थिति ओळखण्यापूर्वीच ती ओळखली आहे अशा खोट्या कल्पनेनें दोघेही एकमेकांना चांगुलपणाची मूर्ति समजून देव्हाऱ्यांत बसवितात. आणि गोष्टी कळसाला पोंचण्याला दुसरी एक प्रबल मदत असते, आणि ती ह्मणजे चुकीच्या भावनेची. प्रथमपासूनच, "माझं मन यांच्यावर (किंवा हिच्यावर) जडूं पहात आहे कीं काय ?" अशा तऱ्हेची भावना नाविन्यामुळें उत्पन्न होते आणि त्या भावनेच्या जोरावर दोघेंहि ती खोल गेली आहे कीं नाहीं, नुकत्याच लावलेल्या रोपानें मूळ धरलं आहे कीं नाहीं

५४७६०

हें पाहिल्याशिवायच त्यांच्या बळकटीवर विश्वासून फशीं पडतात. कारण, जास्त सहवास झाल्याबरोबर स्वाभाविक गुणदोष लपून राहणं शक्य नसतं आणि ते शेवटीं अस्वस्थता उत्पन्न करायला कारणीभूत होतात. तेव्हां अशा तऱ्हेच्या डळमळीत पायावर कळसाला पोंहोचूं पाहणाऱ्या प्रीतीविवाहापेक्षां एकनिष्ठेच्या भक्कम पायावर मुंगीच्या पावलांनीं कां असेना पण पक्केपणानें चढत जाणारं विवाहोत्तर प्रेमच अधिक श्रेष्ठ नाहीं कां ठरणारं ? हल्लीं जिकडे तिकडे ऐकूं येणाऱ्या ' प्रेमोत्तर विवाहां'चं पर्यवसान शेवटीं ' विवाहोत्तर प्रेमां'तच होत असावं, असं ह्मणायचा धीर करावासा वाटतो. मला माझं मत विचारलंस ह्मणून मी आपलं वेडंवांकडं असलं तरी प्रामाणिकपणानं सांगितलं, इतकंच. योग्यायोग्यता ठरवायला तूं कांहीं अज्ञ नाहींस आणि डिबेट्मध्यें बोलण्याचा हा प्रसंगही तुला नवीन नाहीं.

पण, काय ग, माले! एक विचारूं कां? नाहींतर रागावशील तुझ्या कॉलेजला आणि तुझ्या वर्गबंधूंना नांवें ठेवलीं तर! वयानें मी तुझ्याहून फारशी मोठी नसलें तरी तुझींमाझी क्षेत्रं भिन्न आहेत, ह्मणून तुमच्यामध्यें गणून घेण्याचं भाग्य आणि अधिकार मला पोंचत नाहीं, पण ओघानेंच आलं ह्मणून बोलतें. हा विषय डिबेटसाठीं ठरवला कोणी ? कीं, कोणी नेमून दिला ? कीं, आकाशांतून पडला? कारण बळजबरीनें लादल्यासारखा कांहीं विषय आणि शेवटीं कांहीं निर्णय केल्याशिवाय सभा बरखास्त करायची, ही तुमची तऱ्हा. परवां ह्मणें कायसासा एक विषय घेऊन सर्व कॉलेजेस्मध्यें डिबेट सुरूं केलात आणि पुढें चालूं रहाणं अशक्य झाल्यामुळें बंद केलात! पुढच्या पिढीचा आधारस्तंभ असणारा तरुणवर्ग जबाबदारीनें खरोखर विवेचनीय असे विषय वादविवादांकरितां घेतो आणि त्यांवर विचार करतो. असं समजून मृगजळावर विश्वास ठेवायचा, कीं ज्यांच्यावर समाजाची स्वाभाविकपणें भिस्त आहे त्या तरुणांना, जबाबदारीनें, समाजाच्या बळकटीसाठीं व उन्नतिसाठीं ज्यांचा उहापोह आवश्यक आहे, अशा प्रश्नाबद्दल एकत्र जमून विचारविनिमय करण्याची अक्कल नाहीं असं समजायचं तूंच सांग! नुसतां आचरटपणा करण्याकरितां कां असले विषय घ्यायचें?

मग अशी शोभा करायची असेल तर अशा प्रकारच्या सभांना ' इंटरकॉले-जिएट डिबेट ' ह्मणून उच्च नांव देऊन त्या नांवाची तरी शोभा घालवूं नये. समयाला उचित असं यथार्थ नांव हुडकून काढलंत तर अशा बैठकींना साजेल तरी ! कॉलेज ह्मणजे मौज कीं जबाबदारी ? कॉलेजमधील आयुष्य ह्मणजे आयुष्यांतला 'मे' असं मी ह्मणतांना ऐकतें. मी अनुभव घेतला नसला तरी आयुष्याचा भर तारुण्याचा हा काळ असल्यामुळें आनंदी वृत्ति सहाजिकच उसळत असणार, हें मी कबूल करतें. पण आनंदाचा उपभोगसुद्धां मर्यादे-बाहेर गेला कीं त्या आनंदांतल्या सात्विकपणाचा पूर्ण लोप होतो. असो.

पत्र लांबत चाललं. तुला काय? केवढ्याही लांबीचीं पत्रं वाचायला तयारी आहे तुझी, पण मला उद्योग आहेत. आपलं लिहायला टांक घेतला कीं चालू होतो इतकंच! भरमसाट भरकटण्याला हंसूं नको ह्मणजे झालं ! नाहीं तर ह्मणशील मॅट्रिक झालेली मुलगी आणि पत्र लिहितां येईना.

उत्तर कधीं पाठवशील ? तुझ्या डिबेटची सर्व हकीकत कळव बरं कां ? आळस केलास तर पहा! वडील माणसांना सविनय सा: नमस्कार आणि लहानास सप्रेम आशीर्वाद कळव. जास्त काय लिहूं ?

तुझीच,

**कमला**

.........................

# गुलाबाच्या पाकळ्या.

१ मानवी गरजा विस्तृत व आकुंचित करतां येतात.

२ स्वच्छ सरोवरांत पडणाऱ्या वृक्षप्रतिबिंबाप्रमाणें आपण आपल्या कृती सुविचारगिरिनिर्झरांत उमटून पहाव्यात.

— सांब —

[library stamp]

# फुकट मिरवायला हवें !

लेखकः—**वासुदेव रामचंद्र होनप**, इंटर ऑर्टस्.

"हे ! मला वाटलंच तें ! शेजारच्या दिनूजवळून घेतलास ना नकाशा ! अन् आतां "सरा" जवळून शाबासकी मिळवायची असेल? करायची काय असली शाबासकी ! त्यापेक्षां तुह्मी स्वतः काढांना, वाईट आला तरी चालेल. ज्याला त्याला फुकट मिरवायला हवें ! दुसऱ्याच्या गुणांवर स्वतःची बडेजावी ! लहानापासून थोरापर्यंत हेंच ! जीवाचा अटापिटा करून काम करायचें भलत्यानें पण फोटोंत चेअर मात्र सेक्रेटरीला ! मी ह्मणतें तुह्मांला जर मान हवा आहे तर मान मोडून काम करायला कां माघार? तुमचें स्वतःचें कांहीं 'मेरिट' दाखवा कीं, खुशाल रवीन्द्रनाथ टागोरांच्या गीतांजलींतले उताऱ्याच्या उतारे भाषान्तर करून स्वतःच्या नांवावर दडपताहेत ! हो ! कबूल, रूपान्तर किंवा अनुवाद करण्यांतहि Skill आहे, पण "अनुवादक" अमुक अमुक ह्मणून लिहा कीं, तिथें "लेखक" चा टेंभा कशाला? तसाच तो परवां कोण दादाचा क्रिकेटर मित्र त्याच्याकडे आला होता तोहि ! ह्मणे युरोपियन जिमखान्यावर किंग जार्ज एलेव्हनशीं मॅच आहे तर तुझा ब्लेझर कोट देतोस कां? वारे !--- या दादासाहेब; बरे आलात. हें बघ आज किनई आमच्या महिला मंडळाचा आहे वार्षिक समारंभ, अन् मी आहे त्याची चिटणीस. बाकी ती कमलच काम बघत होती म्हणा वर्षभर ! तेव्हां छानदार रिपोर्ट लिहून देतोस कां तेवढा? अन् हें बघ, तुझें तें झेनिथ रिस्टवॉचहि लागेल बरं कां मला--"

# जीवनविहार

लेखकः— अरविंद गंगाधर मंगरूळकर.

— १ —

जाईजुईच्या फुलांचा अति रम्य आणि विशाल मुकुट पृथ्वीदेवतेनें आपल्या मस्तकावर धारण केला होता! त्या मुकुटाचा मेरुमणि चंद्र आपल्या प्रशांत तेजानें शोभत असतांना—

तुटा बिचारी! असंख्य ग्रहगोलांत, तारकांत, आकाशाच्या या एवढ्या लोकसंख्येंत एकाद्या उल्केची अशी ती काय प्रतिष्ठा? विश्वाच्या जगड्व्याळ पसाऱ्यांत मज पामराची कुठली गणना व्हायला?

वेडा जीव! जगांतील एकादें प्रीतिस्थान पाहून त्याच्याहि प्रीतीला उधाण येतें. चंद्राचा करस्पर्श झाल्याबरोबर बिचारा सागर आपल्याच ठिकाणीं हेलावतो, खळखळतो, आणि प्रेमाच्या तसल्या प्रकर्षांत अखिल जगत् जणुं जलमय करूं पाहता! पण चंद्रास्त होतांच त्यालाहि स्वतःच्या कृतीचें शून्यत्व कळून येतें.

तो जगांत येतो, फुलतो, रमतो आणि—

" अरे, जीवाची ही प्रकृतिच! "

— २ —

भ्रमर कमलाशीं पूर्णांशानें रममाण झाला होता. कमल! कमल!! सर्व सृष्टि त्यास कमलमय दिसूं लागली. तो अत्यंत प्रेमभरानें त्या कमलांतील मकरंदाचा आस्वाद घेऊं लागला.

मीं ह्मटलें, " आई, उद्यां हें कमल सुकून जाईल, नाहीं?

दीर्घ निश्वास टाकून मीं आकाशाकडे पाहिलें.

" तें कमलपुष्प गगनांतील या तेजोमय व कधीं न सुकणाऱ्या फुलांप्रमाणें असतें तर— "

— ३ —

" चल, ध्रुवाचा शोध करूं. ध्रुवावर जाऊं. "

आकाशांत काळेकुट्ट राक्षस विजेच्या जिभा — लखलखीत जिभा काढून भेवडावूं लागले. इंदु पराजित होऊन कोठें निघून गेला तें कळेना. नभ कज्जलाचा तुफान वर्षाव करूं लागलें. कृष्णता! जिकडे तिकडे गाढ कृष्णता भरून राहिली! इतक्यांत... .... मला वाटलें, वज्राचा प्रहार झाल्यामुळें कडाडून आकाशच कोसळलें!

" चल, ध्रुवाचा शोध करूं. ध्रुवावर जाऊं. " तो पुन्हा म्हणाला.
" वेडा कुठला! पंचमहाभुतांची ही लीला, हें नृत्य संपू दे. "

" हें कधीं संपणार? "

— ४ —

मानसांतील शुभ्र कमळांच्या गर्दींत पोहत पोहत हे हंस मिसळून गेलें म्हणजे त्यांना पुन्हां शोधून काढणें फार कठीण होई; आणि मधून-मधून ते नीलकमलांच्या समुदयांत प्रवेश करीत तेव्हां तर तीं नीलकमलें व त्यांतून स्वच्छंदपणें विलास करणारे धवल राजहंस पाहिले म्हणजे आकाशांतल्या नील मेघांच्या गर्दींतून हे पूर्णचंद्र मार्ग काढतात कीं काय असें वाटे! खरोखर, तो नितांत रमणीय देखावा केवळ अवर्णनीयच! त्या शांत सरोवरावरून आमची पर्णनौका हळूंहळूं चालली होती. आमच्या वल्ह्यांचा आवाज दूरवर अगदीं स्पष्ट घुमून नंतर पाण्याच्या पृष्ठभागावर विरून जाई नौकेखालून उत्पन्न होणारे तरंग सरोवराच्या कांठापर्यंत जाऊन नंतर विलीन होत.

त्या तरंगांनीं वार्ता पोंचविली म्हणूनच कीं काय, मी नौका वल्हवीत होतों. तोंच हंसांचें एक युगल आपला उरोभाग विस्तारून मोठ्या डौलानें पोहत पोहत आमच्या नौकेजवळ येऊन ठेपलें. त्यांच्या चोचींत एकएक कमलपुष्प होतें.

स्मित करून ती म्हणाली, " आपलें स्वागत करण्यासाठीं सिद्ध होऊन हे आलेले दिसतात. "

मी यावर कांहीं बोलणार इतक्यांत आणखी किती तरी हंस भराभर आमच्या पर्णनौकेजवळ आले. चोहोंबाजूंनी चक्राकार रीतीनें जमून त्यांनीं आमच्या नौकेची गति कुंठित करून टाकली.

...... आकाशांत मेघमाला आली; लवकरच त्यांनीं वृष्टीहि करावयास सुरवात केली. क्षणमात्र त्या हंसांनीं वर पाहिलें आणि नंतर मोठें कूजन करून ते सर्वच नभोमंडलांत दक्षिणदिशेकडे उडून गेले. वातावरणांत विलीन होणारें तें हंसरुत ऐकत त्या विस्तीर्ण सरोवरांत आह्मी दोघेंच राहिलों.

मी निराशलों; तीहि खिन्न झाली. मीं ह्मटलें, " परिस्थितीच्या वादळांत सांपडल्यानंतर इथल्या साहाय्याची अपेक्षा आपण करतों तोंच तें मिळणार नाहीं असें कधीं कधीं होतें. नाहीं तर इतका वेळ आपल्याबरोबर क्रीडा करीत असलेल्या हंसांनीं आतांच कां उडून जावें ? "

— ५ —

' चहूंकडे जळत वणवा ' असा विश्वाचा देखावा मला दिसतो त्या प्रलयाग्नीची ही दाहक आंच! शरीराच्या या शुष्क सरोवरांत माझा राजहंस कसा पोहणार? तो कसा रमणार ? त्याच्या कृपेनें या वणव्यांत माझ्या कठोर देहाचें जर पाणी पाणी होईल तर ...

असल्या भयंकर दावाग्नींतहि तरुलतांचें प्रेम सुटत नव्हतें. ज्वाळारूपानें मृत्यु प्रत्यक्ष धडधडत होता तरीहि लतांचे वृक्षांभोंवतीचे बाहुपाश सल होत नव्हते. केवळ थोड्याच वेळानें ह्या घोर खाईमध्यें दोघेंहि करपून जाऊं ह्याची जाणीव पूर्णपणें असतांनाहि त्यांनीं विश्वनायकास ओळखलें नाहीं. मीं वर पाहिलें तों विश्वसूत्रधारानें रात्रीं उडविलेला फुगा ढगांतून वाऱ्यावर तरंगतच होता ! आकाशगंगा दुधाच्या लांबच लांब प्रवाहाप्रमाणें दिसत होती ! चांदण्याहि लुकलुकत होत्या. आमची स्थिति पाहून त्या एकमेकांकडे पाहत हंसत होत्या. ...मग कोणत्या ध्येयपूर्तीमुळें त्यांना हा आनंद झाला होता न कळे ! पण मला मात्र हें तक्षिण विरोधात्मक दृश्य पाहवेना. मान खालीं घालून मी आंसवें ढाळूं लागलों.......पुन्हां

एक वार माझ्या मृत्यूकडे मीं दृष्टि फेंकली, आणि या देहाची वणव्यांत मूठभर राख केव्हां होते त्याची वाट पाहत मी जगांत उभा राहिलों.

— ६ —

पौर्णिमेचा हंसरा पूर्णचंद्र निष्कलंक नाहीं, तर डागळलेल्या क्षयी चंद्रानेंच डोळ्यांचें पारणें नको कां फेडून घ्यायला? या अंतराळांत तरी परिपूर्ण असें काय आहे? सूर्याकडे पाहवत नाहीं, तारकांचा प्रकाश अत्यंत क्षीण, आकाशगंगा बहुतांशीं अदृश्यच, इंद्रधनुष्य धुक्यासारखें लगेंच वितळून जाणारें,......

पृथ्वीवर तर सारीच परिपूर्ण अपूर्णता !

पृथ्वीवरच्या चमचमणाऱ्या क्षुद्र काजव्यापेक्षां चंद्रसूर्य केव्हांहि श्रेष्ठच ! पण काजव्याची मौज काजव्यांतच ! ती चंद्रसूर्यांत कोठून ?

स्वर्गांतल्या निरवद्य, निरर्गल सुखाचा धिक्कार असो ! सुखाचा प्रकर्ष व दुःखाचा प्रकर्ष हीं दोनहि एकच ! दोन्ही वेळेस मन जडावून जातें, भावना बधिर होतात. म्हणूनच सुखाचा आत्यंतिक उत्कर्ष व दुःखाचा प्रकर्ष या वेळीं मानवाला मृत्यूचें भय वाटत नाहीं. वैभवाच्या अत्युच्च शिखरावर चंद्रमा असेल तेव्हांच नाहीं कां त्याला ग्रहण लागत ? वर्तुलांच्या कोणत्याही एका बिंदूपासून निघून परा कोटीला गेलों म्हणजे पुन्हां आपण त्याच बिंदूला नाहीं कां परत येत ?

-- ७ --

आंत आत्माराम नाहीं अशा देहाप्रमाणें हें जगत् आहे असें कित्येकांना दिसतें. असें असेल तर खरोखर निर्जीव शरीराप्रमाणें या जगाचा विध्वंस करून टाकायला पाहिजे. ईश्वरानें घातलेलें आयुष्याचें हें कोडें कधींच का सुटणार नाहीं ? सुटणार नसेल तर ह्या क्षणींच हें जग अंतरिक्षांत वितळून जावो.

पण पृथ्वीचा एवढा मोठा अवाढव्य गोल केवळ पाण्यावरच्या बुडबुड्याप्रमाणेंच आहे काय? आपण बोलूं लागलों तर आकाशींचे तारे आपणांशीं कांहींच कां बोलत नाहींत? आपण हंसलों तर रानावनांतलीं फुलें हंसत नाहींत कां?

असें आहे. विरही प्रियकर हातांतलीं गुलाबाचीं फुलें तशींच चुरडून टाकून धुळींत फेकून देईल; पण असाच कोणी भाग्यशाली जीव त्यांचें कौतुक करील, स्वतःला धन्य मानेल, व त्यांच्या मनोहर गुंफणानें प्रियेला संतुष्ट करील.

— ८ —

तो पाहा, अंतरिक्षांत सतत धावणाऱ्या असंख्य तारांबरोबर पृथ्वीचा सूक्ष्म गोल -- तिची लहानशी चांदणीहि अनंताकडे धाव घेत आहे. या विश्वरचनेंत तिचा मंदतेज गोल ह्मणजे एकादा बिंदु, — परमाणु तरी होईल काय? स्वतःच्या क्षीण तेजाचा एकादाच निर्जीव किरण कसाबसा अंतराळांत फेकणाऱ्या पृथ्वीचा इतर तेजःपुंज तारांपुढें काय पाड ?

बिचारा मानव ! जो पृथ्वीच्या मानानें एकादा परिमाणूही होणार नाहीं, आणि जी पृथ्वी विश्वरचनेंत एखाद्या बिंदूइतकीहि जागा व्यापणार नाहीं, — तो मानव आपल्या ज्ञानाच्या चकचकाटानें सारें जग दिपून गेलें आहे असें मानतो. त्याचा तो सारा गर्व व्यर्थच नव्हे काय? विश्वाचें आकलन मला झालें आहे अशी तो शेखी मिरवितो, पण अनंतांत चंडवेगानें भ्रमण करणारे आपण या पृथ्वीसह एकादे दिवशीं कोठें फेकून दिलें जाऊं हें त्याला माहीत नाहीं. आपण कोठें जात आहों ह्याचेंहि ज्याला यत्किंचित देखील भान नाहीं अशा मानवाच्या मूर्खपणाची कींव करावी किंवा त्याच्या शहाणपणाचा उद्वेग मानावा हेंहि समजत नाहीं.

— ९ —

हीं येथें रस्त्यांत--धुळींत फुलें पडलेलीं दिसतात. एकाद्या संरुष्टप्रियेनें हीं फेंकून दिलीं असतील; किंवा एकाद्या प्रेतावर हीं उधळलेलीं असतील.

संरुष्ट प्रियेनें त्याग केलेल्या फुलांचा विचार करणें नको! परंतु तीं जर एकाद्या मानवाच्या निष्प्राण शरीरावरचीं असतील तर मात्र हीं फुलें आपल्या पाकळ्यांच्या मुखांतून किती तरी बोलतील:

" आतां पंचतत्त्वांत एकजीव होऊन गेलेल्या त्या मानवानें विश्वाचा ग्रंथ उघडून पाहिला होता काय? स्वतःचें सुख हेंच त्यानें जगाचें सुख

मानलें होतें कीं जगाच्या सुखांत तो रंगून गेला होता? ‘ तो ’ जगांतला होता कीं त्याच्या हृदयाच्या व्यापांत जग होतें? या पायऱ्या चढत असतां त्यानें सिंहावलोकन केलें होतें काय? आह्मी जे येथें धुळींत पडलों आहोंत तें त्याच्या उन्नतीचें द्योतक ह्मणून! जर आमची वंचना झाली असेल तर—”

नुसत्या कल्पनेच्या फिकट छायेनेंच तीं फुलें बिचारीं कोमून गेलीं.

— १० —

विश्वांतल्या घनघोर झंझावातामुळें उडालेल्या रजःकणांनीं मी अगदीं अंध बनून गेलों आहे. त्यांतच दिवाभीतांनीं आपला कर्णकटु घूत्कार चोंहोंकडून सारखा चालविला आहे. या घूत्काराचा अर्थ काय? कलुष झालेलें हें वातावरण कधींच कां निवळणार नाहीं? मला दिनमणि नाहींच कां दिसणार? पृथ्वीवर रजनी अवतरली ह्मणजे मला उल्कापात होतांना दिसतो त्याचा तरी अर्थ काय? माझ्या जीवनाचा ताराहि असाच खळाळून तुटून पडला तर—तर देवा, त्याची राख तरी तूं पदरांत घेशील ना?

— ११ —

कोमेजून जाईपर्यंत फूल सुवास देईल; ढगाळून जाईपर्यंत चांदण्या प्रकाश देतील; शुष्क होईपर्यंत निर्झर पाणी देईल.

आभाळाच्या या अवाढव्य कोंदणांत जडविलेलीं रत्नें त्या कोंदणासह कधीं तरी बितळून जातील, पण तीं आपला प्रकाश मात्र—क्षीण असला तरी—सतत देतीलच.

आपल्यालाच व्यापून टाकणाऱ्या ढगालाहि चंद्र व तारका प्रकाशित करतात अशा आकाशस्थ ग्रहगोलांवरून दृष्टि काढून ती सभोंवार टाकली ह्मणजे मात्र डोळ्यांत अश्रु उभे राहून कांहीं दिसेनासें होतें. पण उभीं राहिलेलीं तीं आंसवें टिपून काढून पुन्हां सभोंवार दृष्टि टाकणें प्राप्त आहे.

— १२ —

मोगऱ्याच्या फुलांची ही एवढी मोठी रास येथें कोठून आली बरें? आकाशांतले सारे ग्रहगोल पृथ्वीवर या ठिकाणीं कां बरें एकवटले? एकाद्या पावन सिद्धाच्या पुण्यराशीचा तर हा धवलिमा नसेल?

दुरून तो मोठा सुंदर, शुभ्र दिसत होता. आतांपर्यंत मन भवबंधांनीं निगडित झालेलें होतें. पण आतां ते बंध तुटले. भावनांचा उद्रेक झाला. त्यांचा समुद्र उचंबळून आला. अत्यंत आतुरतेनें मी तिकडे निघालों.

कोण हें घोर अरण्य मार्गांत ! असंख्य सर्प ! आणि किती भयंकर हे—पण मी जसजसा चढूं लागलों तसतसा माझा आनंद वाढूं लागला. अधिकाधिक विस्तृत प्रदेश मला दिसूं लागला. गति रुद्ध होऊं लागली. तरीहि मी चढूं लागलों. मार्गांत किती तरी ज्ञानकमलांचा सुवास मी घेतला. आनंद ! आनंद !!

मी शेवटीं त्या अचलेश्वराच्या शिखरावर आलों. माझा आनंद मीं वर्णावा ?

मी आत्मसंतुष्ट होऊन सभोंवार पाहिलें; खालींहि पाहिलें, तो... अरेरे ! कोण ही दुर्दशा ! हीं हरिणें, तें मृगजल, त्याचें तें मृगजलापाठीमागें अनिवार धावणें, त्यांचा क्रम......नको !......क्षणांत माझा आनंद वितळून गेला. मी अधोमुख झालों. " त्या हरिणांची भ्रांति दूर करणें हें माझें पवित्रतम कर्तव्य नव्हे काय ? " मी विषण्ण चित्तानें खालीं उतरूं लागलों. एकच विचार माझ्या मनांत भरून राहिला.

## – १३ –

नीलवर्णानें, नीलरत्नांनीं चित्रित झालेल्या गगनाच्या भव्य चांदव्याखालीं पृथ्वीच्या पाळण्यांत मी पडलों होतों. वर पाहिलें तों विश्वकर्म्याच्या अगाध लीलेचें माझें मन सहजच कौतुक करूं लागलें. कोणा ' अज्ञाता 'नें रात्रींचा प्रदीप नुकताच लावला होता. दुधासारखे शुभ्र मेघ पृथ्वीच्या संगतीला कंटाळून मोठ्या वेगानें कोठें तरी अंतराळांत उडत चालले होतें. अखिल विश्वाला चंद्रानें अमृताचा अभिषेक चालविला होता ! आपल्या पाठीवर बसवून मेघांच्या ह्या तुकड्यांनी मला उंचच उंच नेलें तर...... पण नैसर्गिक बंधनांनीं मी पूर्णपणें बांधला गेलों आहे. क्षणांत मला निष्ठुर कल्पनादेवीनें उंच आकाशांतून खालीं झोंकून दिलें. मी या असल्या पृथ्वीवर पडलों त्यसरशींच माझा अंत झाला असता तर.. ....

नगर वाचनालय सातारा



रंगणकीकृत

सहस्त्ररश्मीनें पश्चिमेस, पूर्वेस, ढगांवर, जिकडे तिकडे हजारों रंग उधळून दिले होते ! विश्वाचा आश्चर्यकारक चित्रकार अस्तगिरीवर संध्यादेवीबरोबर रंगपंचमीचा खेळ खेळण्यांत दंग झाला होता ! मी कांहीं वेळ त्या उभयतांचा प्रणयविहार पाहिला, पण पुढें लाजून तीं दोघेंहि कोठें निघून गेलीं !

आकाशांतली फुलबाग फुलली ! तेथलीं सर्व फुलें हंसलीं ! थोड्याच वेळानें रोहिणीसमवेत चंद्र आपल्या मनोहर बागेंत विहार करूं लागला. तो अत्यंत हर्षभरित झाला होता. अशा रमणीय प्रसंगीं प्रणयिनी बरोबर असतांना कोणत्या प्रियकरास आनंद होणार नाहीं ?

......इतक्यांत आपल्या बागेंतलें एक फूल कोणी तोडून नेलेलें पाहिलें. तो उद्विग्न झाला व तत्काळ त्याच्या मुखावर काळी छाया पसरली. कां बरें त्याला इतकें वाईट वाटावें ? — तो रोहिणीला ह्मणाला, " चल, चल. आपण जाऊं. माझ्या डोळ्यांसमोर माझ्या बागेंतली अनागस फुलें करपून गेलेलीं मला पाहवत नाहींत. थोड्याच वेळानें सर्व फुलें टपटप खालीं पडतील. मानवांनीं खालीं पृथ्वीवर दुष्कृत्यांचा होम चालविला आहे, त्याची ही आंच ! " ढगांच्या पडद्यापाठीमागें तो प्रियेसह गेला तो गेलाच !

— १४ —

देवा, मला हें जग नको. मला हें पृथ्वीचें राज्य नको. मला मोक्ष कळत नाहीं. आत्मज्ञानहि कळत नाहीं. मी आपला – तुझ्याजवळच राहणार ! तूं लोटून दिलेंसच तर विश्वबंधुत्वानें वागणाऱ्या एखाद्या वृक्षाचाच मला जन्म दे !...... पण नाहीं मी तुझ्याजवळच राहणार !

# कालिदासाची कारागिरी

## ( कांहीं स्फुटविचार )

लेखकः—**के. ना. वाटवे** एम्. ए.

**वा**ङ्मय क्षेत्रांतला एक अत्यंत कुशल कारागीर ह्मणून कालिदासाची आज दोन अडीच हजार वर्षें अव्याहत ख्याति आहे. अव्वल दर्जाच्या काव्याच्या गाभ्याला स्थल-कालाची कीड लागत नाहीं ह्मणतात त्याचें उत्कृष्ट उदाहरण ह्मणून त्याचीं काव्यनाटकें खुशाल सांगावीं. क्षणाक्षणाला पालटणाऱ्या या सृष्टीच्या तरल पसाऱ्याखालीं कांहीं अविकार्य व नित्य अशी वस्तू आहे. पदार्थांत ज्यामानानें या नित्यांशाचें प्रमाण अधिक त्या-मानानें त्यावर कालाचा तांबेरा चढत नाहीं. कालिदासाच्या कृतींत नित्य सत्य वस्तू अधिक असल्यानें ती गंजली, नाहीं जुनी झाली नाहीं. हें पंचरसी धातूचें टिकाऊ लेणें या कारागिरीनें कसें साधलें हेंच येथें पहावयाचें योजिलें आहे. याची करामत आजवर कैकांनीं न्याहाळिली. तरी रसिकांची तृप्ति झाली नाहीं. त्यामुळें नव्या जुन्या रसिकांच्या झुंडीच्या झुंडी आजपर्यंत त्याच्या कृतीवर पडल्या व पडत आहेत त्यामुळें न्याहाळावयाचा भाग कांहीं शिल्लक राहिला असेल हें संभवनीय नाहीं. तरीपण काव्य न्याहाळणें नेहमींच अवीट असल्यानें पुढील चार ओळीकडे सहज नजर टाकण्याची रसिकांस नम्र विनंति आहे.

चांगला कवि आपल्या काव्यांत कांहीं ठसठशीत सांगत असतो व तें सांगण्याची त्याची ह्मणून कांहीं विशिष्ट रीत असते. सांगावयाचा विचार जितका अधिक उमदा, अधिक उदात्त व अधिक अपूर्व तितकी अधिक छाप पहिल्यानेंच वाचकाच्या मनावर पडते. व तो सांगण्याची पद्धत अशीच बेमालुम असेल तर दुधांत साखरच पडली!! कालिदासाची वेंघच पहिल्यांदा मोठी! त्याच्या काव्यांत लहानसानांना जागाच नाहीं. जशी मारु-

तीची सूर्यावर झडप तशी याची उडी अचूक उदात्त तत्त्वांवर ! दोषांदोषांचे दोषागुणांचें, सात्विक तामसांचे किंवा तामस तामसांचे झगडे आजवर कैकांनीं लाविले व त्यांची मौज पाहिली. पण हें मिळमिळीत व निःसत्व अन्न त्याला कसें मानणार? दोन खणखणीत व तुल्यबल सत्यावर झगडा, दोन सारख्या गुणागुणांमधील भांडण लावण्यांत व त्यांचें पर्यवसान पहाण्यांत त्याच्या बुद्धीला आनंद वाटे. या संबंधानें बोलतांना सुप्रसिद्ध रसिक कै. महादेव मल्हार जोशी ह्मणत "कालिदासाची भूकच मोठी" हेंच खरें. पहाना. शाकुन्लाच्या पांचव्या अंकांत केवढा कडाक्याचा व अपूर्व वादविवाद उभा केला आहे? वाद जंगी ह्मणजे शेंपांचशें माणसें इकडे व हजारपांचशें तिकडे हा अर्थ नाहीं. उलट दोन गोसाव्यास बरोबर घेऊन आलेली एक असहाय्य व साधीभोळी रानांतली एक मुलगी एका बाजूस व दुसऱ्या पक्षाला एक सार्वभौम राजा. पण येथें भांडण आहे तें दोन सत्त्वांशाचें आहे, दोन तुल्यबळ गुणांचेच आहे व ह्मणूनच त्यांच्या झोंबींत मौज आहे. "त्वमर्हतां प्रागसरः स्मृतोऽसि नः शकुन्तला मूर्तिमतीच सत्क्रिया' अशी या दोन पक्षांची उभारणी आहे. एकीकडे साम्राज्य वैभवाचा व त्याला धरून असणाऱ्या सच्चेपणाचा अभिनिवेश तर दुसरीकडे सत्याचा कडकडून अभिमान, स्वाभिमानाची जबर उसळी, व चारित्र्यरक्षणाची विलक्षण खबरदारी !! असा घनघोर संग्राम पांचव्या अंकांत कालिदासानें मांडला. दोन दांडगे खंदे वीर एकमेकांशी लढत असतांना सुद्धां मधून मधून दुसऱ्याच्या कौशल्याची तारीफ करतात. तसें येथेंही जबर प्रहार करणारा सिंहासनस्थ राजा त्या असहाय पण नागिणीप्रमाणें चवताळुन चावे घेऊ पाहणाऱ्या तेजस्वी मुलीकडे पाहून ह्मणतो. "संदिग्ध बुद्धिं मा कुर्वन्नकै व इवास्याः कोपो लक्ष्यते।" हा दारुण संग्राम पाहून वाचकही बुचकळ्यांत पडतात. कोणत्या अंगानें सहानुभूतीचा ओघ वाहवावा हें त्यांस कळत नाहीं. यांतच तर खरी करामत भांडण लावणाऱ्याची. अखेर हें अपूर्व भांडण मारीच ऋषीच्या स्वर्गीय आश्रमांत तुटलें. तें पृथ्वीवर तुटण्याची आशाच नव्हती !! उडाणटप्पू नगरभवान्या

किंवा नादान, उल्लू, छक्कडबाज यांचे कज्जे, आपण कित्येक ऐकतों व पहातों; पण त्यांत काय राम आहे? भूलोकींचे साधेसुधे " माजिस्ट्रेट " त्यांचा निकाल तेव्हांच लावतात. पण कालिदासाचें भांडण और व त्याचा निकालही औरच!!

दुसरें प्रत्यंतर रघुवंशांतील दुसऱ्या सर्गाचें. दिलीप व सिंह यांचा संवाद. कांहींजण ह्मणतात, " कालिदास काय भोळसट हो! " ह्मणे सिंह मनुष्यवाणीनें बोलतो; व दिलीपासारखा पराक्रमी राजा हतवीर्य होऊन तें ऐकून घेतो. " पण हा झाला प्रकार अद्भुताचें पांघरूण घालून सांगण्याचा. पण जरा नजर अधिक स्थिर केली तर त्या पांघरुणाखालीं केवढा जंगी तंटा दिसेल बरें!! हाच तंटा तुमच्या आमच्या मनांत हरघडी चालला आहे. पण माणसें काव्यांतल्या रूपकांशीच थबकतात. कुवतच तेवढी त्यांची. खरें मर्म मार्मिकांनींच जाणण्यासाठीं असतें. नाझरेथ आपल्या मार्मिक शिष्यास ह्मणाला " Unto you it is given to know the mysteries of the kingdom of God: but to others in parables; that seeing they might not see, and hearing they might not understand. " यांत ईश्वराच्या करणीबद्दल तो जें ह्मणाला तेंच काव्यांतही आढळून येतें. असो. तर येथें सिंह ह्मणजे काय व राजानें कोणती बाजू घेतली हें बारीक नजरेनें पाहिल्यास उघड दिसतें तें हें. दुर्दम व लोकसामान्य उपयुक्ततावाद सिंहाचा व त्याविरुद्ध त्याची त्याहीपेक्षां दुसरी उज्वल बाजू स्वार्थत्यागाची, उच्चतर ध्येयासाठीं साध्या पार्थिव सुखावर व पांचभौतिक देहाच्या आसक्तीवर लाथ मारणाऱ्या दैवी प्रवृत्तीची. मातृभूमीच्या कैवारानें राजकीय चळवळीच्या खाईत उडी टाकावयास सिद्ध झालेल्या तरुण पिढीला कित्येक प्रसंगीं तिचेंच दुसरें मन किंवा त्याच विचाराचीं पोक्त माणसें काय सांगतात तें आपणास माहित नाहीं काय? " अरे वाडा आहे, मळादळा चांगला सुपीक, सोन्यासारखी बायको घरीं आहे, सुंदर देखणें शरीर, त्यावर डंबेल्स केल्यानें आलेलें वळण, मानाची नोकरी — कशाला रे बाबा हें दवडतोस? आणि कुठली तुला ही अवदसा आठवली देशसेवेची? " सिंह

तरी गायीसाठीं देह देणाऱ्या राजाला हेंच म्हणाला ना? "एकातपत्रं जगतः प्रभुत्वं, नवं वयः कान्तमिदं वपुश्च। अल्पस्य हेतोर्बहु हातुमिच्छन् विचारमूढः प्रतिभासि मे त्वम्॥" अशल्या विषयाच्या निवडीलाच खरी करामत लागते व तिची मांडणी करण्यांतच खरी कारागिरी!

हें झालें जरा मोठ्या प्रकरणासंबंधीं. पण अल्पस्वल्प बाबतींतही कालिदासाची "मोठी भूक" किंवा इतरांपेक्षां दोन हात लांब उडी दिसून येते. चंद्राची शोभा कांहीं विशेष असते व कमलही आपल्या परी आल्हादकच! पण बऱ्याच कवींचें समाधान चंद्राची शोभा चंद्रावर व कमलाची शोभा कमलावरच ठेऊन व ती तशी पाहून झालें! पण कालिदासाला त्या दोनही शोभा त्यांच्या आश्रयावरून शेजारीं काढून व त्यांना शेजारीं ठेऊन पाहत राहिल्याशिवाय चैन पडेना!! पार्वतीच्या मुखाचें वर्णन करितांना तो म्हणतो "चंद्रगता पद्मगुणान्न भुंक्ते, पद्माश्रिता चांद्रमसीमभिख्यां। उमामुखं तु प्रतिपद्य लोला द्विसंश्रयां प्रीतिमवाप लक्ष्मीः" येथें दोनही ठिकाणची बहार लुटण्याचें "लोलत्व" त्या गरीब बिचाऱ्या लक्ष्मीचें कां कालिदासाच्या धाडसी व असंतुष्ट भुकेचें हें रसिकांनींच ठरवावें.

याहीपेक्षां साधी गोष्ट. चांगला शिक्षक कोणता हें सांगावयाचें. पण त्यांत सुद्धां "लांब उडी". श्लिष्टा क्रिया कस्यचिदात्मसंस्था। संक्रान्तिरन्यस्य विशेषयुक्ता। यस्योभयं साधु स शिक्षकाणां धुरि प्रतिष्ठापयितव्य एव॥ (मालविका०) ज्ञान तर शिक्षकास हवेंच पण तें समजावून देण्याची हातोटी ही त्याला असावी हेंच ध्येय खरें!

स्त्रीपुरुषांच्या प्रेमकल्पनाबद्दल अन्यत्र कालिदासानें कांहींही म्हटलें असलें तरी पार्वती व शिव यांचा विवाह त्यानें अगदीं उच्च व विशुद्धतर बैठकीवर बसविला आहे खास. विवाहाचें ध्येय तरी किती उदात्त! जगांतील सत्त्वांश म्हणजे देव व साधू यांचें आक्रमण तामस वृत्तीच्या तारकानें केलें असतां त्याचा नाश करण्यासाठीं पुत्रोत्पत्ति! आणि हें पुत्रप्राप्तीचें उदात्त ध्येयसुद्धां एका पवित्र उपमेच्या कोंदणांत झोंकांत बसवून दिलेलें आढळेल. शिव स्वतः म्हणतात "अत आहर्तुमिच्छामि पार्वती-

मात्मजन्मने । उत्पत्तये हविर्भोक्तुर्यजमान इवारणिम् ॥" कु० ६–२८. येथें यज्ञासारखें पवित्र व मोठें काम करणारा 'यजमान अग्नि उत्पन्न करण्यासाठीं अरणी जसा घेतो' असें सांगून पवित्र वातावरणाची पार्श्वभूमि किती नाजूक हातानें व कुंचल्याच्या एका सफाईदार फेकानें उभारिली आहे पहा. बरें या विवाहांतील वधूपरीक्षा केवढी खडतर ! नवरा "अरूपहार्य–" नुसत्या मुखड्याला बघून न भुलणारा. व नवरीसुद्धां तशीच बहाद्दर. जें सौंदर्यानें हुकलें तें उग्र तपानें तिनें साधलें. शंकरासारखे नवरे काय वाटेवर पडलेले असतात? " अवाप्यते वा कथमन्यथा द्वयं तथाविधं प्रेम पतिश्च तादृशः " कु. ५–२. शंकराचे कसोटीस मुलगी उतरल्यावर दोघें उल्लूपणानें "Love-marriage " च्या फंदांत पडलीं नाहींत. सप्तर्षी व अरुंधती या जगद्वंद्य विभूतींकडून पर्वताधिराजास त्यांनीं मागणी घालण्याचा योग्य मार्ग चोखा-ळला. वशिष्ठासारख्या जगत्पावन तपोनिष्ठाच्या चरणांवर नजर खिळवून उभ्या असलेल्या त्याच्या परमसाध्वी स्त्रीला – अरुंधतीला – पाहून शंकरास वाटलें " या असामान्य जोडप्यासारखें आपणही व्हावें. विवाहबद्ध होऊन हेंच भाग्य जोडावें !! " त्या उभयतांत पतिपत्नीप्रेमाची ओतीव मूर्ति तेव्हां त्याला दिसली " तद्दर्शनादभूच्छम्भोर्भूयान्दारार्थमादरः " ॥ कु. ६--१३. उठाव उदात्ताचा, उद्दीपनही उदात्ताचें व पर्यवसानही उदा-त्तांतच !! कुटुंबांत स्त्रीला केवढा दर्जा, मुलीबद्दल काय कल्पना इत्यादि गोष्टी नाजूकपणें मांडून या प्रकरणांत कालिदासानें मोठी बहार उडविली आहे. सप्तर्षींनीं पार्वतीबद्दल मागणी घातल्यावर हिमालयाची तिला मनांतून संमती होती तरी त्यानें आपल्या अधिकारांत होकार दिला नाहीं. तो मालकिणीच्या मुखाकडे पाहून निःशब्द संमति मागूं लागला. ( मेनामुख-मुदैक्षत । ) कारण कारभारणीच्या संमतीवाचून मुलीला कसचा देतो तो ? प्रायेण गृहिणीनेत्राः कन्यार्थेषु कुटुम्बिनः ॥ कु. ६--८५. बरें ! हें सर्व चाललें आहे तो नवरीमुलगी मोठ्या उत्सुकतेनें पण आपल्याला त्यांतलें कांहींच कर्तव्य नाहीं, आपण त्या गांवच्याच जशा कांहीं नाहीं हें दाख-विण्यास -- अधोमुखी होऊन " लीलाकमलपत्राणि गणयामास पार्वती. " हें विवाहपूर्व उदात्त व बेमालूम चित्र पाहून कोणा मातापित्यांस " आह्मांला

हें असें कन्यादानाचें भाग्य लाभावें असें वाटणार नाहीं ? कोणा तरुणीच्या व तरुणाच्या मनांत आपणही या मंगलदान प्रतिग्रहाचा विषय व्हावें " अशा लालसेची गोड चमक निघणार नाहीं ?

हें झालें कारागिरानें एकाद्या संगमरवरी दगडाच्या खाणींतून एक नामी शिळा नेमकी हेरण्याचें व तिला चतुर्भुज विष्णूचा घाट देण्याचें. पण हा घाट देऊनही विशिष्ट अवयव जोमदार दाखवायाला, तें सर्व प्रमाणांत आणायला, नाजूकपणें दागिनें व वस्त्रें कोरायला, गळ्यांतल्या हाराच्या फुलत्या कळ्याही पाहणाराच्या नजरेंत भरवायला, व मुखावर स्वर्गीय हास्याचा उठाव करून मूर्तीच्या रोमरोमांतून जीवन स्फुरवायला कारागिराच्या कल्पनेपेक्षांहा त्याची टाकी अधिक कुशल असावी लागते ! ! काव्यांतही हेंच. नुसती कल्पना उदात्त घेऊन काय करावयाची ? तिचा उठावही तितक्याच बहारीचा लागतो. कालिदासाच्या उठावांतही तो कधीं वाहवत नाहीं. जिथें जेवढें पाहिजे तेवढें नेमकें सांगून स्वारी पुढें ! ! अगदीं कोंकणस्थी नेमस्तपणा व कऱ्हाडी टापटीप ! ! ! बाणासारखी कल्पनेची श्रीमंती व शद्बभांडाराची मालकी कुणाला नाहीं. भवभूतीच्या वृत्तींच्या उत्कटपणाला तोड नाहीं. भारवी व माघाच्या भाषेचा ठासींवपणा व कल्पनांचा बारकावा थोड्याच ठिकाणीं पहायला मिळेल. पण आमच्या कारागिराचा प्रमाणशीरपणा, औचित्य, व सर्वांच्या चित्ताला बिलगणारी खुमारी मात्र कुणांतही नाहीं. बाणानें आकाशांत संचरणाऱ्या पंचरंगी राव्यांच्या रांगांचें मोठें शानदार वर्णन केलें आहे. पण त्याला खाल्ल्या दहा पंधरा ओळी ! ! तें सुद्धां कथासूत्र सोडून आणि प्रमाण बिघडवून. पण कालिदासानें सहज जातां जातां एका सफाईदार कलमाच्या फराट्यासरसें किती गोंडस चित्र त्याच प्रसंगाचें काढलें आहे पहा ! श्रेणी बन्धान्वितन्वद्भिरस्तम्भां तोरणस्रजम् । सारसैःकलानिर्ह्रादैः क्वचिदुन्नमिताननौ ॥ र. १-४१. येथें कथानुसंधान सुटत नाहीं. की औचित्याचा धागाही तुटत नाहीं. राजाराणींनीं जशी सहज मान वर करून ती सारस-माला पाहिली तितकीच वर वाचकाचीही मान होईल. जास्त नाहीं !! भवभूतीनें तिसऱ्या अंकांत करुणरसाचे पूर वाहवले. पण कालिदासानें एका ओळींत करुणाची

जी चमक दाखविली ती मनाला चावाच घेते. सीतेला गरोदरपणीं रानांत टाकल्यावर असहाय होऊन ती क्रंदन करीत असतां महामुनी वाल्मीकि तेथें आले. व मोठ्या वात्सल्यानें तिचे डोळे पुसून, व तिच्या त्याग करणाऱ्या रामाला दोष देऊन ते ह्मणतातः—" तन्मा व्यथिष्ठा विषयान्तरस्थं प्राप्तासि वैदेहि पितुर्निकेतम् ॥ र.१४-७२. येथें उदात्ताच्या क्षेत्रावर करुणाची नाजुक पेरणी किती उठावदार होते पहा!

मागून प्रसंगाची शीग भरून काढत काढत अगदीं टोकाला गेलेल्या कल्पनेचा तुरा खोऊन त्यांतल्या अगदीं निवडक बाबीवर वाचकाचें मन खिळून धरण्याची कालिदासाची वर्णनशैली मोठी चित्तवेधक होते. चौदा वर्षांच्या भयंकर वनवासानंतर भरत रामाची भेट! भरत दादांच्या गळा पडला. दादांच्या अश्रूंनीं भिजला. पलीकडे जगत्पावन सीतावहिनी होत्या. रावणाच्या ग्रहणांतून सुटलेली चंद्राची कोरच जणुं. भाऊजींनीं वहिनीचें पाय धरले. येथें कालिदासानें भिन्नरसांच्या मिश्रणांत उदात्ताची चिमूट टाकून शीग चढवून ह्मटलें आहे. " तें भरताचें ज्येष्ठानुवृत्ति जटिल मस्तक व रावणासारख्या सम्राटाच्या प्रेमयाचनांना लाथाडून देणारें तें सीतेचें चरणयुग एकमेकांच्या स्पर्शानें अन्योन्यपावन झालें " र. १३-७८.

त्याच्या नाटकरचनेतही कांहीं मौज आहे. एखाद्या नवीन प्रेक्षकास प्रवेशाच्या द्वारें परिचय करून देतांना तो प्रसंग नैसर्गिक रीतीनें व सहज, सुतांच्या गुंडीसारखा, उकलला पाहिजे. ती माहिती प्रेक्षकास करून द्यावयाची ह्मणून मारून मुटकून देऊं नये. शाकुन्तलाच्या सातव्या अंकांतील कुमारप्रवेशाची छाननी या दृष्टीनें करून पहावी. तो तरतरीत, उमदा व तेजस्वी मुलगा कोण याची दुष्यंताबरोबरच प्रेक्षकांना माहिती होत असते. ती किती सहज, किती मनोहरपणें, अगदीं ओघांत व ऐकणाराचें औत्सुक्य वाढवीत वाढवीत होत आहे पहा. राजांस तें पुत्रस्नेहाचें अतर्क्य भरतें येणें, सार्वभौम चिन्हांकित छोटा हात दिसणें, पौरव नांवातील संदिग्धपणानें ते चित्ताचें हेलकावे खाणें, व सर्वांत " शकुन्तलावण्य " याच्या भिन्नपदच्छेदानें शकुन्तलेचें नांव सूचित करून मार्मिकपणाची कमाल करणें वगैरे

या प्रवेशांतील गोष्टी बारीक नजरेनें न्याहाळुन पूर्वीचे कवी हल्लींप्रमाणें एकाच अंकांत भिन्न प्रवेश घालून भिन्न स्थलीं व कालीं घडणाऱ्या गोष्टींची खिचडी करीत नसत हें जरूर लक्षांत घेण्यासारखें आहे. हा एक मोठाच निबंध त्यांनीं पाळल्यानें त्यांचें काम अवघड झालें होतें.

समर्पक उपमा देणें हें कारागिरीतील विशिष्ट क्षेत्र कालिदासाचेंच हें सर्वानुमतें ठरलेलेंच आहे. व त्यावर " उपमा कालिदासस्य " अशी पाटी कायमची लाऊन ठेवण्यांत आलेली आहे ! ! अनपेक्षित साम्य, रसानुकूलता, समर्पकपणा, उपमान उपमेयांचें अधिकांत अधिक विशेष तोलुन दाखविणें व स्थल, काल, आणि वक्ता यांच्या दृष्टीनें औचित्य हे उपमेचे पंचप्राण आहेत. अशा शेकडों जिवंत उपमा त्यानें आपल्या कृतींत मनोहरपणें व मुक्तहस्तानें पेरिल्या आहेत. किती निवडाव्या व किती दाखवाव्या ? शरद्दतु व रघु यांचे अनेक अन्योन्य संबंध दाखवून, व या साम्याचा व कथासूत्राचा धागा राजवर्णनाच्या अस्तराखालुन नाजूक हातानें नेऊन, १०।१२ श्लोकांत कालिदासानें " extended simile " चें मोठें नामी प्रकरण चितारलें आहे. यांत साम्यें प्रत्यक्ष दाखविण्यापेक्षां तीं सुचविलीं आहेत ही तर मजा ! ! ( र. ४-१४ ते २३ पहा. )

ताज्या खव्यानें ठेंचून भरलेलीं मोठीं पोतलीं असणें यावरून हलवायाची श्रीमंती व्यक्त होत असेल पण योग्य मसाला घालुन त्याचें खुमासदार व घाटदार पेढे करून, ते ताटांत कुशलतेनें रचून योग्य प्रसंगीं सादर करणें यांतच त्याच्या धंद्यांतील लोकप्रियतेचें रहस्य आहे. त्याचे जवळ अत्तराचे हंडे आहेत. पण तो दिवाळी आली की उंची अस्सल अत्तराच्या छोट्या कुप्या भरून सर्व नमुन्याचे नुसते फाये दाखवीत सुटतो. भोंवती लोकांची ही गर्दी जमते. टिकाऊ लोकप्रियता राखणें ही एक कला आहे. ती कालिदासाला या गुणांनीं साधली ह्मणून तो कारागीर ह्मणून टिकून राहिला व पुढेंही राहील.

सातारा.


# नक्षीदार नांवाच्या पाट्या

**नवीन सालची** कॉलेज स्टूडंटस् करितां विशेष सवलत दिली जाईल- आपल्या नांवाची पाटी फक्त १ रु. यांत करून देऊं.




**उत्कृष्ट कॅलेन्डर्स** उठावदार अक्षरें कांचेत बसविलेल्या- **मराठी** व **इंग्रजी** नांवाच्या पाट्या तयार करून पाठवूं.

**जनरल ट्रेडिंग कंपनी ९९१.** सदाशिव पेठ, पुणें २.

---

# कुलीन स्त्री-वाङ्मय माला.

कै. हरिभाऊ आपट्यांच्यानंतर सुरुचिपूर्ण नवीन वाङ्मयाचा प्रवाह !




" वन्सं, तुह्मी माझ्यावर रागावा, मला टाकून बोला, माझी निंदा करा, परंतु त्यांच्यावर तुह्मी रुसूं नका.

( प्रस्तावना लेखिकाः—कुमारी **चंद्रावती कर्नाटकी**, एम्. ए. )

**कापडी बांधणी १ रुपया ]** [ **व व्ही. पी. नें रु. १॥**

**प्रकाशकः--वि. स. लेले, ४७५ नारायण, पुणें नं. २**

**( पुण्यांतील प्रमुख बुकसेलर्सकडे प्रती विकत मिळतील. )**

स्थापना सन १९१९ इसवी.

# विद्यार्थि भाण्डार.

( स्वदेशीचें मंदिर )

## आपली सर्व खरेदी भांडारांतून करा.

**कारण**

१ येथें मिळणारी प्रत्येक वस्तू स्वदेशीच असते.

२ आमचेकडे माल बाजारभावा पेक्षां स्वस्त किंमतींत विकत मिळतो.

३ तुमचे मित्रच येथें स्वयंसेवक ह्मणून काम करितात.

धोतरें, टॉवेल्स, नॅपकिन्स, हातरुमाल, मच्छरदाण्या, पॉटरीज्, व स्वदेशी फाऊंटन पेन्स् वगैरे विद्यार्थ्यांना लागणारा हरएक प्रकारचा माल या भांडारांत मिळतो.

सर परशुराम-भाऊ कॉलेज केमिस्ट्री डिपार्टमेंटनें तयार केलेली **टूथ पावडर** अवश्य वापरा !!

सर परशुराम-भाऊ कॉलेज केमिस्ट्री डिपार्टमेंटनें तयार केलेलें **ब्रिलियंटाइन** वापरा !!

**नूतन मराठी विद्यालय हायस्कूल पुणें नं. २**

कॉलेज शाखा—( आर्मरीरूम. )

**अभिप्रायः**—( वा. के. सावळे, ३२५ E सदाशिव, पुणें. ) श्री. सावळे यांनीं तयार केलेल्या ‘ फाइल्स् ’ सुंदर व स्वस्त आहेत. श्री. सावळे हे एक मेहनती, उत्साही व होतकरू भावी कारखानदार असून स्वदेशी उद्योगधंद्यास उत्तेजन देत आहेत.

# सहवासोत्तर!

लेखिकाः—कु. राणी ठकार

आज आमच्या कॉलेजचा रस्ता नुसतां विद्यार्थ्यांनीं फुलून गेला होता. सायकलींच्या घंटा सारख्या वाजत होत्या; जणूं काय मुलांच्या गोंगाटाशीं तो घंटानिनाद साथच करीत होता. परंतु एवढा मोठा कोलाहल जरी चालू होता, तरी रस्त्यानें जाणाऱ्या एकाद्या आजोबा किंवा आजीबाईनीं कपाळ उठल्याची किंवा डोकं पिकून गेल्याची तक्रार मात्र केलेली ऐकिवांत आली नाहीं. उलट खेळीमेळीनें हंसत खिदळत चेष्टा कुचेष्टा करीत चाललेल्या त्या तरुणांच्या जमावाकडे पाहून त्यांना फारच मजा वाटत असावी, असें त्यांच्या रस्त्याच्या कडेस मुद्दाम उभे राहून पोरांच्या पोरचेष्टांचें कौतुक करण्यावरून सिद्ध होत होतें. एकाद्या म्हातारबुवांचा चेहेरा आंबट दिसलाच तर आपणांतही अशी रग राहिली नाहीं, म्हणून विधात्यावर तो मनांतल्यामनांत जळफळला असेल. असो. एका वृद्ध गृहस्थांनीं तर एका मुलाजवळ पृच्छा केली, "काय हो, आज काय विशेष आहे कॉलेजमध्यें?"

"आज 'वैवाहिक स्वातंत्र्य' या विषयावर मोठा जंगी वादविवाद होणार आहे."

"म्हणजे काय प्रकरण आहे बुवा हें?"

"आजोबा तें नाहीं आपल्याला कळायचं! आपल्या वेळेला कांहीं नव्हतं तें; आजकालची पोरं फार हौशी हो! त्यांना नॉव्हेल्टी पाहिजे सारखी नुसती; नाव्हेल्टी. काय समजलांत? ऐकली होतीत कधीं तुम्ही तुमच्या तारुण्यांत अशी मजा? अहो, असं पहा, एक फूल कधीं आपल्या हातांत सारखं दिवसभर चांगलं टवटवीत राहूं शकेल कां? सकाळच्या प्रहरीं झाडावर तें अगदीं सौंदर्यानीं मुसमुसलेलें, सुवासानीं थबथबलेलें, असं असतं म्हणून पटकन त्याला आपण तोडून घेतों; पण त्याची ती शोभा, त्याचा तो गंध, त्याचा तो डौल, किती वेळ? एकदोन तास! या

हातावरचं त्या हातांवर असं त्याचं कौतुक करण्यांत दोन तासांत त्या बिचाऱ्याचा नुसता चुरगळा होऊन जातो, आणि दोन तासानंतर कोमेज-लेल्या अशा त्या फुलाचा मग काय उपयोग बरं आपल्याला ? अहो तें नुसतं नाकाजवळ देखील धरवत नाहीं. तें मग फेकूनच देण्यांत शहाणपणा वाटतो किंवा फारंच झालं तर तें एखादी महादेवाची पिंडी रस्त्याला असेल तर मोठ्या भक्तिभावानें (!) अर्पण करावं! अहो, आप-ल्याला काय एक नाहीं तर दुसरं! ही पहा "— मिस्किलपणें समोरून येणाऱ्या भिन्नजातीयांकडे डोळे करकरून "आमच्या कालेजची बाग नुसती हिरव्या, निळया,— 'काळया'— नाना रंगाच्या फुलांनीं फुलून गेली आहे! मग फुलपाखरांना काय तोटा!" असें त्या वृद्ध मनुष्यास झणून, 'काय पण कोटी केली,' अशा अर्थानें हंसून मित्रांसमवेत ती मंडळी कॉलेजच्या मुख्य इमारतीकडे वळली.

कॉलेजचा मेन हॉल आज अगदीं चिक्कार भरून गेलेला होता. चारच मुख्य वक्ते होते. अध्यक्षही कॉलेज मधलेच होते. मामा झणजे मुलांच्या गळ्यांतला ताईत!– आमच्या कॉलेजमधील एका प्रोफेसरांना आह्मीं विनो-दानें "मामा" झणत होतो – मामा बोलतही फार चांगलें; त्यामुळें इतर लोकांचीही गर्दी बरीच झाली होती.

अध्यक्षांचें प्रास्ताविक झाल्यानंतर वक्त्यांना पाचारण्यांत आलें. त्या चौघापैकीं तिघांनीं अगदीं तीव्र शद्बांत वैवाहीक स्वातंत्र्याचा निषेध केला; व विवाहाला धार्मीक, सामाजिक वगैरे बंधनाची किती अवश्यकता आहे हें प्रतिपादन केलें; आणि आपल्या आर्यावर्ताची उज्वल परंपरा–ही त्यांनीं थेट ब्रह्मदेवाचें ब्रह्मांड फुटल्या दिवसापासून ट्रेस करीत, वसिष्ट, वाल्मि-कींच्या प्रांतांतून मार्ग काढीत काढीत रामावतार, कृष्णावतार इत्यादि दाही अवतारांतून अगदीं नारसिंहाबतार धारण करून लोकमान्य टिळ-कांच्या अवतारापर्यंत आणून ठेवविली—आपली उज्वल परंपरा कायम राखण्याकरितां या गोष्टीचा धिःकार केला पाहिजे, असें त्यांनीं सांगितलें, व शेवटीं एकदां महात्मा गांधीचें नांव भाषणांत कसें तरी खेंचून आणून— कारण त्याशिवाय टाळ्या कशा मिळणार?—टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटांत आपलीं भाषणें संपविलीं. चौथ्या वक्त्यानें मात्र या तिघांना खोडून काढ-

ण्याचा कसून प्रयत्न केला; व वैवाहिक स्वातंत्र्याची मानसिक, बौद्धिक, शारिरीक, आर्थिक वगैरे सर्व दृष्टींनीं किती उपयुक्तता आहे, हें पटवून देण्याचा प्रयत्न केला; परंतु त्याला बिचाऱ्याला कोणी धड बोलूं दिलें नाहीं व त्याला धुडकावून लावण्याचा कोतेपणाचा प्रयत्न केला. त्यानंतर ओपन डीबेटला सुरुवात होणार ह्मणून प्रत्येकजण उत्सुक झाला होता. एक मुलगा उठला व त्यानें पहिल्या तिघांची बाजू घेऊन त्या चौथ्या बिचाऱ्या वक्त्यावर मनमुराद तोंडसुख घेतलें; व त्यास मेल्यापेक्षांही मेलें करण्याचा प्रयत्न केला. या मुलाला अर्थातच ' शाबास! शाबास! ' अशा आरोळ्यांनीं श्रोत्यांनीं उत्तेजन दिलें. तो मुलगा व्यासपीठावरून खालीं उतरला. श्रोत्यांच्या टाळ्याचा नाद अद्याप पुरता जिरलाही नव्हता. मंडळी अद्याप हंसत खोकत होती; इतक्यांत दारांतून एक चोवीशीच्या आंतबाहेरचा तरुण संथ पावलें टाकीत, वर मान करून — जणूं काय तो वर पहात आपली पावलेंच मोजीत आहे, असा — तोंडावर एक प्रकारची बेफिकीर वृत्ति धारण करून व्यासपीठाकडे वळला. त्याची उंची मध्यम होती. त्याचा बांधा माल जरी पैलवानी नसला तरी भरदार होता. तो पूर्णपणें गोरा नव्हता तरी काळा किंबहुना त्याला ' सावळा ' या सदरांत देखील कोणी घातले नसते. त्याच्या मुखावर हास्याची छटा होती हें खरें; परंतु त्याच्या मुखांवरील बेफिकीर छटाच लोकांची मनें त्याच्याकडे आकर्षण करून घेण्यास कारणीभूत झाली होती. एकंदरींत त्याला पाहिलें कीं हा स्पोर्टसमन् आहे असेंच कोणालाही ह्मणावेंसें वाटे. त्यानें निळसर रंगाचा खादीचा कोट घातला होता; व पायघोळ पुरेपूर बावीस तेवीस इंची घेराच्या बाह्यांची तुमान त्यानें घातली होती. त्याच्या शीर्षावरील केशांचें त्यानें कोणत्याही प्रकारचें कौतुक केलेलें दिसत नव्हतें. ते नानाप्रकारचीं तेलं व पोमेडस् लावून चापून चोपून बसविलेले नव्हते, कीं त्यांच्यावर उलटे वळविणें, परमनन्ट वेव्ह वगैरे सारखे प्रयोगही झालेले दिसत नव्हते. उलट त्याचा स्वैरपणाच त्या तरुणाच्या स्वैरनिर्भय वृत्तीचा निदर्शक होता. एक पायरी टाकून दुसरीवर अशा उड्या मारीत त्यानें व्यासपीठावर आरोहण केलें. त्याबरोबर श्रोत्यांतून ' बक् अप चंद्रशेखर ' अशा एकदम आरोळ्या येण्यास सुरुवात

झाली. चंद्रशेखर हा डिबेटिंग सेक्रेटरींचा जानी दोस्त होता. त्याच्या बुद्धिमत्तेनें, खेळकरपणानें व कोटीबाज भाषापद्धतिमुळें तो सर्वांच्या परिचयाचा झाला होता. त्यानें अस्खलित इंग्रजींत भाषण करण्यास सुरवात केली. चंद्रशेखराची भाषण करण्याची पद्धत कोणावरहि एकदम छाप टाकील अशीच होती. तो अगदीं संथपणें बोलत असे. परंतु तो जें बोलें तें अगदीं वेचक; त्यानें अगोदर तेथें जमलेल्या श्रोतृसमाजाच्या असहिष्णुतेबद्दल, त्यांच्या क्षुद्र व पोरकट बुद्धीबद्दल तसेंच उथळ विचारसरणीबद्दलही चांगलीच हजेरी घेतली होती; व नंतर एकदम मी विवाहविषयक पूर्ण स्वातंत्र्याचा पुरस्कर्ता म्हणून आज स्टेजवर उभा आहे, असें अगदी एकाद्या मोठ्या वक्त्याचा आव आणून चेहऱ्यावर एक प्रकारचा गंभीरपणा आणून ठासून सांगून, त्यानें आपल्या भाषणास सुरवात केली. नीतीच्या तत्त्वावर किंवा समाजस्वास्थाच्या तत्त्वावर किंवा धार्मिक तत्त्वावर ज्यांनीं वैवाहिक स्वातंत्र्याची कल्पना निखालस त्याज्य, निव्वळ अस्पृश्य ठरविली त्यांचा त्यानें आपल्या भाषणांत योग्य तो उपहास केला; व व्यक्तीच्या सुखाच्या दृष्टीनें, फ्री लव्ह, फ्री मॅरेज, कम्पॅनिअनेट मॅरेज वगैरेला समाजानें मोकळीक ठेवावी; तसेंच वैवाहिक बाबी सर्वस्वी व्यक्तिवर अवलंबून असाव्यात, त्यांची उभारणी व्यक्तीच्या भावनेवर नसून बुद्धीवर, रीझनवर, व्हावी असेंही सांगितलें. चंद्रशेखराचीं मतें कोणाला पटोत वा न पटोत; परंतु त्याच्या वक्तृत्वाचा परिणाम श्रोत्यांवर मात्र झाला, यांत बिलकुल शंका नाहीं. कांहीं कुटाळ लोक सोडून इतरांनीं तो स्टेजवर उभा होता तोपर्यंत कांहींही हूं कां चूं केलें नाहीं; चंद्रशेखर आपलें भाषण संपवून स्टेजवरून खालीं उतरला; इतक्यांत लेडिस्टूडन्टस्मध्यें कांहीं तरी खळबळ उडालेली त्याला दिसली, व हॉलच्या उजव्या कोपऱ्यांतून कुमुदिनीला स्टेजकडे जातांना पाहून सर्वजण आश्चर्यचकित झाले. कुमुदिनीनें चंद्रशेखराच्या विधानांना जोराची पुष्टी दिली; व खोट्या धर्मभावनांना भलतेंच महत्व देऊन स्वतःच्या सुखाची, व आयुष्याची जे माती करून घेतात, आत्मवंचनेला जे बळी पडतात, अशा भ्याडांना जो समाज मान देतो, व त्यांचा उलट गौरव करितो, अशा समाजास

आजच्या सुधारणेच्या, प्रगतीच्या अत्युच्च शिखरानजीक जाऊन ठेपलेल्या जगतांत स्थान तरी काय म्हणून मिळावें, असा सडेतोड सवाल टाकून, आपले जोरदार भाषण तिनें संपविलें; प्रेक्षकांतून टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला; पण जितका टाळ्यांचा गजर जास्त मोठा तितका त्यांत उपरोधिकपणा हा अधिक असायचाच ! !

कुमुदिनीच्या भाषणानंतर वेळ फार झाला म्हणून अध्यक्षांनीं आपल्या नेहमींच्या गमतीदार भाषणानें समारोप केला व सभा बरखास्त झाली.

सर्व मंडळीं घरीं परतली. एकटी रोहिणी मात्र कॉलेजमधून सर्वांच्या मागून परततांना दिसली. तिची दृष्टी अगदीं पायाखालच्या जमिनीवर खिळून राहिली होती. जणूं काय आजच तिच्या दृष्टीला मातीच्या रस्त्यांत बारीक बारीक चकाकणारे वाळूचे कण असतात, हें प्रथम दिसून आलें; ती विचारांत इतकी गढून गेली होती कीं, मध्येंच एकादे वेळीं भानांवर आल्यावर तिला आपलीं पावलें आज इतकीं जड कां बरें पडताहेत असें वाटून ती थोडीशीं झपझप पावलें टाकावयास लागे; अशा या तिच्या मंद चपल गतीच्या तालांत तिच्या विचाराचें गाणें सुरूच होतें; व त्या नादांत आपल्यामागें कोणी खोकलें हें देखील तिच्या ध्यानांत येण्यास अंमळ वेळ लागला. आणि चंद्रशेखरानें आतां तिला “ कां किती झाले खडे मोजून ? ” असा हंसत हंसत प्रश्न केला. त्यावेळीं प्रथम ती गोंधळून गेली, मग त्याच्याकडे वळून खालच्या मानेनेंच पण त्याच्या डोळ्यांशीं भिडवीत ती म्हणालीः—

“ शेखर, मागूनच येत होतात तर, जरा येण्याची कांहीं सूचना, सुगावा लागूं देतां तर कांहीं बिघडलं असतं वाटतं ? ”

“ म्हणजे, मी काय कोणी एकादा बैलोबा आहे कीं काय, कीं गळ्यांत घंटा अडकावून हिंडलों, कीं चालतांना वाजलच ती आपली; किंवा हातांत बांगड्याही भरण्याची परवानगी आम्हाला नाहीं कीं बुवा सूचनार्थ त्या वाजल्या असत्या ”—

“ त्यांच्याशिवाय कांहीं दुसरे मार्ग नाहींतच वाटतं ! आणि सूचना देण्याचें इतके सौम्य मार्ग तरी काय तुमच्या उपयोगाचें ? एकाद्या बैलाच्या

गळ्यांत घंटा नसली तर तो हळूंच जातां जातां शिंगांनीं सूचना द्यावयाला चुकत नाहीं – ”

“ हं.हं. आस्ते आस्ते. बैल आणि त्याची शिंगं एवढ्यावरच अजून आहांत तें ठीक आहे; उपमा देण्याकरितां आणखीन कोणी उकिरड्याचे राजे आणि त्यांच्या सूचना देण्याच्या पद्धती ‘ डिस्कस् ’ करून आह्मांला त्यांच्या पंक्तीला नेऊन बसवलं नाहींत हें आमचं भाग्यंच; बरं पण अहो बाईसाहेब आपण फिरायला चलाल या आशेनें मी आपल्या मागें आलों. तों आपण आपल्या बोर्डिंगच्याच रस्त्याला पाय वळविलेंत कीं ! ”

“ मला कांहीं स्वप्न पडलं होतं वाटतं ?- बाकी इतकीं गोड स्वप्नं मला कोठून पडणार—हें काय – मलबार हिलवर चलणार ना ? ”

“ छे, त्या गर्दीत नाहीं मला जायला आवडत; पण आपण समुद्राच्या कांठाकांठानें जाऊं नी निवांत अशा ठिकाणीं जाऊन बसूं. ”

संध्याकाळ पडूं लागली होती. परंतु वेळेचें भान त्या दोघांनाही नसल्यामुळें समुद्रकांठानें निर्जन असें स्थळ हुडकून काढायचें, ह्मणजे फार दूरवर जावें लागेल याची त्यांना क्षितीही नव्हती; रस्त्यानें चालतां चालतां गप्पा अर्थातच त्या दिवशींच्या डिबेटवर आल्याः—

“ खरंच, मी ह्मणतों, हे लोक कधीं व्यक्तीच्या सुखाचा विचारच करीत नाहींत; नुसत्या आपल्या समाजस्वास्थ्य, धार्मिक भावना यांच्यावर त्यांचा सगळा भर. हल्लींचे युगांत ह्मणजे मनुष्यानें आपल्या सोयीकडेच जास्त लक्ष पुरविणें अवश्य आहे. ‘ Convenience ’ हें आजचें मुख्य ध्येय आहे. व्यक्तीच्या सुखावरच समाजाचें सुख अवलंबन आहे; खरोखर, एकाद्या नवऱ्यास जर आपल्या बायकोचा सहवास अत्यंत दुःखदायक होत असेल, तर त्यानें ह्मणे समाजस्वास्थ्य बिघडूं नये ह्मणून तो सगळा त्रास निमूटपणें सहन केला पाहिजे ! दारुड्या नवरा असला तरी ह्मणे, बायकोनें धर्माकरितां, समाजाकरितां, नीतितत्त्वांकरितां त्याच्याच जवळ आपलें आयुष्य कंठिलें पाहिजे. खरोखर, या अशा गोष्टी आमच्या बुद्धीला, रीझनला, कांहीं पटत नाहींत. ”

वादविवादावर गोष्टी वळल्यापासूनच रोहिणी गंभीर झालेली होती. चंद्रशेखराचें बोलणे संपल्यावर ती हलके हलके बोलूं लागली.—

" शेखर ! तुमच्या बुद्धिवादाला जरी आजच्या काळांत महत्व असलं, आधुनिक शास्त्रीय युगांत जरी त्याची किंमत बिनमोल असली, तरी माझ्यासारख्या भावनाजीवि हृदयाला तो कांहीं कांहीं वेळां परिणामकारी होत नाहीं; कित्येक वेळेस आणि कांहीं विशेष बाबींत बुद्धीपेक्षां मला भावनांची किंमत अधिक वाटते. 'फ्री लव्ह' व 'फ्री मॅरेज ' चा तुह्मी पुरस्कार करितां तो कशाकरितां, तर ह्मणे ' एकीशीं आपली मतं पटलीं नाहींत " एकादींत आपल्या मतें जर कांहीं वैगुण्य सांपडलें तर दुसरीशीं लग्न करायला मोकळीक असावी ह्मणून; पण मला बाई 'एकादीची मतं पटत नाहींत' याचा अर्थच नाहीं ध्यानीं येत. शेखर, तुह्मी एकाद्या मुलीशीं अनुभवाकरितांच ह्मणून कांहीं दिवस संबंध ठेवणार, ते प्रेमाशिवायच कां ? तुह्मी एकादी मुलगी पसंत करणार, ती तिच्याबद्दल तुह्मांला कांहींतरी वाटत असेल ह्मणूनच ना ? मग प्रम ह्मटलं कीं भावना आल्याच. प्रेम बुद्धीला नाहीं ' ॲपील ' होत. भावनेलाच होतं. बरं, मी ह्मणतें असंही होणं शक्य असेल कीं अगोदर आपण जिच्यावर प्रेम केलं, तिच्याशींच पुढं कांहीं बाबतींत आपली मतं नाहीं जुळली; पण मग बायकोशीं आपलीं मतं जुळलींच पाहिजेत, हा हट्ट कां ? अगदीं दोन माणसांचीं मतं सर्वस्वी एक कशीं असणार बाई ? त्या योगानें व्यक्ती स्वातंत्र्याच्या तत्त्वाला बाध नाहीं कां येत ? मी तर बाई ह्मणते कीं ज्याला आपण 'लव्ह मॅरेज' किंवा प्रीति-विवाह ह्मणतों, तोच सर्वांत उच्च प्रतीचा होय. फ्री लव्ह, फ्री मॅरेज किंवा कम्पॅनिअनेट मॅरेज आणि आपला प्रीति-विवाह याच्यांत माझ्या दृष्टीनें फार फरक आहे. वैवाहिक गोष्टींत तरी बुद्धीचा किंवा व्यावहारिक सोयीगैरसोयींचा प्रश्न उपस्थित करणें, निदान मला तरी कसेंतरीच वाटतें; इतर सर्व बाबींत बुद्धीचें वर्चस्व मी कबूल करितें; परंतु या बाबतींत मी माझ्या भावनांचाच मजवर अम्मल चालूं देईन. आपण जिच्यावर प्रेम करितों, ती कांहीं शारीरिक व्याधींनीं पीडित झाली ह्मणून तिचा इतक्या सहवासानंतर त्याग करून दुसरी पत्नी करणें,

मला तरि माणुसकीला सोडून आहे, असंच वाटतं. जिच्यावर एकदां आपण प्रेम केलं, तिला पुढें कसल्याही कारणाकरतां सोडून देणें अगदीं गैर आहे. "

" तुमचं ह्मणणं मला अगदीं पटत नाहीं असं नाहीं. प्रीतिविवाह आणि तात्पुरते विवाह यांत फरक तर आहेच; परंतु प्रीतिविवाह तरी किती शक्य आहेत आपल्या समाजांत ? आणि असं पहा, कित्येक वेळेस असंही होतं, कीं कांहीं थोड्याच व्यक्तींचा आपल्याशीं संबंध येतो; आणि एकादीचा जास्त सहवास घडला कीं, त्याच व्यक्तीबद्दल आपल्या मनांत कांहीं भावना उत्पन्न होतात; पण याचें कारण एवढेंच कीं दुसऱ्या व्यक्तीशीं आपला सहवास नसतो. एकादे वेळेस असेंही शक्य आहे कीं, आपणांस अज्ञात असणाऱ्या व्यक्तींतही आपल्या विचारांशी, कल्पनांशी समरस होण्या-सारखे गुण असतील; आणि अशी व्यक्ती जर कर्मधर्मसंयोगानें आपणास ज्ञात झाली, तर सहाजीकच तिच्याबद्दल आपल्या मनांत प्रेम उत्पन्न होण्याचा संभव आहे; अशा वेळीं दोन व्यक्तीवर प्रेम केल्याचा आरोप आमच्यावर समाज करितों. "

" मग दोनच कां अशा कितीतरी अज्ञात व्यक्ती असतील; आणि अशा कितीतरी ज्ञात होतील; मग आपली एक सोडून दुसरी, दुसरी सोडून तिसरी, असंच कीं नाहीं.– " एकदम हसूं फुटून ती हसंत हसंतच ह्मणाली. नंतर तिचें हसें थांबल्यावर ती ह्मणाली:—

" अहो, आतां पुरें झालें लांब जाणं, संध्याकाळही झाली आहे; आणि माणसंही आपल्या बाजूला येत नाहींत. तर बसूं या आपण इथच जरा वाळूवर "

" ठीक आहे; पण त्या पुढच्या खडकावर आपण बसूं, इथं बसण्यापेक्षां – "

" बरं चला. " आज बोर्डिंगांत जायला मला किती उशीर होणार आहे कोण जाणे ?— खडकावर बसतां बसतां ती ह्मणाली. चंद्रशेखरही तिच्या जवळंच त्या खडकावर बसला; चंद्रशेखर तिच्याजवळ येऊन बसला

त्यावेळीं तिच्या नाजूक हृदयांत कसल्या तरी लहरीवर लहरी उठूं लागल्या होत्या. तिची दृष्टीही चंद्रशेखरकडे पाहण्यास संकोच करूं लागली. जसा कांहीं तो तिला अगदीं अपरिचित होता. तिला त्यावेळीं सारखी—

अकिंचिदपि कुर्वाणः सौख्यैर्दुःखान्यपोहति ।

तत्तस्य किमपि द्रव्यं यो हि यस्य प्रियो जनः ॥

या श्लोकाची आठवण झाली तिनें मुद्दासच समुद्राच्या शोभेवर आपले डोळे खिळले आहेत असा बहाणा केला.

आणि खरोखरीच समुद्राची शोभा यावेळीं अप्रतीम होती त्यावेळीं त्या उदधीवर लाटा इतक्या तुफान उसळत होत्या कीं त्याच्या उदरांत कोणीतरी प्रचंड पशू जलाशयाच्या पृष्टभागाशीं टकरा देत आहे कीं काय असें वाटे. एकामागून एक अशा काळ्याभोर लाटा उसळून येऊन एकाद्या खवळलेल्या सर्पानें आपली फणो रागानें दगडावर आपटावी तद्वतच त्या किनाऱ्याच्या दगडावर येऊन आपटत.

रोहिणी आणि चंद्रशेखर एकाग्र होऊन ही गम्मत पहात होते. समोरून एक लाट बरोबर एकादा पाण्याचा डोंगर घेऊन यावा त्याप्रमाणें येत होती. त्यावेळीं रोहिणी एकदम ह्मणाली –

“ ती पाहिली कां ती लाट ? किती आवेशानें, किती वेगानें आणि उत्सुकतेनें इकडे येत आहे ती ! तिच्या भावनांना इतकी कांहीं भरती आली आहे कीं त्यांना रोखून धरणें तिला अगदीं अशक्य झालें आहे. पण खरंच बाई या सर्व परिश्रमानें तिचें हृदय किती जोरानें वर खालीं होत आहे ? तिचें सर्व मुखकमल फेसांनीं व्याप्त झालें आहे. अहाहा ! पण या फेनराशीनें, एकाद्या लहानशा ढगा भोंवती चंद्राच्या कोरीचें मंडल असावें तद्वतच त्या तरल लहरीस कांहीं विलक्षण शोभा आली आहे – ”

“ पहा, पहा ती जसजशी किनाऱ्यानजीक येत आहे तसतसा तिचा प्रवाह जास्तच वेगवान होत आहे–आणि–आतां शेवटीं ती शान्त झाली ! प्रियकराच्या विशाल वक्षस्थलावर जेव्हां तिनें आपलें शीर टेकविलें, त्याच्या कंठांत आपलें तुषारांकित बाहू टाकून जेव्हां त्याच्यांत ती

विलीन झाली तेव्हां कोठें तिचा खळबळाट थांबला. तिला खरी खरी समाधानाची स्वर्गीय तंद्री लागली. " असें ह्मणून चंद्रशेखर तिला अगदीं बिलगून बसला.

ती प्रचंड लाट जेव्हां किनाऱ्याच्या विशाल खडकावर येऊन आपटली त्यावेळेस झालेल्या प्रचंड आव्हानास रोहिणीच्या हृदयांतील खळबळाटाची जोड मिळाल्यामुळें देहभान विसरून रोहिणीनें आपले मस्तक चंद्रशेखराच्या स्कंधावर टेकविलें. एक क्षणभरच आपले डोळे मिटवून घेतले. तिच्या भुवयां व पापण्या काळया होत्या. त्या तिच्या गौरवर्ण भालप्रदेशाला जणूं काय किनार लावल्याप्रमाणें खुलून दिसत होत्या. चोहीकडे शान्त झालें. चंद्रशेखर एक चित्तानें त्या खडकाजवळ उद्‌भवणाऱ्या बारीक बारीक लहरींकडे कुतूहलानें पहात होता. जणूं काय त्या लहरींमध्ये तो आपल्या हृदयांतील सुखमय संवेदनांचें, त्याच्या अन्तःकरणांतील प्रेमोर्मींचें प्रतिबिम्बच न्याहळीत होता. जवळच्या खडकावर पांढऱ्या शुभ्र रंगाचे दोन पक्षी त्या जलाशयाकडे टक लावून पहात होते व मधून मधून दोघेही पंखाची फडफड करून एकमेकांच्या पंखांत पंख अडकवीत होते. दूर लांबवर एक मनुष्य आळशीपणानें पाण्यांत गळ टाकून बसला होता. त्याच्याच पलीकडे एक नारळवाला पाटींत पुष्कळशी शहाळी भरून वाळवंटांत पेंगत बसला होता. मावळत्या सूर्याच्या सोनेरी किरणानीं निशानाथाच्या आगमनाकरितां समस्त नभोमंडल अगदीं निर्मळ करून ठेवलें होतें.

तिनें संथपणें पण प्रेमपूर्ण साद दिली— " शेखर. " अत्यंत हर्षभरीत होऊन आपल्या हातांनीं तिच्या स्कंधाभोवतीं विळखा घालून चंद्रशेखरनें प्रत्युत्तर दिलें ' रोहिणी ' पुन्हां थोडा वेळ स्तब्धता झाली. आणि चंद्रशेखरनें त्या शांततेचा भंग केला. ' रोहिणी, ' तिच्या तोंडाकडे तोंड वळवून व तिचे हात आपल्या गळया भोवतीं अडकवीत तो ह्मणाला, " रोहिणी, आपणांस न कळतच आपण एक जीव झालों आहोंत. रोहिणी तुझ्या सहवासांतच माझें आयुष्य अत्यंत सुखमय होईल अशी मला खात्री वाटत आहे; आणि तुझीही मला तुझ्या सुखदुःखाचा भागी-

नगर वाचनालय, सातारा.



दार करून घेण्यास पूर्ण संमति आहे याबद्दल माझी खात्री पटून चुकली आहे. रोहिणी, म्हण ना एकदां मी तुझा आहे असें."

रोहिणीनें, हृदयांतील खळबळ अनावर झाल्यामुळें चंद्रशेखरच्या वक्षस्थळावर आपलें मस्तक ठेविलें. ती लाट एवढ्यांत वेगानें येऊन त्य खडकावर आपटून शांत झाली. चंद्रशेखरानें आपले गाल रोहिणीच्या मस्तकावर टेकविले. सर्वत्र स्तब्ध झालें.

× × × ×

आज त्या गोष्टीस सात आठ महिन्यावर काळ लोटला होता. रोहिणी व चंद्रशेखर या दोघांत असें ठरलें होतें कीं एक वर्षभर दोघांनीं अविवाहित राहून एकमेकांच्या आवडीनिवडीची ओळख करून घ्यावी. परंतु या काळांत जर एकमेकांस किंवा दोहोंपैकीं एकास जर दुसऱ्याचा सहवास सह्य नाहीं असें वाटूं लागलें, व त्यास दुसऱ्याचा सहवास सोडावासा वाटला तर त्यास दुसऱ्यानें बिलकूल हरकत करूं नये. आणि रोहिणीनें चंद्रशेखरकरितांच केवळ जागाचीही पर्वा न करितां एक वर्षपावेतों अविवाहित राहून एकमेकांच्या आवडीनिवडीची चांगली ओळख होईल इतक्या सहवासांत राहण्याचें मनोधैर्य दाखविलें होतें.

÷ ÷ ÷ ÷

वैवाहिक निर्बंधाच्या डीबेटनंतर थोडेच दिवसांनीं कोर्स संपल्यामुळें कुमुदिनीनें कॉलेज सोडलें. व तिनें समाजकार्यास आपणांस वाहून घेतलें. तिनें चंद्रशेखरच्या व आणखीही कांहीं लोकांच्या मदतीनें एक मासिक काढलें होतें. व त्यांत प्रेमविवाह, कम्पॅनिअनेट मॅरेज, संतति-नियमन वगैरे निरनिराळ्या सामाजिक विषयावर लेख येत असत. कुमुदिनीचें नांव सर्वतोमुखीं झालें होतें. चंद्रशेखरला व तिच्या सहाध्ययांना तिच्या गुणाची ओळख पटली होती. चंद्रशेखराला कुमुदिनीच्या सहवासांत तिच्या बुद्धिमत्तेची ओळख पटल्यामुळें तिच्याबद्दल त्याला फार आदर वाटे. आणि त्यामुळेंच हरघडीला चंद्रशेखरला रोहिणीच्या निष्क्रियतेची व कुमुदच्या धडाडीची जाणीव होत असे. प्रत्येक क्षणाला त्याला त्याच्या व

रोहिणीच्या स्वभावांतील नैसर्गिक भिन्नतेची, दोघांच्या विचारांतील मतांतील फरकाची, एकमेकांच्या असदृश आवडी निवडीची सत्यप्रतीति येत असे.

चंद्रशेखरनें रोहिणसि, विद्यमान तत्त्ववेत्ते प्रखर बुद्धीच्या योगानें ज्ञानी ह्मणून योग्यतेस चढलेले, व शास्त्रशुद्ध आणि कांटेतोल गणिती, तर्कशुद्ध पद्धतीनें विचार करणाऱ्या समाजशास्त्रवेत्त्यांचें वाङ्मय वाचावयास द्यावे व रोहिणी लाही ते वाचण्यास फार आवडे. परंतु त्यांची विचारसरणी ग्रहण करण्याची तिनें कधींही इच्छा दाखविली नाहीं. चंद्रशेखरनें कुमुदिनीच्या मासिकाकरितां एक लेख लिहिण्यास रोहिणसि सांगितले. विषय गृहिणी आणि कुटुंब असा होता. आणि तेवढ्याकरतां त्यानें मुद्दाम शॉचे— ' Intelligent Woman's Guide,' नंतर कौटुंबिक अर्थशास्त्र वगैरे मारून मोठालीं पुस्तकें आणून दिलीं. रोहिणीनें त्यावर त्याला उत्तर दिलें, " शेखर, माझे डोळे पूर्णपणें उघडे ठेवून मी काय विचार सुचतलि ते कागदावर उतरवीन परंतु त्याबरोबरच माझ्या अन्तःकरणाचे, भावनेचे जे संदेश मिळतलि त्याला अनुसरूनच माझें लिखाण रंगलें जाईल, आणि ह्मणूनच ह्मणतें मला जें लिहायचें आहे तेवढ्याकरितां या पुस्तकांची विशेष गरज लागेलसें मला मुळींच वाटत नाहीं. मला जर तुह्मी कुटुंब या विषयावर Economic point of view नें किंवा अगदीं Statistically आंकडे वगैरे देऊन अभ्यास करून प्रबंध लिहिण्यास सांगितलेत तर ते काम मी केवळ तुमच्याकरितां ह्मणून करायला तयार होईन. परंतु तुह्मी जर सर्व गोष्टी माझ्या इच्छेवर सोपविल्यात तर शॉ किंवा एकादा बडा अर्थशास्त्रवेत्ता याच्याकडे धाव न घेतां शेक्सपियरसारखा एकादा भावनांची भाषा बोलणारा, किंवा शेली, कीट्स् वगैरे सारखा कल्पना साम्राज्यांत डोलणारा किंवा टेनिसन वर्डस्वर्थसारख्या कवी–शिरोमणींनाच मी मदतीकरतां पाचारण करीन. "

" रोहिणी तुझी प्रवृत्ती जगावेगळं राहून काम करण्याची आहे. मला जगांत राहूनच काम करायचं आहे. तुझ्या कवी--पक्षांचीं गाणीं सकाळीं फार झालं तर संध्याकाळी एकाद् दुसरा तासच फक्त ऐकायला

जगाला वेळ काढतां यईल. परंतु हे गोड गोड कोकिलरव, जगण्याला कांहीं मदत करतील काय? आजकाल तोलून मापून, चापून चोपूनच जगायला लागतं. त्यांत कोणत्याहि प्रकारचा सैलपणा उपयोगाचा नाहीं. माझा तुझ्या गूढ वादावर बिलकूल विश्वास नाहीं. कुमुदनें कुटुंब याच विषयावर एक लेख लिहला आहे. तो इतका शास्त्रीय व विचारपूर्ण आहे कीं, लोकांना त्याच्या विरुद्ध बोलायला फारशी जागाच नाहीं. रोहिणी, तुझें नी माझें अशा पुष्कळच महत्वाच्या बाबींत मुळींच पटत नाहीं. कुमुदसारख्या पत्नीच्या सहाय्यानें मी कितीतरी काम करूं शकलों असतो. आणि म्हणूनच— " तो घुटका गिळण्याकरितां मध्येंच थांबला व नंतर मोठा जोर करून एकदम म्हणाला— " रोहिणी, नीट ऐक. कुमुदनें व मी एकमेकांच्या सहवासांत आयुष्य काढण्याचें ठरविलें आहे. यावरून मला तुझा कंटाळा आला, किंवा तूं मला आवडत नाहींस अशांतला भाग नाहीं. परंतु कुमुदला व मला दोघांना जें कार्य करतां येईल तितक्या चांगल्या रीतीनें तें आम्हीं कायावाचामनें भिन्न राहून होणार नाहीं अशी आमची दोघांचीहि समजूत आहे. रोहिणी," तो तिच्या अगदीं जवळ जाऊन तिचें हात आपल्या हातांत धरून म्हणाला —" तूं आजवर माझ्यावर निरपेक्ष प्रेम केलेंस व त्या प्रेमाच्या मुळें तुला सोडून जातांना मला कष्ट होताहेतच. परंतु तुझ्या व माझ्या निसर्गनिर्मित स्वभाव--भिन्नत्वामुळें माझ्या आयुष्यांतील भावी दुःस्थिति टाळण्याकरितां मी ही गोष्ट करीत आहे. रोहिणी तूं मला क्षमा करशील ना? " रोहिणीनें कांहींहि उत्तर दिलें नाहीं. तिला चंद्रशेखरचा बिलकूल राग आलेला नव्हता. परंतु तिला अत्यंत दुःख होत होतें. ती एकदम फिकट पडली. परंतु चंद्रशेखरला आपण फार दुःखी आहों असें समजूं नये अशी तिची इच्छा होती. म्हणून त्यांस निरोप देतांना तिनें म्हटलें, " शेखर, मी प्रथमच तुम्हाला तुमच्या स्वातंत्र्याबद्दल हमी दिलेली होती. व आपणां दोघांतही, एक वर्षानंतर आपले न पटल्यास एकमेकांचे मार्ग एकमेकांला मोकळे असावेत, असें अगोदरच ठरलेलें होतें. या एक वर्षांत शेखर माझ्या स्वभावाच्या विशिष्ट रचनेमुळें सहवा-

सानें तुमच्यावरील माझें प्रेम, भक्ती ही दुप्पट वाढली. आणि मला कांहीं त्रास झाला असतां तरी तुह्मांला सोडून जाण्यास मी तयार झालें नसतें. आणि शेखर, तुह्मी जरी मला सोडून जातां आहां तरी मी तुह्मांला त्याबद्दल बिलकूल दोष देत नाहीं. ”

असें स्मितपूर्वक ह्मणून ती तेथून निघून गेली!

\+ + + +

मुंबई सोडून आपल्या गांवीं आल्यास रोहिणीस आज पंधरा एक दिवस झाले. तिचे वडील टाटा कंपनींत नोकरीस होते. व त्यांनीं एक लहानशी बंगली खंडाळा आणि लोणावळा यांच्यामध्यें एका लहानशा गांवानजीक बांधलेली होती. रोहिणीच्या मनाला सारखी हुरहुर लागून राहिलेली होती. एक वर्ष चंद्रशेखरच्या सहवासांत काढले असतांना त्यानंतर त्याला आपला पती--प्रियकर न मानतां केवळ मित्र ह्मणून समजायचें! किती विलक्षण, असंभवनीय, अशक्य गोष्ट आहे ही. तिच्या जिव्हेवर सारखे ‘ शेखर ’ हेंच नांव घोळे. तिच्या हृदयांतलि प्रत्येक ठोका ‘ शेखर ’ असाच ध्वनी काढत होता.

आजही ती अशीच शेखरची मार्गप्रतीक्षा करीत होती. तिनें जरा वर मान केली तो आज सूर्य किरणें अद्याप तिच्याकडे पाहून गोड हंसत असलेली तिला दिसलीं. इतक्यांत तिच्या डोक्यावर कसला तरी कुणी लाडुक टिचकी मारावी असा मृदु आघात झाला. तिनें सापेक्ष उत्सुकतेनें मान वर केली तों काय? तिच्या मस्तकावरून एक लहानसा ओघळ कपाळावर आला. वरून झाडाच्या पानावरून पाण्याचा एक थेंब तिच्या डोळ्यावर पडला. व तिच्या आशातुर मनाला प्रियजनानें टिचकी मारली असाच भास झाला? आतां मात्र तिला दुःख व निराशा अनिवार झाली. ती हातांनीं डोळे झाकून रडूं लागली. व शेवटीं शेजारच्या दगडावर मान टाकून तिनें आपल्या अन्तःसंतापाला भरपूर वाव दिला. पण हें काय आश्चर्य? तिकडून शेखर हलके हलके रोहिणीच्याकडे येत होता. तो रोहिणीच्या अगदीं जवळ आला तरी त्यानें तिला हांक मारली नाहीं. तो तिच्या जवळ बसला व तिच्या खांद्यावर हात ठेऊन त्यानें हांक मारली ‘ रोहिणी! ’

रोहिणीची अवस्था त्यावेळीं काय झाली असेल हें वर्णन करणें अशक्य. तिनें एकदम त्याच्या गळ्याला मिठी मारली. थोड्या वेळानें तिचे अश्रु लोपून गेले. व तिनें बोलण्यास सुरुवात केली. “ शेखर, तुह्माला मित्र मानणं मला अगदीं अशक्य आहे हो. एक क्षण देखील मला तुमचा विसर पडत नाहीं. तुह्मी सारखे माझ्याजवळ असावं असं वाटतं मला. शेखर, तुमच्या व माझ्या मतांत, स्वभावांत फरक असेल पण मला तो कधीं नडला नाहीं. हे एवढें आपणा दोघांत वैषम्य असूनही मला तुह्मी आवडता. शेखर, मला तुह्मी पाहिजे हो—”

“ आणि ह्मणूनच तर मीं आलों. रोहिणी, मी कुमुदच्या सहवासांत थोडे दिवस काढले. पण तुझी आठवण जाईना. माझी सारखी तळमळ तळमळ होत होती. एक वर्षाच्या इतक्या दाट सहवासानंतर तुझा विरह सहन करणें अगदीं हास्यास्पद आहे अशी माझी खात्री झाली. कुमुदला मी माझी तळमळ सांगितली. पण ती तरी मला काय सांगणार? ज्यांत आपल्याला सुख वाटेल तीच गोष्ट करणें श्रेयस्कर एवढेंच ती ह्मणाली. रोहिणी, तुला सोडतांना मीं ह्मटलें होतें कीं, भावी दुःस्थिति टाळण्याकरितां मी हा दुःखाचा क्षण सहन करीत आहे. पण आतां यापुढें तुझ्याशिवाय रहाणें मला अगदीं अशक्य आहे. रोहिणी माझ्या बुद्धीजिवी आयुष्यावर तुझ्या भावनाच्या दर्पणाचा कवडसा पडल्यावरच ती अत्यंत दैदिप्यमान भासेल; बुद्धीविना--रीझनविना मनुष्याला श्रेष्ठत्व मिळणार नाहीं. पण भावनेविना माणुसकी कसली आली आहे! बुद्धीची--शास्त्राची उभारणी भावनेच्या भूमिकेवर होते आणि ह्मणूनच रोहिणी एक वर्षाच्या प्रेमळ सहवासानंतर, माझ्या भावनांवर बुद्धीचें सामर्थ्य चालणें अगदीं अशक्य आहे.”

# फत्तरास–

[ खालील विचार, डोंगरांतून सुटून पडलेल्या एका प्रचंड खडकास पाहून सुचलेले आहेत. कधीं कधीं अगदीं क्षुल्लक वस्तूमध्यें देखील कांहीं गूढ तत्त्व भरलेलें आढळतें; परंतु आपण त्याजकडे दुर्लक्ष करून निष्कारण कित्येक वस्तूंना नांवें ठेवितों ! ]

( चालः— अर्ध तनू वारुळी — )

उगा फत्तरा, उगाच कां बा वाटे वाइट तुला
सत्वरि सखया सांगे मला ।
भासे मजला मलूल, तंव मुख, हरित--वस्त्र तव कुठें ?
बघतां मन आनंदा लुटे ।
' फत्तर ' ऐसें वदुनि घडि-घडी धिःकारिति तुज जनीं
ह्मणुनि कां वाइट वाटे मनीं ।
गणु नको तयांना जन जे तुज बोलती
काढणें उणें अन्यांचें ही जन-रिती
मूढ त्या गणावें, हें सज्जन सांगती ।
अवगुण जन जे ह्मणती तव, ते सद्गुण भासति मला
त्यजी जरि खेद मतिस जाहला ॥ १ ॥

२

' उद्यम त्यजुनी, सुप्त सर्पसम, वनांतरीं राहणें '
मानिती व्यर्थ जगीं तव जिणें ।
गमसी माते वनाभीतरीं शीतोष्णा साहुनी
आचरिसि उग्र तपा निशिदिनीं ।

‘ कठोर हृदयीं ’ संबोधिति जरि, हृदय तुझे पाझरे
तोषविसि तृषार्त श्रम-- घाबरे ।
प्रासाद मनोरे सुरम्य जरि बांधिती
धि:कारुनि तूतें ना उपकृति मानिती
शांत त्वा असावें सांगे माझी मती ।
अंगिं टाकिचे घांव सोसुनी देवत्वा पावसी
कीर्ति मग पसरे तव दशदिशीं ॥ २

३

उपकाराची अपकारानें फेड करी जगिं कुणी
झटेना स्वदेश--हित--कारणीं ।
सत्कृत्या पासुनी ढळविती, अडचाणि घालुनि झणि
कृतीला अधीच नाकारुनि ।
छिद्रान्वेशी असति जगिं कुणी, अपकर्षा इच्छिती
मानिसि का त्यांची तूं क्षिती ? ।
फत्तराहुनी हे नीचाचि गमती मला
बा, काय ह्मणावें न सुचे ऐशा खला
त्वत्समान संतांच्या जे करिती छला ।
जनस्वभावा औषध नाहीं, आनंदी ही जरा
क्रमण कर काळ आपुला बरा ॥ ३ ॥

४

ह्मणोत कोणी ‘ फत्तर ’ मजला मित्र ह्मणुनि मी तव
तयांची मानी न क्षिति लव ।

सुदैव माझे वाटे माते मित्र लाभला मला

तुझ्या सम अहा! जगीं या मला।

'फत्तर' नामामधें आढळे 'फत्ते' होइल सदा

येइना दुर्धर कां आपदा॥

गुरु समान वंद्यहि घडि घडि गमसी मला

निंदिती जगिं कुणी कृतघ्न जन बा तुला

दुर्लक्ष करीं तूं, फत्तर कुणि बोलला

मोह भरानें करूं लागु या आपण कार्या झणी

वाटे फत्तर व्हावें मनीं--- ॥ ४ ॥

**केशव लक्ष्मीकांत पुरोहित.** ( इंटर आर्टस् )


## S. P. Book-Stall

21 Budhwar, Poona 2

The S. P. Book-stall will direct you to and give you the "best books" Here you will find:—

The most courageous Warriors against war and Virile Fighters for humanitarian ideals, like.

Mahatma Gandhi, Romain Rolland, Leo Tolstoy and Master thinkers like:—

**Bertrand Russell** **Bernard Shaw** **Sinclair Lewis**
**Dean Inge** **Havelock Ellis** **Thomas Mann**

A new stock of Little Blue Books has arrived & is sold at reduced prices. ( 2 ans. each; quantity price, 1 Anna 6pies.)

The Stall would be glad to secure any book you want from England and America in about 5 and 8 weeks respectively at a reasonably low cost.

The Stall also collects subscriptions for Inland as well as Foreign Periodicals at Publishers' rates which are exchanged here *generally* at **Ten Annas a Shilling and Three Rupees a Dollar.**

# साहित्यस्वागत

## × निर्झरिणी

'**निर्झरीणी**' ह्या काव्यसंग्रहांत श्रीमंत सौ. सरोजिनीबाई पंतसचीव व श्रीमंत स. र. पंतसचीव यांच्या कांहीं निवडक स्फुटवजा कविता एकत्रित केलेल्या आहेत. उपरिनिर्दिष्ट पुस्तकास प्रो. वामन मल्हार जोशी यांची सुंदर प्रस्तावना जोडिली असून, तें गणेश महादेव कंपनीनें प्रकाशित केल्यामुळें त्याचें बाह्यांगही चित्तहारी झालें आहे. हा काव्यसंग्रह कविद्वयांनीं श्रीमंत बाबासाहेब पंतसचीव यांच्या चरणीं नम्रभावें अर्पिलेला आहे.

कवींनीं आपल्या आयुष्यांतील कांहीं संस्मरणीय प्रसंग आपल्या गोड भाषाशैलीनें व कल्पना--माधुर्यानें, वाचकांना कथन केलेले आहेत.

" **जानकी, वेड तुज लागे.** " ह्या कवितेंतील वर्णन चांगलें साधलं आहे. " **राजसिंह** " ही वर्णनप्रधान कविता देशभक्तीपर असून त्यांत कवींच्या उत्कट भावना प्रगट झाल्या आहेत. " **अनारकली** " ही शोकरसपूर्ण कविता फार परिणामकारक झाली असून, तिच्यांतील उपमासौंदर्य उच्च प्रकारचें आहे.

" **गुराखीण** " ही सचित्र प्रेमकथा सुरस असून, त्यांतील शेवटची ओळ—

" तुजविणें यावि मज काळ झोंप दैवानें ! " त्या विरहिणीच्या उच्च प्रेमाची साक्ष पटविते.

" **चोरी** " ह्या विनोदात्मक कवितेंत एका भोळ्याभाबड्या स्त्रीचें साधें भोळें मन, कवीनें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

" **आळवणी** " ही वर्णनपर कविता असून, ती भाषेच्या दृष्टीनें सरस आहे; व कवितेंतील चाल एकंदर विषयास अनुरूप अशीच योजिल्यामुळें, व त्यांतील नादमाधुर्यामुळें, ही कविता मनोवेधक झाली आहे.

---

× 'निर्झरिणी' हें काव्यपुस्तक **गणेश महादेव कंपनी**कडे सध्यां छापत आहे, तें लवकरच प्रकाशित होईल.

" **विकल्प** " ह्या कवितेंतील पतिपत्नी-संवाद विनोदात्मक आहे.

" **तऱ्हा वेगळी ह्या प्रेमाची—** " ह्या कवितेंतील एका सर्वसाधारण स्त्रीचे प्रेमविषयक विचार सुंदर प्रकारें मांडिलें आहेत.

" **रवींद्रनाथास—** " कवींना रवींद्रनाथांच्या बद्दल किती प्रेम व आदरभाव वाटतो, हें ह्या कवितेंत अगदीं स्पष्ट दिसून येतें.

" **ज्ञान** " ह्या कवितेंतील कल्पना ( At times ignorance is bliss ) जरी इंग्रजींतून घेतली आहे, तरी अगदीं समर्पक विषयरचनेमुळें बोधकारी व मनोरंजक वाटते.

" **योगींद्र** " हें खंडकाव्यही बरें झालें आहे.

श्रीमंत स. र. पंतसचीव ह्यांनीं आपल्या " निर्झरिणी " पुस्तकाचा उद्देश खालील दोन ओळींत सांगितला आहे, त्या ओळी देऊन हें परीक्षण पुरें करितों.

" कांहीं सृष्टिमधील लोक-विकृती येथें—
सखे, गुंफिल्या
प्रेमाच्याहि तशाच अल्पमतिनें त्या
भावना वर्णिल्या"॥

**गो. वि. राजगुरु.**

---

## * पुष्पराणी ( कादंबरी )

" पुष्पराणी " ही कादंबरी **श्रीफणींद्रनाथ** यांच्या एका बंगाली कादंबरीचें रूपांतर आहे. " कुलीन स्त्री-वाङ्मयमाले"नें आपल्या ध्येयानुसार हें द्वितीय पुष्प वाचकांना सादर केलें आहे. 'पुष्पराणी' ही कादंबरी मालेच्या ध्येयास अगदीं अनुसरूनच आहे. ह्या कादंबरींतील पुष्पराणीची भूमिका आर्यमहिलांना आदर्शभूत अशीच रंगावलेली आहे. पुष्पराणीची अपत्यें, प्रफुल्ल, अनिल, अरविंद व सुशील, हीं, खरोखरीच, सुशीलाचीं दाखविलीं आहेत.

---

* **ले० शं. दि. करंदीकर**

प्रस्तावना लेखिका,—कु. चंद्रावतीबाई श्री. कर्नाटकी एम्. ए.

# साहित्यस्वागत

प्रस्तावना लेखिकेनें ह्मटल्याप्रमाणें हीं पुष्पराणीचीं लहान मुलें, शाळेंत जाणाऱ्या मुलांना सुपथ दाखविणारीं अशींच आहेत. ही कादंबरी लहान मुलांमुलींनीं अवश्य वाचावी; कारण " ज्यांचें त्यांनीं [ लहान मुलांनीं ] अनुकरण करणें योग्य आहे त्याच गोष्टी कादंबरीरूपानें त्यांच्या मनांवर ठसल्यास रुक्ष उपदेशाच्या कडू काढ्याऐवजीं बालामृताच्या घुटक्यांचाच आनंद नाहीं कां [ त्यांना ] होणार? " असें कु. चंद्रावतीबाईंनीं आपल्या प्रस्तावनेंत अगदीं समर्पकच विधान केलें आहे.

नित्य व्यवहारांत आढळणारें असें एक सर्व सामान्य कथानक प्रस्तुत कादंबरीकारानें निवडिलेलें असून, एकंदरींत पहातां बहुतेक प्रसंग हृदयस्पर्शी व चित्तवेधक आहेत. पुष्पराणी व विमल यांचे स्वभाव एकमेकांच्या अगदीं विरुद्ध असे आहेत. पुष्पराणी जशी दिसावयास सुंदर व देखणी आहे; तशीच ती स्वभावाची प्रेमळ, सहनशील व खरी पतिव्रता असल्यामुळें वाचकांच्या मनांत तिजबद्दल सहानुभूती व आदर वाटतो.

विमल ही श्रीमंतीमुळें गर्विष्ठ व लोकांत आढ्यता मिळविण्याचा अटोकाट प्रयत्न करणारी स्त्री आहे. तिच्या आपल्या सर्व मुलांवरील लाडांचा अतिरेक त्या मुलांच्या वर्तनावर होतो; व ह्मणूनच विमलची मुलें श्रीगुरु, दुर्योधन, व शशिधर हीं हट्टी, चैनी व उधळपट्टी करणारी बनलीं आहेत. नारायणराव मात्र एक साधा व्यवहारी पुरुष असून त्याचें आपल्या वृथाभिमानी पत्नी [ विमल ] पुढें कांहीं चालत नाहीं. हरीभाऊ हा एक उत्साही तरूण, अगदीं स्वतंत्रवृत्तीचा व सुशील असा दाखविला आहे, परंतु सभोंवतालच्या प्रतिकूल परिस्थितीपुढें व शारिरिक आजारामुळें त्यास जगाचें दुःसह आघात सहन करणें भाग पडतें.

हरीभाऊंच्या कंजुष मामांचें चित्र परिणामकारक झालें आहे. त्या कादंबरीची भाषा सोपी व चित्ताकर्षक आहे, व एकंदर कथानक बोधपर आहे. ह्या कादंबरींतील दोषावर इतरत्र बरीच टीका आल्यामुळें, त्यांचा पुनरुल्लेख येथें केला नाहीं.

गो. वि. रा.

## +स्वर्गसाम्राज्य ( नाटक )

श्री. फाटकशास्त्री यांचीं आतांपर्यंत ८।१० नाटकें रंगभूमीवर आलीं असल्यामुळें, ते नाट्यरसिकांच्या पूर्ण परिचयाचे नाटककार आहेत. प्रस्तुत ' स्वर्गसाम्राज्य ' हें संगीत तीन अंकीं नाटक, इंद्रपदाची हाव धरणाऱ्या नहुषाच्या पौराणिक कथेवर रचिलेलें आहे. मूळ कथानकांत थोडा बदल करून नाटकाची सजावट चांगली करण्याचा प्रयत्न यशस्वी झाला आहे. विशेषतः नाटक हें दृश्य काव्य आहे, या दृष्टीनें त्याचा रंगभूमीवरील प्रयोगही सुंदर वठला कीं तें यशस्वी झालेंच. ' स्वर्गसाम्राज्य ' या कसोटीस पूर्णपणें उतरेल. नाटकांतील विनोदाची उभारणी मात्र, निव्वळ शाब्दिक प्रास जुळवून करण्यांत आलेली आहे. श्री. फाटकशास्त्री उत्तरोत्तर आपली कला अधिकाधिक उज्वलतेस आणतील असा भरवसा वाटतो.

**दि. मो. हा.**

---

## × मेजवानी ( राष्ट्रीय गीतसंग्रह )

' मेजवानी ' हा सुमारे ३३ कवितांचा एक संग्रह आहे. यांतील राजकीय कविता, महात्मा गांधींच्या अनत्याचारी चळवळीचें यथायोग्य चित्र वाचकांपुढें उभें करितात. कवि अभंग यांच्या काव्यांत त्यांनीं भावनेस प्राधान्य दिलेलें आहे.

" काव्याच्या मीमांसेंत ही गोष्ट नेहमी लक्ष्यांत ठेविली पाहिजे. कीं, कवीला एकाद्या विषयाबद्दल होणारी संवेदना, ही त्या विषयाच्या साक्षात् अनुभवानें उत्पन्न झालेला हर्षशोकादि मनोविकारांचा दूषित उमाळा नसून, त्या विषयांशीं सहानुभूतिच्या योगानें उत्पन्न झालेली उदात्त,

---

\+ लेखकः— **ग. कृ. फाटक** ( किं. १२ आणे )

× [ कविः– **त्र्यं. रा. अभंग** (सातारा) प्रस्तावनालेखक **श्री. गो. वि. राजगुरु** पुणें. किं. १० आणे ट. ह. नि. मिळण्याचें ठिकाण **ऐक्य ऑफिस** सातारा. ]

सूक्ष्म, शुद्ध, व निर्मल अशी एक वृत्ति आहे " ( मराठीची सजावट ) हीच गोष्ट आपणांस श्री. अभंगांच्या काव्यांत आढळते. त्यांच्या हृदयावर चालू परिस्थितीचा आघात बराच झालेला दिसतो. महात्मा गांधींच्या चळवळीविषयीं विचार अत्यंत उदात्त व निर्मळ भावनेनें श्री. अभंगांनीं जनतेपुढें मांडलेले दिसतात. सत्यसृष्टीस काव्याचें आभरण घालून व त्यांवर आपल्या भावनांचा मुलामा चढवून श्री. अभंगांनीं हें शब्दचित्र काढिलें आहे. सद्यःस्थिति जास्त हृदयस्पर्शी करण्याचा त्यांनीं उत्तम प्रयत्न केला आहे. हृदयापासून निघालेले उद्गार अर्थातच रम्य व जास्त परिणामकारक असणार. अभंगांची भाषा अत्यंत साधी व सोपी आहे. साध्या शब्दांत वीररसोत्पादक चित्र रंगविण्याचा त्यांनीं जो प्रयत्न केला आहे तो अभिनंदनीय आहे.

श्री. अभंगांच्या प्रथम " मेजवानी " कवितेंत यशवंताच्या पाण-पोईची छटा दिसते. या कवितेतलि शेवटच्या ओळी या अंतःस्फूर्तीनें जोर-दार तऱ्हेनें बाहेर आलेल्या दिसतात; अभंगाच्या काव्यांतील वैशिष्ट्य हेंच आहे. भावनेचा जोरदार उमाळा त्यांच्या काव्यांत दृगोचर होतो. "पूतना-मावशी " या कवितेंतील रुपक जरी बरें असलें तरी तें ओढून ताणून आणल्यासारखें वाटतें. ' स्वातंत्र्यसमर ' या कवितेंत आपणांस वीररसाचें प्रभुत्व तर दिसतेंच, पण त्यांत कांहीं ठिकाणीं करूण रसाची छटाही उमट-लेली दिसतें. " माशानें माणिक गिळलें " ही ओळ हृदयाला दुःख झाल्या कारणानें बाहेर पडली आहे, हें स्पष्ट दिसतें. तद्वतच " उंदरामांजरांचा खेळ " या कवितेंतील शेवटच्या ओळी आहेत. हल्लीं यशवंत-गिरीश यांनीं जी कुणबाऊ भाषेंत कविता करण्याची पद्धत पाडली आहे, ती बहुतेक कवी उचलूं लागले आहेत व श्री. अभंगही त्याला अपवाद नाहींत; परंतु या भाषेंत कविता करितांना मात्राकडे विशेष लक्ष्य अभंगांनीं पुरवि-लेलें दिसत नाहीं. चाल कोणतीही असली तरी यति-भंगाचा दोष होतां कामा नये. त्यांची " पस्तावा " ही कविता उत्तम आहे. दारूच्या धुंदींतून शुद्धीवर आल्यानंतर स्वतः केलेल्या अत्याचाराबद्दलचे तें एका शेतकऱ्याचे उद्गार आहेत. यांत कवि मायदेवांच्या ' पश्चात्ताप ' या: कवितेची छटा

दिसते. दारुवर कवि गिरीशांची कविता " आंबराई " नांवाच्या खंड काव्यांत आहे; व त्यांतील कांहीं विचार " खेडेगांवचें पिंकेटिंग " या कवितेतेंत दिसतात. " मृत्युशय्येवर " ही कविता हृदयस्पर्शी आहे. अन्तःकरण पिळवटून निघालेले उद्गार तेथें दृष्टीस पडतात. मातृप्रेमाचें यथार्थ चित्र ' निरोप ' या कवितेंत त्यांनीं काढिलें आहे. त्यांत करुण-रसाचा परिपोष उत्तम तऱ्हेनें झाला आहे. कवि गिरीशांनीं आंबराई खंड काव्यांत प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी कमंडलू ओव्यासंबंधीं दोन ओळीं दिल्या आहेत. ही एक निराळीच तऱ्हा आहे. तद्वत् श्री. अभंग हे कवितेच्या शेवटीं एक दोन ओळींत काव्याचा खरा भाव प्रकट करितात. "तुरुंगाच्या कोठडींत" या कवितेंत श्री. अभंगांचे तेजस्वी विचार उत्तम तऱ्हेनें उतरले आहेत. ती वाचत असतांना यशवंतांच्या " तुरुं-गाच्या दारांत " या कवितेची आठवण होतें. " तुरुंगाच्या कोठडींत " या कवितेंतील विचारांची उज्वलता वाढविण्यास सुमंदारमाला या वृत्ताची योग्य मदत झाली आहे. " निकाल " या कवितेंतील विचार कित्येक ठिकाणीं लघुकथेंत आले आहेत व काव्यबद्धही झाले आहेत. ' मच्छीमारी ' ही कविता रूपकाच्या दृष्टीनें व भाषेच्या दृष्टीनेंही सरस आहे; व वृत्तही " मुद्रिका " योग्य निवडिलें आहे. यामध्यें एक प्रकारचा धबधब्याचा जोरदार ओघ दिसून येतो. कवितेमध्यें इंग्रजी शब्द आणावयाचे ही पद्धत कवि मायदेव यांनीं पाडली. तिचा श्री. अभंग यांच्यावर परिणाम झाला आहे. वीररसामध्यें करुणरस आणणें हें वीररसाला परिपोषक नाहीं. " लालाजी " या कवितेचा जोर त्यामुळें कमी झाला आहे.

एकंदरींत आपणांस असें दिसून येतें कीं श्री. अभंगांच्या कविता, कांहीं दोष सोडून, उत्तम आहेत. त्यांच्या काव्य-संग्रहाला श्री. गो. वि. राजगुरू यांच्या विचारपरिप्लुत प्रस्तावनेची जोड मिळाल्याकारणानें तो जास्त उठावदार झाला आहे. अभंगांच्या काव्यसंग्रहाला इंदूरच्या ग्रंथोत्ते-जक मंडळाकडून जें बक्षीस मिळालें तें त्यांच्या काव्यगुणाचें द्योतकच आहे.

**व. ना. जोशी.**

चिटणीस, " साहित्य सेवा समिती " पुणें.

# वार्ताविहार ( नाटक )

(लेखकः—**प्रो. के. गो. पंडित**, पुणें) प्रख्यात आंग्ल नाटककार शेरिडन याची उत्कृष्ट नाट्यकृती "School for Scandal" याचें हें रूपांतर आहे. समाजास निंदा, व कुटाळक्या करण्याची जी एक प्रकारची कीड लागलेली आहे, तिची मीमांसा या नाटकांत केलेली आहे. मूळ नाटकांतील बरेंच अनवश्यक प्रसंग गाळून व नाटकांतील भूमिकांना महाराष्ट्रीय पेहेराव चढवून हें नाटक समाजापुढें आणिलें आहे. समाजाची सद्यःस्थिति ह्या नाटकांत उत्तम तऱ्हेनें रंगविली आहे. नाटकाची भाषाशैली कांहीं कांहीं ठिकाणीं खरखरीत वाटते. जागोजागी शद्बांवर कोट्या केलेल्या आहेत, त्यांत फारसा गूढार्थ नसून, त्या सहज समजण्याजोग्या आहेत. आहेत. कित्येक वाक्यांत कोटी साधल्यामुळें विनोद निर्माण झाला आहे. हें नाटक विशेषतः कॉलेजच्या विद्यार्थ्यांना किंबहुना सुशिक्षित प्रेक्षकवर्गासच आवडण्या सारखें आहे.

ह्या नाटकांतील पहिले दोनतीन प्रवेश निव्वळ संभाषणाचें असल्यामुळें तें अगदीं कंटाळवाणें वाटतात. गौणकथानकाला सुसंगतता बेताचीच आहे. नीलकंठ हें पात्र नाटकांत उगीचच जागा आडवितें. तरी पण पहिली कृती इतकी सरस वठणें, हें कांहीं थोडे नव्हे. नाटकांतील विनोद एका प्रेमकविच्या वर्तनावर उभारलेला असून, त्यांत अतिशयोक्ति व इतर कवींची हेटाळणी केलेली आहे एकंदरीत विनोद परिणामकारीच आहे. प्रो. पंडित यांनीं ही अभिनव व मनोहर कृति रंगभूमीवर आणून प्रेक्षकवाचकांस उपकृत केलें आहे.

**दि. मो. हातवळणे** बी. ए. ऑनर्स

# × सरोज ( कवितासंग्रह )

औंधच्या 'साहित्य-सरोज-मंडळा तील सदस्यांच्या स्फुट कवितांचा हा एक छोटासा संग्रह आहे. या नवविकसित '**सरोजा**' च्या "**दोन दिवसाचें जीवन**," "**मुरलीवाला**" "**गुलाबाचे बोल**" "**सुमबाला**" "**दर्शन**"

× प्रकाशकः— **श्री. प. वाय. देशपांडे**, बी. ए. (टी. म. वि.) व्यवस्थापक, सा. स. मं. औन्ध.

वगैरे पाकळ्या मनोहर आहेत. प्रस्तुत काव्यमालिकेंत शब्दसौष्ठव, तत्व-प्रधानता, व कल्पनासौंदर्य वगैरे काव्यास अत्यावशक असे गुण प्रामुख्यानें दृष्टोत्पत्तीस येतात. प्रो. श्री. नि. चाफेकर यांनीं आपल्या **आशिर्वादांत** ह्मटल्याप्रमाणें सहृदय व रसिक वाचकवर्गानें मंडळास योग्य तें प्रोत्साहन दिल्यास ' साहित्य-सरोज-मंडळा' चीं ' सरोजें ' अधिकाधिक विकसित व सौरभयुक्त अशीं होत जातील यांत शंका नाहीं. साहित्याच्या सरोवरांतील या + मंडळाची विकसित होणारी भावी **'सरोजें'** अधिक मोहक, सुवासिक व चित्ताकर्षक होवोंत असें आह्मी इच्छितों.

**पां. अ. देशचौगुले**

---

# + साहित्य सरोज मंडळ ( औंध )

**' साहित्य सरोज मंडळ '** औंध, ही संस्था औंध येथें श्री. देशपांडे यांच्या प्रेरणेनें १ जानेवारी १९२९ ला स्थापन झाली. सदर संस्थेत श्री. अ. य. देशपांडे, रायगांवकर ( शेषशायी ), बा. मा. दाभाडे ( शशाङ्क ) दत्त गोविंद बोपर्डीकर, श्री. ग. दाढे ( मधुसूदन ) असे चार सदस्य आरंभापासून असून पुढें लौकरच रा. मा. कृ. दाभाडे हेहि या मंडळाचे सभासद झाले आहेत. मंडळाचें पहिलें पुष्प ' सरोज ' व दुसरें पुष्प ' शेती-शेतकरी ' पोवाडा अशीं दोन काव्याचीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं असून दोन्ही पुस्तकें लोकादरास पात्र झालीं आहेत. मंडळाचें ध्येय यथाशक्ति वाङ्मय सेवा व ज्ञानप्रसार करून वाङ्मयद्वारें राष्ट्रोन्नतीला हातभार लावणें हें आहे. ' निर्वाहः प्रतिपन्नवस्तुषु सतां एताद्धि गोत्रव्रतम् ' हें मंडळाचें ब्रीदवाक्य आहे.

# कर्मयोग मुरली

कृष्णानें राधारमणानें त्या मुरली वाजविली;
मुरली-ध्वनिनें त्या सकलहि विश्वाला,
कर्मचि सांगायाला, गीता सांगितली ॥ १ ॥

गीतेमध्यें त्या अर्जुन योध्याला,
सोडुनि संन्यासा, तैसे योगाभ्यासा,
कर्मचि करण्याला कृष्णें सांगितलें ॥ २ ॥

मुरली-ध्वनि मग तो, मावळला, लुप्तचि जगिं या जाहला
वर्षे बहु गेलीं
म्लेंछांनीं भारत-भूमाता ही अतिशय गांजियली ॥ ३ ॥
सज्जनगडिं मग त्या कृष्णाचा अवतारचि जणुं साचा
अवचित अवतरला, मग त्या दासानें
रामाच्या, पार्थासम शिवबाला, कर्मचि सांगितलें ॥ ४ ॥
रामदासाच्या, मुरली-ध्वनिनें त्या
जागृत जन केला महाराष्ट्रीं
शिवबा उदया आला, राज्या स्थापियलें ॥ ५ ॥
वैभव राज्याचें वरुषें शत टिकलें
मुरली-ध्वनि मग तो मावळला; पुनरपि
लुप्तचि झाला गेलें स्वातंत्र्य ॥ ६ ॥
बाळानें गंगाधर-तनयानें पुनरपि वाजविली,
मुरली कृष्णाची-गीतेची पुनरावृत्ती केली,
जागृत जन केला, रहस्या सांगितलें ॥ ७ ॥

महात्मा गांधिजी अवतरलें-लोकमान्याचि गेले,
मुरली वाजविली मुरली गांधिची
विश्वाला मोहुनी भारतपुत्रां स्वराज्य ती देणार ॥ ८ ॥

अ. य. देशपांडे बी. ए. ( टी. म. वि. ) माजी न्यू पूनाइट.

---


‘ छेः पुण्यासारखे कपडे इथं कसचे शिवून मिळणार ?



आह्मी आपलें कपडे पुण्यासच शिवून घेणार ! तुझ्याच्च कोटाचं घेइनास कां ? पुण्याची शिवण आहे ह्मणून इतका नीट नेटका बसतोय ? ’

‘ नाहीं महाराज, हा कोट व ही पँट

सातारलाच

# डेक्कन टेलरिंग फर्म मध्यें

मी शिवून घेतली आहे आपणही एकवार शिवून घ्याच त्या फर्म मधून एक कोट पहा व्यवस्थित, नीटनेटका होतो कीं नाहीं तो मी अगदीं पैजेवर सांगतों कीं,



डेक्कन टेलरिंग फर्म मध्यें

अगदीं पूना-मेड कपडे तयार होतात. ’

प्रोप्रायटरः—एस्. बी. कारंजकर,
डेक्कन टेलरिंग फर्म, मोतीचौक सातारा

नगर वाचनालय, सातारा.

# चरित्रलेखनकला.

( लेखकः— श्री. द. बा. रानडे एम्. ए. )

"Paint me as I am." said Oliver Cromwell while sitting to young Lely 'If you leave out the scars and wrinkles, I will not pay you a shilling'

Macaulay's Essay on Warren Hastings.

"माझें हुबेहुब चित्र काढ नाहींतर छदाम देखील मिळणार नाहीं" अशी आपल्या चितान्यास आज्ञा करून ऑलिव्हर क्रॉमवेलनें जणूं काय आपल्या भावी चरित्रकारांना धोक्याची सूचनाच करून ठेवली. चरित्रलेखन ही एक कला आहे व चित्रकलेशीं तिचें बरेंच साहश्य आहे. पण सर्व कलांत ती जास्त अवघड व नाजूक आहे. चरित्रलेखनकलेंत काय गुण लागत नाहींत ? "शास्त्रांतील कठोर सत्य, ललितकलांमधील हृदयाला मोहून टाकणारी जादू, कादंबरींतील सत्याभास, इतिहासांतील बुद्धिगामी असत्यें, या परस्पर विरोधि गुणांचें मिश्रण तयार करावयास चरित्रलेखकांत तशीच असामान्य कुशलता असावी लागतें."

चरित्र लेखन ही कला असली तरी चरित्रलेखनाच्या साधन-सामुग्रीची चिकित्सा तितकीच महत्वाची आहे. चरित्रविषयक व्यक्तींचें आत्मचरित्र, रोजनिशा, टिपणें, पत्रव्यवहार, वृत्तपत्रांतील माहिती, इतर लोकांचा पत्रव्यवहार, आठवणी, आख्यायिका, अशी अनेक तऱ्हेची माहिती देणारीं साधनें चरित्रकारापुढें असतात. पण शब्दांचें सामर्थ्य फारच कोतें आहे, मनुष्याची स्मृति व निरीक्षणशक्ति निर्बल आहे. शिवाय रोजनिशा सुसंगतवार लिहिलेल्या आढळत नाहींत, पत्रव्यवहरांत लेखकाची समदृष्टी रहात नाहीं व सर्वांच्यापुढें तो सारखेंच मनोगत व्यक्त करीत नाहीं. साधनीभूत सर्व लेख, ग्रंथ चाळले तरी, निर्वेधपणें साच्यांतून मूर्ति छापून काढावी त्याप्रमाणें त्या लेखांतून एकदम चरित्र-विषयक व्यक्ति बाहेर येत नाहीं. चरित्रांतील सत्यप्रसंग सुसंगतपणें अनुक्रमानें सांगितले तरी आपणास व्यक्तीच्या व्यक्तित्वाची कल्पना येणार नाहीं. मनुष्य स्वभावाचें कोडें उलगडण्याकरतां केवळ बाह्यांगावर दृष्टी न ठेवतां अंतरंगांत शिरून स्वभाव वैशिष्ट्याचे गूढ दुवे उकलण्याचा प्रयत्न चरित्रकारानें केला पाहिजे, व ह्याकरतां सूक्ष्म अंतर्भेदी दृष्टीची अत्यंत आवश्यकता आहे.

भवानी पेठ

तसेंच चरित्रविषयक व्यक्तीच्या केवळ महनीय गोष्टींवरच अवलंबून राहतां कामा नये. एकादे साधेंच कृत्य प्रसंगोपात्त लीलेनें उच्चारलेली फटके वजा ह्मण, विनोदात्मक वाक्य, ह्यांत मनुष्यस्वभावाची जशी चुणूक दिसेल तशी ढोबळ प्रसंगांत दिसणार नाहीं. ह्याची प्रचीति बॉस्वेलनें लिहिलेल्या जॉन्सनचे चरित्रांत पहावयास मिळते.

चरित्रविषयक व्यक्ति सर्वसामान्य व्यक्तीहून निराळी भासविण्याचा मोह अनावर होतो व विशेष महत्वाच्या गोष्टींवर, चळवळींवर, कृत्यांवर भर देऊन लेखक वरवर क्षुल्लक दिसणारे प्रसंग टाळतो. पण सर्व काळीं सर्व स्थळीं त्याच व्यक्तीचें महत्व सारखेंच टिकूं शकत नाहीं हें एक व कोणचीहि व्यक्ती झाली तरी ती कांहीं केवळ दैवी अवतार असत नाहीं. मनुष्य स्खलनशील आहे हे नेहमी ध्यानांत ठेवलें पाहिजे जो आपल्या चरित्रनायकाविषयीं बारिक सारिक गोष्टी न विसरतां, तो केवळ गुणांचा पुतळा नसून इतर लोकांपैकींच एक गुणावगुणानीं युक्त अशी सामान्य व्यक्ती आहे, असें दाखवील, तोच खरा कलावन्त चरित्रकार.

ह्यावरून चरित्र हें आदर्शभूत व्यक्तीचेंच लिहिलें पाहिजे असा निर्बंध घालणें योग्य होणार नाहीं, हें उघड आहे. समाजाला नीतिशिक्षणाचे धडे देण्याकरितां, एकाद्या व्यक्तीला केवळ सद्‍गुणाच्या पुतळ्याचें स्वरूप देऊन त्या व्यक्तीचें चरित्र रेखाटणें, व त्या व्यक्तीच्या चरित्रांत नीतितत्वें हुडकीत बसणें हें कलेच्या दृष्टीनें बरोबर नाहीं. आधुनिक युगांतील मानवशास्त्रांतील प्रगती लक्षांत घेतां चरित्रकारानें चरित्रविषयक व्यक्तीला पदार्थसंग्रहालयांतील नमुनेदार, कौतुकास्पद वस्तु ह्मणून न समजतां मानवी मनांतील निरानराळे विकार, प्रवृत्ति, यांची भेसळ लक्षांत घेऊन, मानसिक धाग्यादोऱ्यांच्या गुंतागुंतीवर दृष्टी ठेवून व मानवाची प्रसरणशीलता लक्षांत घेऊन, मानवी व्यक्तीचें चित्र रेखाटलें पाहिजे. तात्पर्य कादंबरीप्रमाणें, दिवसादिवसागणिक व्यक्तीच्या मनांतील, प्रवृत्तींतील, विचारांतील, फेरबदल व ह्या अंतरंगाचे बाह्यांगावर, आचारावर होणारे परिणाम दाखवून, त्या व्यक्तिला सजीवत्व प्राप्त करून देणें हें लेखकाचें काम आहे. कोणी ह्मणतील चरित्र ह्मणजे कादंबरी नव्हे. पण जर ऐतिहासिक कादंबरी हा वदतो व्याघात होत नाहीं, व वाङ्मयांत तिला श्रेष्ठ स्थान द्यावयाचें तर चरित्रात्मक कादंबरीला, किंवा चरित्रोचलपटाला कां नको?

चरित्रविषयक व्यक्ती ही कांहीं आकाशांतून एकदम खालीं पडलेली नसते. बाल्यावस्था, तारुण्य, प्रौढावस्था, म्हातारपण, या मानवी आयुष्यांतील सर्व संक्रमणावस्थांतून ती गेलेली असते. स्वभाव अनपेक्षित रीतीनें बदलत गेलेला. तेव्हां कालानुक्रमानेंच मनुष्यस्वभावपरिवर्तन दिग्दर्शित करणें योग्य. मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात हें जरी खरें आहे तरी चरित्रकारानें प्रथमच भावी गोष्टींची अपेक्षा करू नये, व पुढे मनुष्य उच्चत्व पावला म्हणून त्याच्या बाल्यावस्थेंतील चाळयांना नसतें महत्व देऊ नये. चरित्रलेखकानें तरी मुलाचे पाय पाळण्यांत पाहूं नये. पहिल्याच प्रकरणांत गौप्याचा उलगडा करून वाचकांची आकांक्षा, उत्कंठा, यांना धक्का देऊं नये. तसेंच शेवटच्या प्रकरणांत शवाला अग्नि देण्यापूर्वी केलेल्या गुणगौरवपर भाषणाचें त्याला स्वरूप असूं नये. मनुष्याचे जीवित ठरीव साच्याचें नसतें. तें प्रवाही असतें. म्हणून जीविताचा प्रवाह जसा वहात गेला असेल तसाच दाखवावा. लेखक वाचकांवर स्वतःची मतें, जितकी कमी लादील तितकी त्याची कला उठावदार होईल. व्यक्तीच्या आचारविचाराविषयीं इष्टानिष्टत्वाचा वाद करण्याचें, किंवा स्तुति निंदेच्या वर्षावाचें हें स्थळ नव्हे.

केवळ अंधभक्तीनें लिहिलेल्या चरित्राची किंमत कमी समजली पाहिजे. चरित्र लिहिण्याचे बाबतींत विभूतिपूजेला थारा नाहीं. पण चरित्रनायकाविषयीं पूर्ण सहानुभूतीची मात्र तितकीच आवश्यकता आहे. व ही सहानुभूति चरित्रनायकाला विरोधी असें पात्र आणून तुलनात्मक रीतीनें दाखवितां येतें. कादंबरींत किंवा नाटकांत ज्याप्रमाणें खलपुरुष नायकाविषयीं आपली सहानुभूति वाढवितो त्याचप्रमाणें विशेषतः राजकीय किंवा सामाजिक उलाढालींत ज्यांचें आयुष्य गेलें अशा व्यक्तींच्या चरित्रांत विरोधी पात्रें फार उपयोगी पडतात.

राजकीय चळवळींत ज्यांचें आयुष्य गेलें. अशा व्यक्तिचें चारित्र लिहिणें कठीण आहे. तत्कालीन इतिहास लिहिण्याकडे चरित्रकाराचें मन धांव घेतें. व चरित्रविषयक व्यक्ति बाजूस राहतें. राजकारणाच्या आरशांत मनुष्याचें योग्य प्रतिबिंब दिसत नाहीं, विकृत दिसतें. एकच नट विविध

वेषानें आपल्यापुढें रंगभूमीवर येतो, त्याचप्रमाणें एकच व्यक्ति बाल्यावस्थेपासून मरणकाळपर्यंतच्या खाजगी व सार्वजनिक जीवनक्रमांत होणाऱ्या मानसिक, बौद्धिक व शारीरिक अशा विविध फेरबदलामुळें विविध प्रकारची दिसते. तशीच ती चरित्रांतहि दिसली पाहिजे. चरित्राविषयक व्यक्तींच्या आयुष्यांत केवळ एकाच बाबीस महत्व देऊन, त्याचें स्वभाववैशिष्टय दाखविणाऱ्या इतर क्षुल्लक दिसणाऱ्या बाबी टाळणें ही चूक होय.

चरित्रांत सर्वच गोष्टी देता येणें शक्य नाहीं. व चरित्रलेखन कला असल्यामुळें, ग्राह्याग्राह्य विचार येथें विशेष केला पाहिजे. चरित्रनायकाचे आचारविचार उच्चारांत वैशिष्ट्य दाखविणाऱ्या, स्वभावाचें यथार्थ दिग्दर्शन करणाऱ्या वेंचक गोष्टींची निवड करणें अत्यावश्यक आहे. चरित्रनायकाला मध्यबिंदू कल्पून त्याला अनुलक्षून ज्या प्रस्तुत गोष्टी घेतां येण्यासारख्या आहेत त्या घेऊन, इतर अवांतर गोष्टी टाळणें चरित्रकाराचें कर्तव्य आहे.

वर विशद केलेलीं तत्त्वें बहुतांशीं आधुनिक पाश्चिमात्य चरित्रग्रंथांत आढळून येणारीं आहेत. विशेषतः लिटन् स्ट्रॅचीच्या व्हिक्टोरिया, इलिझाबेथ, या राण्यांच्या चरित्रांत, तसेंच एमिल् लुड्‌विग (Emil Ludwig) या जर्मन ग्रंथकाराच्या नेपोलियन, गटे, व क्राइस्ट या चरित्रांत व (Andre Maurois) या फ्रेंच ग्रंथकर्त्याच्या शेले व बायरन कवींच्या चरित्रांत, दिसून येणाऱ्या तत्त्वांपैकीं कांहींचें स्पष्टीकरण केलें आहे. पाश्चात्य वाङ्मयांत चरित्रलेखनाला एक नवीनच दिशा लागलेली आहे. तिचे स्वरूप काय आहे याचें विवेचन केलें आहे. सजीव व्यक्ती वाचकांपुढें उभी करणें, हेंच स्ट्रॅचीचें ध्येय, मानवी आयुष्याचा चलच्चित्रपट वाचकांच्या डोळ्यांपुढें उलगडून दाखविणें हें लुड्‌विगचें ध्येय; व चरित्रविषयक साधनसामुग्रीला कादंबरीच्या साच्यांत ओतून चरित्रात्मक कादंबरी लिहिणें हें मोरॉयचें ध्येय. अंतिम हेतु मात्र सर्वांचा एकच तो हा कीं चरित्रनायकाला थडग्यांतून उठवून पुन्हां पाहिल्यापासून आपला सर्व चारित्र्यमार्ग चालावयास लावणें. मराठी भाषेंत लिहिल्या जाणाऱ्या चरित्रांना अजून हें नवे वळण लागलें नाहीं.

# विरहानल

( कवि— विठ्ठल महादेव कोल्हटकर, लायब्रेरीयन. )

[ चाल— चंद्रकान्त राजाची कन्या— ]

चंद्रप्रभेस उज्वल मानस भासे तव कमले,
शिरीष कुसुमासम नाजुक तूं गाल तुझे विमले ॥१॥
चंद्रबिम्बवत् तेजस्वी ते लाल लाल मधुनि ।
कां रुसलीसी मजवरि आजी येई परतोनी ॥२॥
तव विरहे गे निशिंदिनिं माझे होइ चित्त दग्ध ।
मोही मजसि तव गालींचा तीळ जरी मुग्ध ॥३॥
कुरळ केश तव वातें उडती परि मज भासविती ।
मोहजालिं ते बद्ध करोनी मम मन गुंतविती ॥४॥
अशक्य वाटे तव प्राप्ती मज ह्मणुनि काळ कंठी ।
तव विरहानें तरी हो माझी आस पूर्ण जगतीं ॥५॥
कितिक अब्द ते लोटुनि गेले विरहानलिं तुझिया ।
मम मानस तें करपुनी जाई नादामधिं तुझिया ॥६॥
विवंचना मम रात्रंदिन गे काय होई पुढती ।
घालवितो मी काळ कसा तरि करुनी हृद्‌गोष्टी ॥७॥
वदशिल मानासिं उद्देशुनि मज तव भालीं विरह ।
केवळ दैवें लेखियलासे मी हो जरि सदय ॥८॥
मजसि न वाटे सौख्यसुधा ती संपत्तिच अथवा ।
अमृतपान तें तद्वत् दैवांगना भोग मज वा ॥९॥

देखुनी मजशी चोरिशीं चित्ता दृष्टि आड होशीं ।
नवपल्लव ते आशातरुशीं आले भासविशी ॥१०॥
मृत्यु मज येईल तरी गे आत्मा मम, धवले ।
विरह करित राहील सदा गे, सत्य वदे, सरले ॥११॥
चंद्रकोरिसम रेखिव भृकुटी भासति फिरतांना ।
मदनबाण ते हृदय विदारण करिती व्रण नाना ॥ १२॥
भासतसे मज आजि नव्यानें तव मानस मजला ।
अजमायातें अजुनि न आलें सत्य सांग मजला ॥१३॥
प्रीतीविरहें वृद्धचि बनलों आजि दिसे लोकीं ।
वृद्ध खरोखरि दिसतों मी गे, तूंहि अवलोकी ॥१४॥
वृद्ध जरी मी प्रेमपाठ गे नूतन मज दिसती ।
जोंवरि मजसी यशःप्राप्ति ना नवीन ते असती ॥१५॥
जरि होई शारदा लेखिका विरहकथेलागीं ।
लेख तिचा लेखनी तिची गे वर्णन करण्या जी ॥१६॥
न पुरी पडते सत्य सांगतों, ऐके मम वचना ।
येइ झडकरी जाउं नको तूं जवळी अन्य जना! ॥१७॥
आस मनाची तव प्राप्तीची सोडुन देई न मी ।
कधीं तरी मज तव भेटीचा योग येइ अजुनी ॥१८॥

भावी कमलाकान्त.

" दिवाण – इ – हाफीज " वरून

# दंव–बिंदु

लेखकः– श्री. य. द. भावे, ( ज्यु. बी. ए. )

गुलाबाची फुलं फुलतात ती कोमेजून नष्ट व्हावीत असं कुणाला कधींतरी वाटलयं कां ?

आकाशांत प्रकाशणाऱ्या ताऱ्यांचें सौंदर्य मेघांनीं नष्ट करावें हा विचार तरी तुमच्या मनांत आला आहे कां ?

हंसणारे बालक, या जगांतून क्रूर कालानें ओढून न्यावें असें मानवी मनाला स्वप्नांत सुद्धां वाटत नाहीं.

'ताजमहाल' सारखी, प्रेमाची स्मारकं नष्ट व्हावीत असं मनाला चुकून सुद्धां वाटत नाहीं.

पण......गुलाबाची फुलं सुकतात; ताऱ्यांना मेघ झांकतात; सुंदर सुंदर बालकांना क्रूर काळ ओढून नेतो; ताजमहालसारख्या, असंख्य प्रेमाची स्मारकं असलेल्या इमारती, कालाच्या विवरांत गडप होऊन जातात. या सर्व वस्तूं सुंदर आहेत पण क्षणभंगुर आहेत हे सर्वांना कळतें. तरिपण आपण सर्व सुंदर वस्तूवर प्रेम करतोंच करतों.

खरंच, सुंदर वस्तु चिरकाल टिकणाऱ्या नाहींत, म्हणूनच आपलं मन भुलतं, व त्यांच्यावर प्रेम करतं ...... होय...... ..कां ?

२

सूर्य उगवला कीं कमलपुष्पं फुलायचीच. चंद्रिका चमकली कीं, उदधीला भरती यायचीच. निशा आली कीं, 'रात्रीची राणी' खुलायचीच. चांदण्या आल्या कीं आकाशाला आनंद व्हावयाचाच. कां.........?

...... आपल्या हृदयाला विचारा.

३

या जगांत निरनिराळ्या रंगाची कितीतरी फुलं पसरलीं आहेत. पण त्यापैकीं एकाद्याला एका विवक्षित रंगाचेंच फूल कां आवडावें ?

आकाशांत, असंख्य चांदण्या विखुरलेल्या असतात, पण त्यांतली एकादीच चांदणी तुमचें मन मोहून टाकते...कां बरें?

संगीत शास्त्रांत कितीतरी तऱ्हेचें राग असतात पण, त्यांतला एकादाच राग तुमच्या मनाला वेड लावतो. असं कां व्हावं बरं ?

गुलाबाचा सुवास मनोहारी असतो, कमलांचा सुंदर असतो, आणि-शिरीषकुसुमांचाही मधुर· असतो. तरीसुद्धां एकाद्याला गुलाबच कां आवडतो ? खरंच कां बरं ?

४

वसंत ऋतु येतो. फुलें फुलतात. कोकिळ गातो, आणि सर्व सृष्टी आनंदाचें निधान बनते.

पण, वसंतऋतु कशाला येतो हो ? नव्या सृष्टीला आनंद द्यायला ?

नाहीं हो नाहीं; तो वाळलेल्या पानांचें समाधान करण्याकरितांच येतो.

हो पण वाळलेल्या पानांना त्याचा काय उपयोग? ती कधींच वाळून गेलेली असतात !

५

एका मनुष्याच्या हातांत, दंवबिंदुनीं थबथबलेले, नुकतेंच, खुडलेलें एक, गुलाबाचें फूल होतें, व त्याकडे तो पाहात होता. पाहतां पाहतां, तो विचार करूं लागला — अहाहा ! किती सुंदर आहे हा गुलाब ! आणि याचा वास तरी किती आल्हाददायक आहे, पण ..त्या फुलाचं सौंदर्य कुठें बरं सांठविलेलं असेल ! ही नेमकी जागा कुठें असेल? या पाकळीच्या तर आड नसेल? ... हो: असेल कदाचित् आपण ही पाकळी तोडून पाहूं — ”

त्यानें ती पाकळी तोडली.

" नाहींतर ह्या पाकळींच्या खाली असेल ! "

त्यानें दुसरी पाकली तोडळी; त्यानें तिसरी तोडली; त्यानें चौथी तोडली. त्यानें सर्व पाकळ्या तोडल्या. पण, त्याला ' ती जागा ' सापडली नाहीं.

वारा आला न् पाकळ्या इकडे तिकडे उडून गेल्या.

६

" मला आडविणारे तुह्मी कोण ? मीं मोठ मोठीं शहर वसवली आहेत, मोठमोठे मिनार उभारलें आहेत, मी हजारो जयस्तंभ बांधले आहेत.

द्वारपालांनो, बाजूला व्हा मला आंत जाऊं द्या ! "

" राजा ! रक्तलांछित यशाला इथें वाव नाहीं. द्वारपाल ह्मणाले.

त्यांनीं राजाला आंत जाऊं दिलें नाहीं.

" मीं लाखो रुपयांचा व्यापार करतों, माझ्याजवळ रत्नांचे व माणकांचे ढीग आहेत, संपत्ति माझ्या घरीं पाणी भरीत आहे—मला आंत जाऊं द्या. "

" पैसा मिळाविण्यावांचून तूं दुसरा कुठलाहि उद्योग केला नाहींस, आणि तो पैसा तूं वाटेल त्या मार्गानें मिळविला आहेस तुला इथें थारा मिळणार नाहीं.

व्यापारी परत गेला.

" मी विद्वान आहे. मी असंख्य ग्रंथ वाचले आहेत ईश्वरविषयक सर्व ज्ञान मला प्राप्त झालेले आहे—मला आंत जाऊं द्या ! "

" ईश्वराच्या अस्तित्वाविषयीं वादविवाद करण्यावांचून तूं दुसरें कांहीं हीं केलं नाहींस; नुसतें भाराभर ग्रंथ वांचून काय उपयोग ? तुला आह्मी आंत जाऊं देणार नाहीं.

विद्वान मनुष्य परत गेला.

" मी आंत येऊं कां ! माझ्याजवळ कांहीं नाहीं. मी अगदीं दरिद्री आहे ! "

" जरूर या! आपल्याजवळ सर्व कांहीं आहे परोपकाराकरितां शरीर व मन झिजविलेल्या माणसाला इथें येण्याला कधींच प्रतिबंध नसतो. "

तो मनुष्य आंत गेला.

७

ज्या दिवशीं, चंद्र अगदीं पहिल्या प्रथम आकाशाचें राज्य करूं लागला त्या दिवशीं त्याला ढगांची कल्पनासुद्धां नव्हती. त्याच्या शेजारीं रोहिणी होती, व आजूबाजूला लाखों चांदण्या व तारे आपआपली शिरें नमवून स्थानापन्न झाले होते. चंद्रानें खालीं पाहिलें तेव्हां त्याला आपल्याच प्रकाशांत नाचणारा नील रंगानें मढवलेला समुद्र दिसला. चंद्राला आनंद झाला. तो. ह्मणाला, " खरंच राजा होण्यांत किती सुख आहे बरं ! "

नंतर कांहीं दिवसांनीं काळ्याकुट्ट मेघांनीं चंद्राला झांकून टाकले. चंद्राला वाटलें कीं आपलें अस्तित्व आतां संपलें; तो फारच घाबरला व, " काय बुवा हें संकट ! " असें ह्मणाला.

ढग गेले व चंद्र पुन्हां प्रकाशूं लागला.

ढग आले व ढग गेले. चंद्राला त्याबद्दल कांहींही वाटलें नाहीं.

---

जंटस,
' रिफ्रेशमेंट हाऊस '
येथें सर्व प्रकारचें ताजें व मनपसंत फराळाचे जिन्नस मिळतील.
पत्ताः—७७३, सदाशिव पुणें
व्यः—बाबुराव करकरे.

नेहेरू कोल्ड्रिंक हाऊस
गॅसच्या बत्त्या, सायकली,
कोल्ड्रिंक्स व पानाचे दुकान
घ. नं. १०३२
ट्रेनिंग कॉलेज नजीक
बाजीराव नारायण निगडे
शाखा नं. २ बुवा यांचे रसाचें गुऱ्हाळ

# पुरांतील पंचविशी.

( चाल— घट बुडें प्रवाही...... इ. )

चालली पुरापरि पंचविशी, उघड या औट घडिंच्या वेशीं ॥ धृ ॥
जरा, बालपण घेई कांहीं, मरण रोजचें घेउनि जाई ॥
हरिणासम जीवन चपळाई, हांक दे धन्याला अविनाशी ॥ १ ॥
लक्षावधि योनींत पडावा, पावन मानव जन्म मिळवा ॥
सद्गुरुचा सहवास घडावा, भ्रमसि कां सुतमन दरवेशी ? ॥२॥
रत्न, हिरकणी,माणिक-दान देतां न मिळें हें वय जाण;
सुटलेंला वाऱ्यावरि बाण, सोड सोनियाच्या राशीं ॥ ३ ॥
भाट छेडिती सुस्वर ताना नागासम डोलविसी माना !
कां भुलसी या ऐहिक माना ? बोलसी अझुनि 'खाशी' 'खाशी' ४
षड्रिपु धरिशी प्रबळ उराशी मातापितरांचे ऋण तुजसी
भरतभूमि बांधियली पाशीं शांत ये अझुनि तुज झोंप कशी ? ॥५॥
प्रियकरणीच्या चंचलतेला भुललासी विसरुनि मातेला !
सत्वसंगरी ऐस भुकेला वद सदा जाऊं आपण काशीं ॥ ६ ॥
परिघापरि करि करद्वय तुझे कसुनी परिकर साही ओझें
वसुधा सर्व कुटुंबक माझें समजुनीं झगड आपत्तींशी ॥ ७ ॥
चिरेबंद पायावरी पुतळा शोभुनी दिसतो उभा मोकळा,
आसनाविना दिसेना कळा; रणठाण मांडुनी घेइं उशी ॥ ८ ॥

**त्रिंबक गणेश बापट. ( ज्यु. बी. ए. )**

# हो बाबा एकदाचा बी. ए. !

लेखक— अ. वि. काळे इंटर आर्टस्

विन्या ! अरे विन्या ! ! आज तुझा रिझल्ट आहेना ? मग आली कां तार ? बघु कुठं आहे ती ? एकंदरींत सुटलात म्हणायचं मॅट्रिकच्या कचाट्यांतून ! ! अर्ध तप तपश्चर्या करून झालं म्हणायचं सार्थक एकदांचं ! ! हसतां काय गोपाळराव ? मी सांगतों त्यांत एक अवाक्षर सुद्धां खोटं नाहीं ... मुलगा सहा वर्षे बसतो आहे परिक्षेला ! अहो ! यंदा सुद्धां कसा पास झाला कोणास ठाऊक ? ... बरं ... पुढं काय ठरवलं आहेस विनायक ?... कोणता कोर्स घेणार ?... इंजीनियरिंगकडे जाणार ? पण तें कसलं जमत आहे म्हणा तुला ? कारण बाब्याचं गणीत फार उत्तम ना ! कधीं शून्याच्या वर गेला आहे कां बाबा तुझा आकडा ? अहो, गोपाळराव, मला मोठी काळजी लागली आहे बघा ! नोकरी बघावी म्हटल, तर नोकऱ्या तरी कुठं आहेत ? आणि असल्या तरी याचं शिक्षण कुठं इतकं आहे ? अहो, पूर्वीचे दिवस आतां विसरा !... आतां आमच्या वेळेसच बघाना ! मी शिकलों इंग्रजी चार यत्ता ! पण मला होता शंभर रुपये पगार, शंभर !... तेंच आतांच्या ' बी. ए. ' ला, पंचवीस रुपयालासुद्धां कोणी देऊन विचारीत नाहींत... अहो ! जो तो उठणार, आणि शिकणार, व तें सुद्धां निव्वळ नोकरीसाठीं, मग सर्वांना काय नोकऱ्या वाटेवर पडल्या आहेत ? ... बरं, मेडिकलला घालावं म्हटलं तर त्यांत सुद्धां कांहीं मिळेलसं मला वाटत नाहीं ! कारण, आतां जवळ जवळ प्रत्येक घरांत डॉक्टर झाले आहेत.... आमच्या लहानपणीं या अख्या गावांत, एक डॉक्टर होता, एक व तो सुद्धां सरकारी, तेंच हल्लीं पहाना ? जवळ जवळ शंभर एक डॉक्टर झाले आहेत सबंध गावांत ! —— मग, काय म्हणतोस विनायक ? घरीं बसणार म्हणून ? अरे, पण गाढवाच्या कांद्या ! इथं कांहीं बापजाद्यांनीं उत्पन्नं मिळवून ठेवलेली नाहींत. —— अरे बाबा ! तुला स्वतःलांच आपलं पोट भरलं पाहिजे. — आणखी असं बघ, कीं माझं आतां वय झाललं आहे, तेव्हां तूं मला आतां कष्ट करावयास लाऊं नकोस, तुझं तूं मिळवून खाडंस म्हणजे मला म्हातारपणीं मिळवण्याचा त्रास नको —— तेव्हां मी म्हणतों कीं तूं पुढं शिकावस — इतर कोणताही कोर्स जमत नसेल तर आपला आर्टस्चा धोपट मार्ग धर, —— कॉलेजमध्यें जा, पण ' हो बाबा एकदांचा बी. ए, ' म्हणजे न्हाले आपले घोडे गंगेत !

# ऐन वेळीं.

( लेखकः— स. वा. दातार. )

—आपलें मन, आपलें वर्तन शुद्ध, निर्मल, सात्त्विक भावांच्या सौंदर्यानें वहरलेलें असावें; अन् मग कोठेंहि पाऊल टाकावयाला डरायचें कारण नाहीं. —

सुशिला सर्व कॉलेजांत सौंदर्यसंपन्न मानली जात असे. तिचे वडील नगरला वकील असून तिचें घराणें प्रथमपासून बरेंच श्रीमंत समजलें जाई. तिच्या चालचलणुकींत एक प्रकारचा उच्च कुलीनपणा ओतप्रोत भरलेला असे. ती हंसे, खेळे, पण त्या सर्वांत असा एक मर्यादेचा, पवित्रपणाचा अंश असे कीं तिच्या त्या अनुपम सौंदर्यावर अनुरक्त होऊन तिचा अभिलाष धरणें, तिच्याशीं बोलायचा प्रयत्न करणें मोठ्या मोठ्या व सद्गुणी मुलांनाहि केवळ अशक्यप्राय वाटे. अर्थांतच मग फालतु मुलांची तर तिच्याकडे बघण्याची प्राज्ञाच नसे.

पहिल्या पासूनच मला सुशीलबद्दल एक प्रकारचा भीतियुक्त आदर वाटे. तिचा माझा कधीं संबंध येईल असें मला कधींच वाटलें नाहीं. ती हजारांत एक आहे; तर तिच्याशीं ओळख असायला किंवा करायला हजारांतला एकच पाहिजे. ' येरा गबाळाचें हें काम नोहें ' असें मला सदोदित वाटे. राजघराण्यांत जन्मलेल्या माणसांवर एक प्रकारचें जसें राजबिंडें तेंज झळकतें तसेंच कांहींसें क्वचित् कांहीं अभिजात लोकांवर दिसतें. हें तेंज—ही कांति केवळ ईश्वरी देणगी असते! पुष्कळ वेळां गडगंज श्रीमंतसुद्धां केवढ्याहि भारी वस्त्रालंकारांत इतकें विशोभित दिसतात कीं ती वस्त्रालंकारांची बाह्य श्रीमंती काढून घेतली तर कळत सुद्धां नाहीं कीं ते भिकार मोलकरी आहेत कीं सुखी श्रीमंत आहेत. पण सुशीलचें तसें नव्हतें. ती स्वभावतः—निसर्गतः श्रीमंत होती. अशा कांहीं अभिजात कांतीचें सूक्ष्म प्रावरण तिच्या भोंवतीं परिवेष्टिलेलें होतें कीं ती साध्या अर्धवट विटलेल्या पातळांत जरी असली तरी पाहणारांचे डोळे दिपून जात.

एफ्. वाय् संपून इंटर सायन्सचें वर्ष सुरू झालें. आमच्या वर्गांत फक्त दोघीच मुली होत्या. एक दिवस Baco3 चा प्रयोग होता. सुशीलचा व तिच्या कम्पॅनिअनचा पहिला बॅलन्स होता; आमचा दुसरा होता. मी कागदावर मुलांच्या स्वाभाविक व्रात्यपणास अनुसरून चांगली दोन तीन प्रयोगांना पुरेल इतकी Baco3 ची पूड घेऊन बॅलन्स ॲड-जस्ट करीत बसलों होतों. सुशीलनें बॅलन्स लावून ' क्रुसिबल ' चें वजनहि घेतलें होतें. बराच वेळ ती तिष्ठत बसली होती. पण बाकीच्या मुलांच्या तडाख्यांतून सुटून Baco3 ची बाटली तिच्याकडे येण्याचें कांहींच चिन्ह दिसेना. ती सारखी चुळबुळ करीत होती. त्याच बॅलन्सचीं दुसरीं मुलें दोनदां तिनदां जागा रिकामी झाली कां पाहण्यास डोकावून गेलीं होती.

काय वाटून कोणास ठाऊक, मी माझी कागदावरची पूड तिच्याकडे सरकविली. कांहीं न बोलतां तिनें ती पूड घेतली. जरा वेळानें तिनें दुसरें वजन घेतलें व ' केस ' बंद करून माझी पूड मजकडे सरकावीत एकदांच भुंग्यासारख्या काळ्याभोर डोळ्यांची आपली चंचल नजर मजकडे अलगद भिरकावून दिली.

त्यानंतर कांहीं दिवसांनीं एक अगदीं किचकट प्रयोग होता. कांहीं केल्या रिझल्ट जमत नव्हते. सर्वांचीं तोंडें नुसती सुकून गेलीं होती. शेवटीं ५-५॥ चे सुमारास एक एक घरीं जाऊं लागला. बाहेर ढग जमा झाले होते व पाऊस केव्हां पडूं लागेल त्याचा नेम नव्हता. बऱ्याच जणांजवळ छत्र्या नव्हत्या; पण पोटांतील तीव्र भुकेच्या आंचेनें जो तो घर जवळ करण्याच्या घाईंत होता. सुदैवानें मी आदल्या दिवशीं माझी छत्री एका मुलाला दिली होती ती तो घेऊन आला होता. शेवटीं गड्यानें प्रयोग शाळेंतून हांकूनच दिल्यावर कसा बसा प्रयोग संपवून मी घरीं निघालों. माझ्या आधीं १-२ च मिनिटें निघालेली सुशील व तिची कम्पॅनिअन Ladies' Room मधून पुस्तकें घेऊन माझ्या मागूनच येत होत्या. कॉलेजच्या फाटकाबाहेर पडल्यावर तिची कम्पॅनिअन आपल्या घराच्या रस्त्याला लागली; व सुशील नेहमीप्रमाणें माझ्याच बाजूच्या रस्त्यानें घराकडे निघाली.

आम्ही थोडेसें जातों तोंच इतक्या जोराचा पाऊस कोसळला कीं सांगतां सोय नाहीं. सुशील थोडक्यांतच अगदीं पुरी भिजली. तिचें उंची झिरझिरीत वस्त्र भिजून तिच्या कांतियुक्त सुंदर अंगास लपेटून बसल्यामुळें निराळ्याच सुंदर मिश्र रंगाचें दिसत होतें. रस्त्यांत जवळ पास कोणीसुद्धां नव्हतें. आडोशाला उभें राहण्यासारखीं घरेंहि अजून लांब होतीं. त्या रस्त्याच्या शेवटाशेवटास आमच्याच वर्गांतला एक मुलगा छत्रींतून चालला होता. मी बराच विचार करून अखेर मोठ्या धैर्यानें थांबलों. सुशील माझ्या-जवळ येतांच मी छत्री तिजपुढें केली ती घेतघेतच ती उद्गारली, " तुझांला नको कां ? "

" नको; तुमचें घर लांब आहे, मी पळत त्या मुलाच्या छत्रींत जातों."

एवढें बोलून मी पळालोंहि !

× + ×

सुशील छत्री परत आणून द्यावयास दोन तीन दिवस सारखी विसरत होती. शेवटी एक दिवस बॅलन्सरूममध्यें गांठ पडतांच मी विचारलें " छत्री आणाल कां उद्यां, आठवणीनें ? "

" काय करावं सारखी विसरतेंच आहे मी!— रागावलात कां तुह्मी? —आपणच या ना एकदां नाहीं तर ! "

" छे, छें ! तुह्मीच आणा ! " मी ऐन वेळीं छत्री दिली, ती माझी गैरसोय न व्हावी ह्मणून ताबडतोब आणून दिली पाहिजे, एवढं सहज कळण्यासारखं असूनहि सुशील अशी बेफिकिरी दाखवीत असलेली पाहून किंचित् जोरांत ह्मणालों.

" राग कां आला ? —मीच ताबडतोब आणावयास पाहिजे होती हें मी जाणून आहे व आणणारहि होतें पण खरं सांगायचं ह्मणजे मुद्दामच नाहीं आणली. आपण एकदां आमच्या घरीं यावं अशी आमची इच्छा आहे ! "

**" आमची म्हणजे ? "**

**" माझी आणि माझ्या थोरल्या बहिणीचीहि ! "**

**मी चकीत होऊन तिच्याकडे पहातच राहिलों.**

" मग याल ना आज संध्याकाळीं — मीं अगदीं मनापासून बोलावतें आहे — आह्मी वाट पाहतों. "

× + ×

इतकें बोलून ती निघूनसुद्धां गेली.

त्या सारा दिवसभर मला आनंद होत होतां कां आश्चर्य वाटत होतें तेंच मला सांगतां येत नाहीं.

संध्याकाळीं मी सुशीलच्या घरीं घेलों. तें घर किती तरी सुंदर होतें. कारण तें सुव्यवस्थित होतें व त्यांत राहणारे लोक उच्च मनाचे, सुसंस्कारित व उदार मताचे होते.

मी एका आरामखुर्चींत बसलों होतों; समोरच सुशीलेची बहीण कांहीं तरी शिवत हातमशिन पुढें घेऊन बसली होती; व सुशील जवळच उभी होती.

" — पण तुह्मी " सुशीलची बहीण ह्मणाली, " अशा संकुचित वृत्तीच्या लोकांत राहूनहि छत्री कशी दिलीत ? "

" ... दिली ! " मी बऱ्याच वेळानें थोडक्यांत उतरलों.

" — नाहीं तुह्मी केलेंत तेंच चांगलं केलंत; पण लोय काय ......

" — हो, ह्मणूनच मी थोडा घुटमळलों. नाहींतर एवढंहि भिजायला लागलं नसतं. "

" कांहींच घुटमळायचं कारण नाहीं ! असं योग्य वेळीं साह्य देण्यास कांहींसुद्धां हरकत नाहीं आणि कुण्णाचीहि पत्रास बाळगायची जरूर नाहीं. वेळेवर एकमेकाला साह्य करणं हें आपलं कर्तव्यच आहे. तितके आपण समाजतः संबंधी असतोच ! "

" खरंच ताई ! " सुशील ह्मणाली, " मला सुद्धां त्यावेळीं वाटलं कीं यांनीं छत्री मला द्यावीं व आपण एकाद्या मुलाच्या छत्रींत जावं—यांनीं पण अगदीं माझ्याच सारखा विचार केलेला पाहून मला कित्ती मौज वाटली, अन् आनंदहि झाला ! "

" साहजिक आहे ! ह्मणूनच ह्मणते कीं कारण नसतां छाकट्या थाटांत पुढें पुढें करून गोंडा घोळीत लघळपणा करणारे फालतु कोण आणि कारण

पडल्यास ऐन वेळीं निर्मळ मनानें पुढें होणारे सज्जन सुस्वभावी कोण तें सहज कळतें; आणि मग अशा लोकांची जरी फालतूनीं निंदा केली तरी तिचा अर्थ मुलींना चांगला कळतो.

" — आपलं मन, आपलं वर्तन शुद्ध, निर्मल, सात्त्विक भावांच्या सौंदर्यानें बहरलेलें असावें; अन् मग कोठेंहि पाऊल टाकावयास डरायचं कारण नाहीं!!! "

असो, मग सुशीलनें बशींत घालून आणलेल्या खोबऱ्याच्या खवा घालून केलेल्या दोन सुंदर खुमासदार केशरी वड्या गट्ट करून त्या नव्या नव्या लोकांच्या हातांत जाणाऱ्या उनाड छत्रीसह आमची स्वारी सुशीलच्या घराबाहेर पडली.


# एम्. पी. ओझरकर आणि कंपनी

पत्ता:--- ट्रेनिंग कॉलेज नजीक
१०३२, सदाशिव, पुणें.

आमच्या दुकानी, सुंदर रिंगस् मेडलस, स्त्रियांच्या फॅशनेबल बांगड्या, गळ्यांतील सर्व प्रकारचे दागिने, लॉकेटस् वगैरे सर्व अलंकार सोन्याचे, चांदीचे, तसेच हिऱ्या माणकांचे गिऱ्हाइकाच्या आवडीप्रमाणें व नमुन्याप्रमाणें व बक्तशीर असेच आम्ही करून देतो.

**गिऱ्हाइकांशी चोखपणा, वक्तशीरपणा व प्रामाणिकपणा, हीं आमचीं ब्रीदवाक्यें**

तरी एकदां दुकांनीं येऊन अनुभव घेऊन पहां.

॥ ॐ नमः श्रीरामचंद्राय ॥

# आर्यमहौषधालय, मु. पो. आंजर्ले

प्रोप्रायटरः—डॉ० रंगनाथ कृष्णशास्त्री बिवलकर,
एल. एच. एम्. एस. एम्. बी. ए.

## कोंकण प्रांतांतील अगदीं ताज्या व शुद्ध वनस्पतींचीं जगप्रसिद्ध रामबाण औषधें:—

| | |
|---|---|
| अपूर्वमालिनीवसंत जीर्णज्वर, अश्मरी | १८ |
| अभ्रकभस्म—रक्तविकार, श्वास, खोकला | ९ |
| अभ्रकभस्म-शतपुटी | ५ |
| अभ्रकभस्म-सहस्त्रपुटी-क्षय मुळव्याधी, व्रण | ५० |
| आनंदभैरव नं. १ कास, अतिसार, व शैत्य | २ |
| कालकूटरस-ज्वर, व सन्निपात | ५ |
| समीरपन्नग-महाश्वास, ज्वर, दमा इ. ना. | ६ |
| सूतशेखर-आम्लपित्त, शैत्य, वांती व गुल्म | ५ |
| रससिंदूर-कफ-श्वास-ज्वर | ३ |
| घोडाचोळी सर्व रोगांवर वस्ताद | ४ |
| शूलकुठार-पोटदुखी, अग्निमांद्य व वातनाशक | २ |
| लोहभस्म-पौष्टिक व शूलादिकांवर | २ |
| सुवर्णमाक्षिकभस्म | २ |
| हरतालभस्म-ज्वर, व्रण, कुष्ट इ. ना. | २ |
| वंगभस्म | २ |
| चंद्रप्रभा | २ |
| श्वासकुठार-श्वास, कास, उचकी इ. ना. | २ |

सूचनाः—वरील औषधें पूर्ण खात्रीची असल्यामुळें आज ५० वर्षांत त्यांचा लक्षावधि लोकांस अप्रतिम उपयोग झाला ह्मणून त्यांचा नेहमीं फारच खप होत आहे. अनुभवानंतर पूर्ण खात्री पटेलच. औषधें माहितीचे खर्च्यासह रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठवूं. प्याकिंग व टपाल खर्च वेगळा. घाऊक घेणारांस कमिशन भरपूर सर्व औषधांच्या आणि आरोग्यरक्षणाच्या माहितीचे सचित्र मोठें पुस्तक पाठवूं.

आमची औषधें मागविणें ती खालील बिनचूक पत्त्यावर मागवावी.

**कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य मु. पो. आंजर्ले, ता. दापोली, जि. रत्नागिरी.**

## वाचकांस सूचना

'संशोधन' हा एक केवळ विनोदी लेख आहे. तुकारामासारख्या थोर संत महात्म्याची हेटाळणी करण्याचा लेखकाचा उद्देश नसून, संशोधनाच्यासाठीं अर्थाचा अनर्थ करूं पहाणाऱ्या संशोधकाची येथें थट्टा केली आहे, हें सहृदय वाचकांच्या ताबडतोब ध्यानांत येईलच.

—संपादक.

# संशोधन.

लेखकः— **खान्देशी**, ( ज्यू. बी. ए. )

[ स्थळः-- वसतीगृह. ३५ नंबरची खोली आंतून बंद आहे. जयंत जोशी खोली ठोठावतो. 'टक्, टक्, टक्.' ]

**जगदीशः**— ( आंतून ) येस्. नेम प्लीज.

**पुन्हा टक्, टक्, टक्.**

**जगदीशः**— ( बाहेर कोण आहे हें ओळखून ) नांव घेतल्या-शिवाय कांहीं आपण खोली उघडणार नाहीं.

**जयंतः**— ( हासून ) नांव घ्यायला काय मी मिस् ××× आहे वाटतें ?

**जगदीशः**— ( धोतराचा सोगा खांद्यावर टाकीत दार उघडतो ) या. जोशीबुआ.

**जयंतः**— खोली बंद करून कसलें काम चाललें आहे ?

**जगदीशः**— जरा महत्वाच्या कामांत गुंतलों होतों.

**जयंतः**— महत्वाचें ह्मणजे कसलें ? प्रियाराधनासाठीं पत्रलेखन चाललें होतें काय ?

**जगदीशः**— पत्रलेखन जरी नसलें तरी पत्रसंशोधन तरी खास आहे. माझा असा अंदाज आहे कीं हें पत्र शिवशाहीच्या काळावर निराळाच उजेड पडणार आहे. त्यामुळें महाराष्ट्राच्या इतिहासांत मोठीच उत्क्रांती होईल. ह्या पत्रामुळें त्यावेळची समाजस्थिति कशी होती, सामान्य जनतेचें तर सोडाच पण साधुपुरुषांची प्रियाराधन पद्धति कशी असे इ.-विषयीं बरीच मनोरंजक माहिती मिळणार आहे.

**जंयतः**— अरे वा ! तूं तर कसलेल्या संशोधकासारखें बोलूं लागलास ! पण तुला हें पत्र कोठें सांपडलें ? हा साधु कोण ? त्याची प्रिया

**जगदीशः**— हें पहा. असा प्रश्नांचा भडिमार करूं नकोस. सावकाश ऐक. हें पत्र आमच्या घरच्या तिसऱ्या मजल्याच्या माळ्यावर जुन्या दप्तरांत सांपडलें. बघ कागद किती जुना आहे तो. हा साधु ह्मणजे ‘ तुकाराम ’. हा पत्रांत स्वतःला ‘ तुका ’ असें ह्मणवितो. यावरून तो ‘ राम ’ द्वेष्टी असावा. कारण ‘ तुकाराम ’ असें चार अक्षरीं नांव असतां तो फक्त ‘ तुका ’ च लिहितो. किंवा हल्लीं जी, कुमुदचें ‘ कु ’, सुलोचनेचें ‘सू’, प्रभाकराचें ‘प्र’ ह्मणण्याची एकाक्षरी पद्धत पडत चालली आहे तिचा तो आद्य संस्थापक असावा. किंवा ‘ राम ’ ह्या नांवाचा त्याच्या प्रियेचा कोणीतरी Lover असेल ह्मणून सहाजिक त्याच्याविषयीं मत्सरबुद्धी जागृत होऊन ह्यानें ‘ राम ’ ह्या अक्षरद्वयाचा त्याग केला असावा. ह्यावरून ह्यानें प्रियेला आवडेल असेंच नांव धारण करून तिला ज्यांत सुख त्यांतच स्वतःला सुख मानून आर्य–गृहिणी धर्म चांगलाच पाळलेला दिसतो. त्यानेंच एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं ‘ कापो कोणी माझी मान । सुखें पीडोत दुर्जन । तुज होय सीण ते मी नकरीं सर्वथा । ’ ह्मणजे पुनर्जन्माच्या Theory प्रमाणें हा गेल्या जन्मी ‘ स्त्री ’ असावा.

**जयंतः**— आहे बुआ ! कमाल केली संशोधनाची ! तुह्मी हें ××× मंडळांत वाचणार असालच !

**जगदीशः**— हें पहा. मला असें नर्व्हस करूं नका.

**जयंत।**— बरें तर. ततस्ततः

**जगदीशः**— त्याच्या प्रियेची दोन नांवें असावींत, किंवा दोन प्रियाहि असूं शकतील. छेः– पण त्याहिपेक्षां पहिलेंच विधान युक्तिवादाला धरून दिसतें. अहो ! असें पहा, आपल्याकडे नाहीं का माहेरचें नांव गोड असून देखील सासरी एखादें इंगाडे नांव ठेवीत ?

ह्या पत्रांत त्यानें ‘ पांडुरंगे ’ व ‘ विठ्ठले ’ अशी दोन संबोधनें वापरलीं आहेत. त्यानें ‘ प्रिये, ’ ‘ लाडके, ’ ‘ जिवाच्या जिवलगे ’ इ. कवि–संकेताविरुद्ध उघड उघड बंड पुकारलेलें दिसतें. ह्मणजे तो बंडखोर होता. तसेंच हल्लीचें पाश्चात्य भाषाकोविद आपआपल्या अर्धांगीस नांवा-

नेंच कां हांक मारतात ह्याचीही पूर्व परंपरा येथें दिसेल. तिच्या नांवावरून तिचें रूपही तुमच्या लक्षांत येईल. ' पांडु ' ह्मणजे पांढरा रंग आहे जीचा ती पांडूरंगा. यावरून ती स्त्री पाश्चात्य असावी व त्याकाळीं International Marriages होत असावींत असा माझा तर्क आहे. F. R. ( Foreign Returned ) लोकांनीं इकडे अवश्य लक्ष द्यावें.' शिवाय ती कृशांगि होती हें ' विठ्ठले ' ह्यावरून उघड होत आहे.

**जयंतः**— हें कसें ?

**जगदीशः**— ( हसून ) ह्मणजे तुह्मांला व्याकरण येत नाहीं. अहो. विगतः लठ्ठपणा यस्याः सा विलठ्ठा–आणि आधुनिक व्याकरणकार 'लठयोः' ह्या सूत्रानें ' ल ' व ' ठ ' ह्या अक्षरांची उलटापालट करतां येतें असें कंठरवानें सांगत आहेत. तात्पर्य ती कृशांगी, नाजुक, गौरवर्ण अशी यूरोपियन महिला होती.

**जयंतः**— एकूण तुमचा ' तुका ' मोठा रसिक व रंगेल दिसतो.

**जगदीशः**— नुसतांच रंगेल नाहीं. तर अर्क आहे अर्क. पत्र तर वाचा कीं तुह्मी ह्मणाल सगळे ' कॉलेज रोमान्स ' फिके आहेत. यापुढें पत्र काय गोड आहे ह्मणतात. पण भाषा जरा जून आहे.

**जयंतः**— अहो, जितकी जुनी भाषा तितकी तुम्हां संशोधकांस अधिक प्रिय.

**जगदीशः**— पहा. सुरवात कशी मजेदार आहे ती. ( वाचतो ) " चोरिलें तें मन दिसतसां " ह्मणून काय ? तर " धीटपणें पत्र लिहिलें आवडी "

**जयंतः**— वाहवा ! सुंदर कारण शोधून काढलें आहे.

**जगदीशः**— ( वाचतो ) " तूं माउलीहूनि मायाळ, चंद्राहूनी शीतळ । पाणियाहूनि पातळ कल्लोळ प्रेमाचा । "

**जयंतः**— उपमांची नुसती दाटी झाली आहे. आहे खरा रोमान्स !

**जगदीशः**— हा तर कांहींच नाहीं. ( वाचतो ) " मी अवगुणी अन्यायी किती ह्मणोन सांगो काई । आतां मज पायीं ठाव देई विठ्ठले ।

भागल्यांचा तूं विसावा। अनाथांचा अंगिकार। करितां भार न मानसी। स्तुती तरी करूं काय कोणापाशी। किर्ति तरी कैशी वाखाणावी!

**जयंतः**— वा! हा भाट तर सुरेखच आहे.

**जगदीशः**— नुसता भाट नव्हे तर (वाचतो) "तुझे पाईचा कुतरा."

**जयंतः**— ह्याच्यावरून मला मेनकेची आठवण होते. तिनें ह्मणे विश्वामित्रास असाच कुतरा केला होता. शिवाय एका इंग्रजी कादंबरींत असाच Reference आहे.

**जगदीशः**— हं. (वाचतो) "घरणें घेतलें दारांत। नको धरून उठवूं हात। उच्छिष्टाचा भाग। शेष उरलें तें सेवूं।" कां कुतऱ्याची भूमिका कशी वठविली आहे? (वाचतो) "बहु दिवस झालों कासावीस। तुका ह्मणे आतां न धरवे धीर। नव्हे जीव स्थीर माझा मज। तुका ह्मणे आतां धाव घाली वेगें।

**जयंतः**— अरे, किती रे ही उत्कंठा!

**जगदीशः**— बाबा! उत्कंठेची परसीमा तर यावयाचीच आहे. (वाचतो) "ध्यानीं रूप वाचें नाम निरंतर। चिंतनाच्या सुखें। तुका ह्मणे नेणें दुःखें। प्रियापुत्र बंधु। यांचा तोडिला संबंधु। तुजवीण मज कोण वो सोयरे। आणीक दूसरे पांडुरंगे। लागलीसे आस पाहे तूझी वाट। रात्रीं वो दिवस लेखीं बोटीं। काम गोड मज नलगे हा धंदा। तुका ह्मणे सदा हेंची ध्यान। भेटीं लागीं जीवीं लागली मळमळ व्यथा। शिणले माझें मन। वाट पाहतां लोचन। तुका ह्मणे लागली भूक। तुझे पहावया श्रीमूख।"

**जयंतः**—आऽहेऽऽबुऽऽआ रोमान्स!

**जगदीशः**—(वाचतो) "माझें मन पाहे कसून। चित्त न ढळे तुजपासून। कापून देईन शीर कृपण कीं उदार। मजवरी घालीं घण। परि न मीं सोडी चरण।" किती Sincere Love हें?

**जयंतः**—ह्यानें तर नेपोलिअनवर ताण केली.

**जगदीशः**—( वाचतो ) " सदा माझे डोळा जडो तूझी मूर्ति । गोड तुझे रूप गोड तूझे नाम । देई मज प्रेम सर्व काळ । तुका ह्मणे काई न मागें आणीक । तुझें पाई सूख सर्व आहे । तुका ह्मणे माझी पुरवावी आस । विनंती उदास करूं नये । कंठी धरिला प्राण । पायापाशी आलें मन । होईल कृपादान । तरी मीं येईन धावोन । परिसोनि उत्तर जाब देईजे सत्वर । जरी तूं होसी कृपावंत । तरी हा बोलावी पतीत । वाट पाहे उभा भेटीची आवडी ।

**जयंतः**—किती नाना तऱ्हेनें आळविलें आहे.

**जगदीशः**—होय पण शेवट काय बहारीचा आहे ! ( वाचतो ) " आतां चरणीं ठेवितो माथा । तुका ह्मणे पाई जडलो मग काई । सांडियेलि काया वरि ओवाळून पाया । आलों लोटांगणी ॥ "

**जयंतः**—( मिस्किलपणें हासत ) अहो संशोधक ! पत्र उत्तम सांपडलें आहे ! संशोधनही युक्तिवादास धरून आहे ! पण हें प्रसिद्ध कराच बुआ. ( मनगटावरील घड्याळडे पाहून ) Excuse me अं. मला आतां Engagement आहे. ( जातो. )



# बादशाही बोर्डिंग हाऊस

( टिळक रोड, सदाशिव पेठ, पुणे. )

पुण्यांत शिक्षणासाठीं परगांवचे अनेक विद्यार्थी दरसाल येतात. अर्थातच त्यांची जेवणाखाण्याची व रहाण्याची उत्तम सोय व्हावी, ह्मणून आम्हीं हें

## बादशाही बोर्डिंग

अगदी नमुनेदार

पद्धतीवर चालवीत आहोंत. येथील स्वच्छता व टापटीप तुह्मांस प्रामुख्यानें पसंत पडेल.

**कॉलेज स्टूडंटस्‌करितां उत्तम रहाण्याचीही सोय आह्मीं केली आहे; तरी एक वेळ अनुभव घेऊन पहा.**

मॅनेजर.

बादशाही बोर्डिंग, पुणे.

# सारस्वत-सेवा-संघ.

चिटणीसः— **गो. वि. राजगुरु.**

'सारस्वत सेवा संघ' हा एखाद्या विवक्षित जातीचा संघ नसून, सर परशुरामभाऊ कॉलेजमधील मराठी वाङ्मयप्रेमी विद्यार्थ्यांनीं चालविलेला मातृभाषा-सेवेचा हा प्रयत्न आहे. अर्थातच मराठी भाषेचा व वाङ्मयाचा अभ्यास करणें, हें सदर्हू संघाचें आद्य ध्येय आहे. मिती भाद्रपद शु. ४ शके १८४३, या सुमुहूर्तावर रा. रा. ल. रा. पांगारकर यांच्या हस्तें, या संघाची स्थापना करण्यांत आली, व गेलीं दहा वर्षे हा संघ आपल्या उपरिनिर्दिष्ट ध्येयपूर्ततेचें काम मोठ्या मेहनतीनें सारखा करीत आहे. मराठी वाङ्मयाचें ज्ञान मिळविण्याकरितां आह्मीं खालील तीन मार्गांचा अवलंब करीत आहोंतः—

( १ ) **लेखकः**— संघाच्या विद्यार्थ्यांचें निबंध, लेख, गोष्टी वगैरे लेखी वाङ्मय प्रकाशित करण्याची व्यवस्था करावयाची. शके १८४३ मध्यें " कै. ह. ना आपटे यांच्या वरील दोन निबंध, " नांवाचें आमचें पाहिलें पुष्प प्रकाशित झालें.

" **साहित्यसुधा** " नांवाचें दुसरें पुष्प आह्मी यंदा प्रसिद्ध करीत असून ते आज आपल्या हातीं यत आहेच.

( २ ) **वाचनः**— संघाच्या विद्यार्थ्यांना लेखनासाठी किंवा व्याख्यानासाठीं ज्या ज्या ज्या पुस्तकांची जरूरी लागेल, तीं पुस्तकें आह्मीं त्यांना मिळवून देतों.

विशेषतः " बी. ए. ( ऑनर्स ) लायब्ररी " आमच्या संघास अत्यंत उपयुक्त अशीच केलेली आहे. गेल्या सहामाहींत संघाच्या सभासदांना आह्मीं वाचनासाठीं जवळ जवळ ४०।५० उपयुक्त अशीं पुस्तकें मिळवून दिलीं.

( ३ ) **व्याख्यानेंः**— सुप्रसिद्ध नाटककार, कादंबरीकार, टीकाकार व कवी यांचीं व्याख्यानें व कवितागायनें सभारूपानें घडवून आणून, त्यांच्या ज्ञानश्रवणाचा संघाच्या विद्यार्थ्यांना लाभ करून देणें. गेल्या सहा माहींत आमचे खालील कार्यक्रम झालेः—

१५४१०
नगर वाचनालय सातारा
२०५८



( १ ) ता. ३।८।३१ प्रो. द. का. पोतदारांचे अध्यक्षतेखालीं श्री. वि. द. घाटे एम्. ए. बी. टी. यांचें ...काव्यगायन व ' कवि दत्त ' या विषयावर व्याख्यान.

( २ ) ता. ४।९।३१ प्रो. द. वा. पोतदार यांच्या अध्यक्षतेखालीं श्री. नी. चाफेकर एम् ए. एल्, एल् बी यांचें " विनायक व दत्त कवी " या विषयावर व्याख्यान.

( ३ ) ता. १०।८।३१ कवि " यशवंत " पेंढरकर यांचें कवितागायन.

( ४ ) ता. १३।८।३१ कविः— " गिरीश " यांचें काव्यगायन

( ५ ) ता. २१।८।३१ " मराठी भाषेची सद्यःस्थिती व भवितव्यता " या विषयावर चर्चा. तत्प्रसंगीं भाग घेणारे सभासदः—

( १ ) श्री. त्र्यं. ग. बापट ( २ ) श्री. वि. वा. कारखानीस ( ३ ) श्री. ना. ग. जोशी. ( ४ ) श्री. गो. वि. राजगुरु. ( ५ ) कवि " अज्ञातवासी " ( ६ ) प्रो. ज. नी कर्वे व ( ७ ) प्रो. द. वा. पोतदार यांचा समारोप

( ६ ) ता. २४।८।३१ कवि त्र्यं. ग. बापट व कवि त्र्यं. रा. अभंग सातारा यांचें कवितागायन.

( ७ ) ता. ९।९।३१ श्री. पु. ग. सहस्त्रबुद्धे एम्. ए. यांचें मराठी नाटकें या विषयावर विवादात्मक भाषण; त्यावेळीं खालील सदस्यांचीं भाषणें झालीं:— १ श्री. त्र्यं. ग. बापट. २ श्री. वि. वा. कारखानीस. ३ श्री. देव. ४ श्री. गो. वि. राजगुरु.

( ८ ) ता. १५।९।३१ प्रो. द. वा. पोतदार यांच्या अध्यक्षतेखालीं संघाच्या गजाननापुढें श्री बा. ना. भिडे बी. ए. एल्‌एल् बी. यांचें " पदवीधरांचें कार्यक्षेत्र " या विषयावर व्याख्यान.

( ९ ) ता. १८।९।३१ श्री. वाग्भट नारायण देशपांडे बी. ए. एल्‌एल् बी. वकील यांचें " कै. ह. ना. आपटे व बालमानसशास्त्र " या विषयांवर व्याख्यान.